रायगड, रविवार दि. १७ डिसेंबर २०२३

# कृषीवल

किंमत ४ ₹

सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा मिळाला, पण...

पान ६ वर

भारताने साहेबांना गुंडाळले

पान ८ वर

## हेक्टरी ७० लाख रुपये दर देण्याचा पालकमंत्र्यांचा प्रस्ताव

# शेतकऱ्यांची निराशा

**शेतकऱ्यांशी चर्चा केल्यावरच निर्णय घेणार**

। अलिबाग । प्रतिनिधी। शहापूर प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नावर शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी विधान परिषदेत आक्रमक भूमिका घेतली होती. त्यामुळे पालकमंत्री उदय सामंत यांनी तात्काळ या संदर्भात शनिवार (दि. १६) जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक बोलावली होती. यावेळी शहापूर येथील प्रस्तावित प्रकल्पापर्यंत पोहच रस्त्यासाठी घेण्यात येणाऱ्या जमीनीचे दर प्रति हेक्टरी ६५ ते ७० लाख रुपये देण्याचा प्रस्ताव पालकमंत्री तथा उद्योगमंत्री उदय सामंत यांनी मांडला. या प्रस्तावाला शेतकऱ्यांकडून फारसा प्रतिसाद मिळाला नाही. अनेक शेतकरी गैरहजर असल्याने अन्य शेतकऱ्यांना विचारूनच निर्णय घेऊ, असे बैठकीत शेतकऱ्यांनी सांगितले. त्यामुळे ठोस निर्णय होऊ शकला नाही. मात्र जास्त भाव मिळेल या आशेवर असलेल्या शेतकऱ्यांच्या जमीनींची कवडीमोल किंमत केल्यामुळे त्यांची निराशा झाली असल्याचे बैठकीनंतर दिसून आले. पालकमंत्री सामंत यांनी शेतकऱ्यांची बाजू घेण्याऐवजी कंपनीची बाजू घेत असल्याचे दिसून आले. •➤ पान २ वर

### जयंत पाटील यांनी भावनेने प्रश्न मांडला

आ. जयंत पाटील यांनी शेतकऱ्यांचा प्रश्न मोठ्या भावनेने मांडला होता. त्यामुळे शेतकऱ्यांसमवेत बैठक घेण्याचा निर्णय घेतला आहे. शेतकऱ्यांशी चर्चा करूनच हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन विधानपरिषदेत दिले असल्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.



शहापूर प्रस्तावित प्रकल्पाच्या भुसंपादन दराबाबत आयोजित बैठकीत मोजक्याच शेतकऱ्यांना पाचारण करण्यात आले होते. काही शेतकऱ्यांना जाणीवपुर्वक डावलण्यात आले आहे. प्रशासनाच्या या भूमिकेबाबत शेतकऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे. बैठकीत ६५ ते ७० लाख रुपये दर देण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. जमीनीचे दर गगनाला भिडले असताना, कवडीमोल भावाने जमीनी घेऊन शेतकऱ्यांना गाजर दाखविण्याचे काम केले जात आहे.

– पंडित पाटील, माजी आमदार

## वे|ध|क

### शरद पवार हेच मराठा आरक्षणाचे विरोधक

**मुंबई :** राज्यभरात मराठा आरक्षणासाठी मोठी आंदोलनं सुरु आहेत. परंतु, मराठा आरक्षणाचा इतिहास काढून बघितला तर कळेल की, मराठा आरक्षणाला सर्वात मोठा विरोध हा शरद पवार यांनीच केला. त्यांना वारंवार संधी मिळाली. त्यांच्या मनात असते तर मंडल आयोग लागू झाला तेव्हाच त्यांनी मराठा आरक्षण दिले असते. पण शरद पवार यांना मराठा समाजाला कधीच आरक्षण दिले नाही, असा गंभीर आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केला. उपमुख्यमंत्री फडणवीस हे शनिवारी नागपूर येथे भाजप पदाधिकाऱ्यांच्या मेळाव्यात बोलत होते. शरद पवार यांना केवळ विविध •➤ पान २ वर

### सुरेश लाड यांच्या हाती कमळ

**नेरळ :** रायगड जिल्ह्यातील मातब्बर नेते माजी आमदार सुरेश लाड यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. त्यांना पक्ष संघटनेत पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले असून, तिन्ही आमदारांना सोबत घेऊन त्यांनी रायगड जिल्ह्यात भाजपची ताकद आणखी मजबूत करावी, असे आवाहन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नागपूर येथे शनिवारी १६ डिसेंबर रोजी भारतीय जनता पक्षाच्या राज्य कार्यकारिणीची बैठक आयोजित करण्यात आली होती. माजी आमदार लाड यांचा भाजप प्रवेश सोहळा पार पडला. •➤ पान २ वर

# माथेरान घाटात अपघात, चार पर्यटक जखमी

। कर्जत । वार्ताहर ।

माथेरानमध्ये पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकाच्या चारचाकी वाहनाला वॉटर पाईप स्टेशनच्या खाली असलेल्या वळणावर अपघात झाला. अपघातामध्ये चार पर्यटक जखमी झाले आहेत. सुदैवाने जीवितहानी झाली नाही. जखमींना टॅक्सी चालकांनी तातडीने खासगी रुग्णालयात नेले.

शनिवार असल्याने माथेरानमध्ये पर्यटक मोठ्या प्रमाणात आपली खासगी वाहने घेऊन माथेरानला येत असतात. मुंबईहून माथेरानमध्ये येत असताना एका अल्टो वाहनाला अपघात झाला. रस्त्याच्याकडेला रेलींग नसल्याने •➤ पान २ वर

# प्रत्येकाला ५०० स्क्वेअर फुटांचे घर द्या-ठाकरे

## धारावी पुनर्विकास योजनेच्या विरोधात मोर्चा

। मुंबई । वृत्तसंस्था ।

धारावीच्या विकासाला आमचा अजिबात विरोध नाही, पण धारावीत राहणाऱ्या प्रत्येकाला ५०० स्क्वेअर फुटांचे घर मिळायला पाहिजे. तेथीन नागरिकांना व्यवसायाला जागा द्या, धारावीतील कोळीवाडा आणि कुंभारवाड्याला वेगळी जागा द्या, अन्यथा आम्ही शांत बसणार नाही, असा इशारा शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांनी दिला.

शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने धारावी पुनर्विकास योजनेच्या विरोधात शनिवारी मोर्चा काढण्यात आला होता,

त्यावेळी ते बोलत होते.

गेली अनेक वर्षे या प्रकल्पाची चर्चा सुरू आहे. गरज पडली तर मुंबईच काय तर अख्खा महाराष्ट्र धारावीत उतरवेन. ज्यांनी धारावीची सुपारी घेतलीय त्यांनी समजून घ्यावे हा अडकित्ता आहे. त्याने ठेचलं तर पुन्हा नाव घेणार नाही, असा घणाघातही त्यांनी केला. जे व्यवसाय गुजरातला गेले ते धारावीत परत आणा, सुरतला नेलेले आर्थिक केंद्र धारावीत झाले पाहिजे, अशी मागणी ठाकरे यांनी केली. आता पन्नास खोके कमी पडायला लागलेत त्यामुळे आता धारावी विकायला निघालेत अशी टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, हा लढा आता केवळ धारावीचा नाही, तर महाराष्ट्राचा झाला आहे.

अडीच वर्षे यशस्वीपणे चालणारे सरकार गद्दारी करून पाडलं, आता सर्वांना समजलं असेल की त्यांना खोके कुणी पुरवले असतील. मी मुख्यमंत्री होतो तोपर्यंत यांना काहीच करता आलं नाही. त्यामुळेच महाविकास आघाडीचे सरकार पाडलं, असेही ते म्हणाले.

आम्ही अडीच वर्षे सत्तेत होतो, पण धारावीचा गळा घोटू असा एकही निर्णय घेतला नाही. २०१८ साली धारावीच्या पुनर्विकासाचा निर्णय घेतला होता.•➤ पान २ वर

### अरबी समुद्रात भारतीय नौदलाची मोठी कारवाई

**मुंबई :** अरबी समुद्रातील मालवाहू जहाजाचे अपहरण करण्याचा प्रयत्न भारतीय नौदलाने हाणून पाडला आहे. भारतीय नौदलाने शनिवारी याबद्दल माहिती दिली. माल्टाचा ध्वज असलेले १८ चालक दल असणाऱ्या मालवाहू जहाज एमव्ही रुएनवर सहा अज्ञात व्यक्तींनी कब्जा केला होता, परंतु भारतीय नौदलाने हे लक्षात येताच त्वरित कारवाई केली.नौदलाच्या युद्धनौका आणि सागरी गस्ती •➤ पान २ वर

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१७ डिसेंबर

१) श्रीम.नलिनी मोहनलाल पारेख
अलिबाग, १७-१२-१९४९

२) श्री.माधुरी सुधाकर आम्बवले
अलिबाग, १७-१२-१९४८

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

कै. सुशिला दत्तात्रेय मगर यांच्या स्मरणार्थ

डॉ. श्री. रमेश पालकर, अलिबाग

# आम्हाला न्याय मिळवून द्यावा

## पारगाव ग्रामस्थांचे आ. जयंत पाटील यांना साकडे ; नागपूर अधिवेशनात घेतली भेट

**। पनवेल । वार्ताहर ।**

**पनवेल तालुक्यातील पारगाव गावाच्या पुनर्वसन व पुर्नस्थापनेबाबत स्थानिक भूमिपुत्रांनी अनेकदा शासनाकडे पत्रव्यवहार केला आहे. परंतु, अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. तरी, यासंदर्भात आ. जयंत पाटील यांनी लक्ष घालून योग्य ते मार्गदर्शन करावे व शासन दरबारी आमची कैफियत मांडवी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब नाईक यांनी केली आहे. नागपूर हिवाळी अधिवेशनात त्यांनी आ. पाटील यांची भेट घेऊन मागण्यांचे पत्र सादर केले.**

या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, पारगाव गावात माती भरणीची कामे तीन वर्षापासून चालू आहेत. त्यामुळे पावसाळ्यात भरती येऊन ३० टक्के घरांचे अतोनात नुकसान होत आहे. तसेच पारगाव गावाची पातळीही आता बनविलेल्या नाल्याच्या पातळीपेक्षा खाली आहे. तरी ती वाढविणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे येथील सांडपाण्याचा निचरासुद्धा होत नाही. अनेक तळमजल्यावरील घरांमध्ये पाणी शिरत आहे. विमानतळाच्या कामात होणाऱ्या ब्लास्टींगमुळे गावातील ५० टक्के घरांना तडे गेले आहेत.

तसेच प्रदूषणाचा त्रास होत आहे. त्यामुळे पुराचा धोकासुद्धा गावाला मोठ्या प्रमाणात आहे. हीच अवस्था पारगाव डुंगी या गावाची झाली आहे. आगामी काळात ही दोन्ही गावे पाण्याखाली जाण्याची दाट शक्यता आहे, त्यामुळे वित्तहानी व जीवितहानी होण्याची शक्यता आहे. येथील भूमिपुत्रांनी आपल्या जमिनी विकासकामासाठी दिलेल्या आहेत. यावेळी शासनाने येथील भूमिपुत्रांच्या समस्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे.

दरम्यान, आ. जयंत पाटील यांनी या विषयासंदर्भात ग्रामस्थांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनाकडे पाठपुरावा करु, असे आश्वासन दिले. यामुळे ग्रामस्थांना दिलासा मिळाला असून, त्यांनी समाधान व्यक्त केले.

# गुन्हे शाखेच्या कामगिरीचे आयुक्तांकडून कौतुक

**। पनवेल । वार्ताहर ।**

मोटारसायकलवरून जबरीने मोबाईल खेचून चोरी करणाऱ्या टोळीला गुन्हे शाखा कक्ष २ ने गजाआड करून सुमारे ५ लाख रुपयांचे एकूण २९ मोबाईल फोन हस्तगत करून १७ गुन्हे उघडकीस आणले आहेत. याबद्दल गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाला नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी विशेष कार्यक्रमात गौरविले आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासाच्या अनुषंगाने गुन्हेशाखा सहायक पोलीस आयुक्त गजानन राठोड, गुन्हे शाखा कक्ष २ वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि प्रविण फडतरे, पोहवा निलेश पाटील, सचिन पवार, सागर रसाळ, राहुल पवार, अजिनाथ फुंदे आदींच्या पथकाने तांत्रिक तपासाच्या आधारे भारत राठोड, देवानंद जाधव, दिपक राठोड, आणि वैभव जगताप यांना ताब्यात घेतले असता त्यांच्याकडून गुन्ह्याची उकल करण्यात आली होती. त्याचप्रमाणे त्यांनी आतापर्यंत पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीत २ गुन्हे, कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५ गुन्हे, तळोजा पोलीस ठाण्याच्या हद्दीत ५ गुन्हे, पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ गुन्हा, खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ गुन्हा, खारघर पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ गुन्हा व सीबीडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत १ गुन्हा असे एकूण १७ गुन्हे उघडकीस आणले असून, त्यांच्याकडून २९ मोबाईल फोन व गुन्ह्यात वापरलेली मोटार सायकल असा मिळून ५ लाख २ हजार ७०० रुपये किमतीचा ऐवज हस्तगत करण्यात केला होता. कक्ष २ पनवेलच्या टीमला उत्कृष्ट डिटेक्शन प्रमाणपत्र देऊन गौरविले आहे.

# नशामुक्त पनवेलसाठी युवासेनेचा लढा सुरु

## ■ गरज पडल्यास शिवसेना रस्त्यावर उतरणार

**। पनवेल । वार्ताहर ।**

शिवसेना नेते, युवासेनाप्रमुख आमदार आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली तसेच युवासेना सचिव वरुण सरदेसाई यांच्या आदेशानुसार पनवेलमध्ये नशामुक्त पनवेलसाठी युवासेनेचा प्रशासनाशी सर्व पातळीवर लढा सुरु असून, गरज पडल्यास शिवसेना रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा युवासेना जिल्हा अधिकारी पराग मोहिते यांनी पनवेल महानगर पालिकेला दिला आहे.

युवासेनेच्या शिष्टमंडळाने नुकतेच युवासेना जिल्हा अधिकारी पराग मोहिते यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांची भेट घेऊन अवैध पानटपऱ्या व हुक्का पार्लरविरोधात कारवाईची मागणी केली होती. या मागणीची दखल घेत महापालिका आयुक्तांनी पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व अवैध पान टपऱ्यांविरोधात सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले होते. त्याअनुसार आतापर्यंत किमान २०-२५ टपरी चालकांवर कारवाई करून सदर पानटपऱ्या हटवण्यात आल्या आहेत.

सागर पाटील, पनवेल येथे निखिल भगत, प्रभाग क्रमांक १ आणि २ येथे जीवन पाटील, खांदा कॉलनी येथे आबेश ओंबळे, खारघर येथे अनिकेत पाटील, नवीन पनवेल येथे जितेंद्र सिद्धू, तळोजा येथे तेजेष पाटील, कळंबोली येथे अक्षय मोकल आदी कार्यरत राहणार असल्याची माहिती मोहिते यांनी दिली आहे. या कारवाईने अवैध व्यवसायीकांमध्ये घबराटीचे वातावरण आहे.

# पान टपऱ्यांवर धडक कारवाई

**। पनवेल । वार्ताहर ।**

महाराष्ट्रात गुटखा, पान मसाला, जर्दा, सुगंधित तंबाखू आदी अन्न पदार्थांची विक्री करण्यास बंदी असतानाही तालुक्यातील शेडुंग फाटा, आजिवली गाव, कोन गाव आदी ठिकाणी प्रतिबंधित अन्न पदार्थ विर्कीस ठेवल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन पेणच्या पथकाने कारवाई करत सदर ठिकाणाहून मुद्देमाल हस्तगत केला आहे. तालुक्यातील शेडुंग फाटा येथील पान टपऱ्यांवर विषेश पथकाने धडक कारवाई करून त्यांच्या कडून एकूण ६४४ पाऊचेस ज्याची किंमत जवळपास ४७३६.५०/- किमतीचा मुद्देमाल हातगत करण्यात आला असून, त्यांच्याविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद केली आहे.

दरम्यान, या आधी देखील अशी कारवाई करणण्यात आली आहे. या पुढेही ती करण्यात येणार आहे.

# शिवाजी चौकाने घेतला मोकळा श्वास

**। रसायनी । वार्ताहर ।**

पाताळगंगा परिसराची मुख्य बाजारपेठ असलेल्या मोहोपाडा शहरातील शिवाजी चौकातील अतिक्रमण हटवण्यात आले आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांनी मोकळा श्वास घेतला आहे.

या ठिकाणी विक्रेत्यांनी हातगाड्या, टपऱ्या उभारुन अतिक्रमण केले होते. शिवाजी महाराजांच्या पुतळ्याभोवती व मोहोपाडा शिवसेना शाखेसमोरचा परिसर अतिक्रमणाच्या विळख्यात सापडल्याने सर्वांनाच त्रासदायक ठरत होते. अतिक्रमण हटवण्याची मागणी सातत्याने होत होती, मात्र

अतिक्रमणाचा विळखा हटविण्यासाठी प्रयत्न केले, तर व्यावसायिक नाराज होतील, तसेच ते मतदान करणार नाहीत, अशी भीती पदाधिकाऱ्यांच्या मनात होती. दरम्यान, शिवसैनिक व शिवभक्तांनी

## अतिक्रमण हटवले

शिवाजी चौकातील विक्रेत्यांचे अतिक्रमण हटलेच पाहिजे, अशी ठोस भूमिका घेऊन हातगाडी चालक, टपरी व्यवसाय करणाऱ्यांना शिवसेना शाखेत बोलावून दोनदा बैठक घेण्यात आली. यावेळी शिवसैनिक, शिवभक्त व नवनिर्वाचित शिवसेना सदस्य उपस्थित होते. सर्वांनी सदर विक्रेत्यांना विनंती करुन ठराविक

मुदत दिली होती. त्यानंतर विक्रेत्यांनी शिवसेना शाखेसमोरील व शिवाजी चौकातील अतिक्रमण काढले. शिवाजी चौकातील दुकाने हटविताच मोकळ्या झालेल्या जागेत वाहने उभी करु नयेत असे शिवसैनिकांकडून सुचना फलक लावण्यात आले आहे. हा परिसर शनिवार स्वच्छ करण्यात आला.

# मुलाच्या अपहरणाप्रकरणी महिलेला कारावास

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल रेल्वे स्थानक परिसरातून दोन वर्षांच्या मुलाचे अपहरण करणाऱ्या एका महिलेला कल्याण रेल्वे न्यायालयाने दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा आणि दहा हजार रुपये दंड ठोठवला. दंड न भरल्यास महिलेला एक महिन्याचा साधा कारावासा भोगावा लागणार आहे. दीड वर्षांपूर्वीच्या या प्रकरणाचा निकाल एक वर्ष चार महिन्यांतच लागला.

मूळचे अमरावतीचे असलेले सहा जणांचे एक कुटुंब मागील तीन वर्षांपासून पनवेल रेल्वे स्थानकाच्या बाहेर पदपथावरच राहात होते. १६ जून २०२२ रोजी हे कुटुंब येथील पदथावर झोपले होते. पहाटे ५.४५ वाजता दाम्पत्य जागे झाल्यानंतर ते प्रातर्विधीसाठी गेले. पुन्हा त्याठिकाणी आल्यानंतर त्यांचा दोन वर्षांचा मुलगा गायब असल्याचे दाम्पत्याच्या निदर्शनास आले. दाम्पत्याने पनवेल रेल्वे स्थानक परिसर तसेच, आसपासच्या वस्त्यांमध्ये मुलाचा शोध घेतला. मात्र, मुलगा न मिळाल्याने त्याच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीनंतर पनवेल पोलिस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल झाला. मुलाचा शोध घेत असताना रेल्वे पोलिसांना एका महिलेकडे अपहृत मुलगा सापडला. ही महिला पनवेल तालुक्यात राहात असून पोलिसांनी तिला अटक केली. आरोपी महिलेने जामिनासाठी न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, तिला जामीन न मिळाल्याने अद्यापही ती कारागृहात आहे. सहाय्यक सरकारी वकील जयश्री कोरडे यांनी एकूण १२ साक्षीदार तपासले. आरोपी महिलेने (३५) भीक मागण्याच्या उद्देशाने मुलाचे अपहरण केल्याचे सिद्ध झाले नसले तरी उपलब्ध पुराव्यावरून तिने पालकांच्या ताब्यातून अल्पवयीन मुलाचे अपहरण केल्याचे सिद्ध झाले.

# जेएनपीएने केले १४ भूखंडांचे वाटप

**। उरण । वार्ताहर ।**

देशातील सर्वात मोठ्या २७७ हेक्टर क्षेत्रावरील जेएनपीए सेझच्या ५६५ कोटींच्या गुंतवणूकीनंतर ई-निविदा आणि लिलावाव्दारे यशस्वी ठरलेल्या १४ भुखंडाचे वाटप करण्यात आले आहे. भाडेपट्ट्याने दिल्या जाणाऱ्या या भुखंडासाठी राखीव किंमतीपेक्षा ४० टक्के जास्त बोलीवर देण्यात आली असल्याची माहिती जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांनी पत्रकार परिषदेत नुकतीच दिली.

जेएनपीएचे बंदर आधारित ऑपरेशन मल्टी -प्रॉडक्ट असे देशातील सर्वात

मोठे स्पेशल इकॉनॉमिक झोन (जेएनपीए सेझ) तयार करण्यात येत आहे. जेएनपीए सेझच्या धोरणात्मक जमीन वाटप आणि औद्योगिक विकास याबाबत माहिती देण्यासाठी जेएनपीएने मुख्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत उपाध्यक्ष उन्मेष वाघ, जेएनपीए सेझचे वरिष्ठ अधिकारी नितीन बोरवणकर, वरिष्ठ मार्केटिंग मॅनेजर अंबिका सिंग व इतर अधिकारी उपस्थित होते.

जेएनपीएच्या मालकीच्या २७७ हेक्टर क्षेत्रावरील उभारण्यात येत असलेल्या सेझमध्ये ५६५ कोटींच्या गुंतवणूकीनंतर अत्यावश्यक पायाभूत सोयीसुविधांचा विकास पुर्ण केला आहे. आत्तापर्यंत ३१ युनिटसना सेझ भुखंडाचे वाटप करण्यात आले आहे. यामध्ये नऊ युनिट आणि एक फ्री ट्रेड वेअरहाऊसिंग झोन (एफटीडब्ल्यूझेड) आधीच कार्यरत आहे. हे ऑपरेशनल युनिट्स वेअरहाउसिंग, फूड प्रोसेसिंग, मॅन्युफॅक्चरिंग आणि ट्रेडिंग यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये विभागलेले आहेत. सेझ जमिनीच्या ६० वर्षांच्या भाडेपट्ट्यासाठी पारदर्शक ई-निविदा -ई-लिलाव प्रक्रिया गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. ११६ एकरसाठी नुकत्याच झालेल्या ई-लिलावात २१ बोलीदारांनी १५ भूखंडांसाठी बोली सादर केली. विशेष म्हणजे राखीव किंमतीपेक्षा वरच्या प्लॉट्सच्या बोलीमध्ये एकूण १५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. इन्व्हेस्टमेंट फॉर मिनिस्ट्री ऑफ कॉमर्सने सेझमधील एक एकर जमीनसाठी तीन कोटींचा दर निश्चित केला आहे. मात्र त्यानंतरही काही भूखंडांसाठी राखीव किंमतीपेक्षा ४० टक्के पेक्षा जास्त बोली प्राप्त झाली असल्याची माहिती सेठी यांनी दिली. ई-लिलावानंतर जेएनपीएने १४ यशस्वी बोलीदारांना १४ भूखंडांच्या वाटपासाठी लेटर्स ऑफ इंटेंट जारी केले आहेत.

# प्रासंगिक करारासाठी नवीन गाड्यांची मागणी

**। श्रीवर्धन । वार्ताहर।**

सध्या शाळांच्या शैक्षणिक सहली, लग्न सराईचा हंगाम सुरु आहे. यासाठी एसटी बसेसला मागणी वाढली आहे. मात्र पुरेशा प्रमाणात त्या उपलब्ध होत नसल्याने प्रवाशांनमध्ये नाराजी आहे.

महामंडळाच्या ताफ्यात आलेल्या काही नवीन गाड्या या खासगी असून त्यावर चालक खासगी कंपनीचा व वाहक मात्र एस.टी.महामंडळाचा असतो.

या गाड्या नवीन तर आहेतच, परंतु पुश बॅक सीट्स व अन्य सोयीसुविधांमुळे प्रवासासाठी आरामदायी असल्याने या गाड्यांना अधिक मागणी आहे, मात्र त्या गाड्या देण्यात येत नसल्याचे समोर आले आहे.

नियमांत काही बदल करुन नवीन बसेस प्रासंगिक करारासाठी मिळाव्यात, अशी मागणी आहे.

# प्रशिक्षण कार्यक्रमाकरिता इच्छुकांनी अर्ज करावेत

**। रायगड । वार्ताहर।**

मत्स्यव्यवसाय विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या सहा महिने मुदतीचे सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन, डिझेल इंजिन देखभाल व परिचलन प्रशिक्षण सुरु होत आहे. मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र रायगड-अलिबाग येथे पार पडणाऱ्या प्रशिक्षण सत्रासाठी रायगड जिल्ह्यातील युवकांनी ३१ डिसेंबर २०२३ पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी गणेश टेमकर यांनी केले आहे.

या प्रशिक्षणांतर्गत प्रशिक्षणार्थींना मत्स्यप्रबोधिनी या प्रशिक्षण नौकेद्वारे सागरी सफरीवर नेऊन प्रात्यक्षिक व सिध्दांतिक ज्ञान दिले जाणार आहे.

प्रशिक्षण कालावधी ०१ जानेवारी २०२४ ते ३० जून २०२४ (६ महिने) आहे. आवश्यक पात्रता-उमेदवाराचे वय १८ ते ३५ वर्ष असावे, (आधारकार्ड व रेशनकार्ड छायाप्रत जोडणे), उमेदवार किमान चौथी पास असणे आवश्यक, (शाळा सोडल्याच्या दाखल्याची छायाप्रत जोडणे), क्रियाशील मच्छिमार व किमान एक वर्ष मासेमारीचा अनुभव असावा, (विहित नमुन्यातील अर्जावर मच्छिमार सहकारी संस्थेची शिफारस घ्यावी), उमेदवारास पोहता येणे आवश्यक आहे. प्रशिक्षण शुल्क- प्रतिमहा रुपये ४५० प्रमाणे सहा महिन्यांचे २ हजार ७०० रुपये, दारिद्रय रेषेखालील असल्यास प्रतिमहा रुपये १०० प्रमाणे सहा महिन्यांचे रुपये ६०० आहे.

पान १ वरून

## शेतकऱ्यांची निराशा

शहापूर येथे औद्योगिक क्षेत्रातील ७६३ हेक्टरच्या शेतजमिनीवर सिनार मास नावाचा प्रस्तावित प्रकल्प येणार आहे. या प्रकल्पापर्यंत पोहोचण्यासाठी जमीन भुसंपादनाची प्रक्रिया वेगात व्हावी, यासाठी हालचाली सुरु झाल्या आहेत. मात्र जमिनीचा अधिक मोबदला मिळाला पाहिजे, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

शेकापचे नेते आ. जयंत पाटील यांनी विधानपरिषदेत शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत आवाज उठवला. त्यांच्या या भूमिकेनंतर पालकमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी १६ डिसेंबरला शेतकऱ्यांसमवेत बैठक घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार अलिबागमधील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात ही बैठक उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी एमआयडीसीचे प्रधान सचिव अर्शदीप कांबळे, जिल्हाधिकारी योगेश म्हसे, पी. डी. मलिकनेर, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील व काही शेतकरी उपस्थित होते.

प्रकल्पाला आमचा विरोध नाही, परंतु जमिनीला योग्य मोबदला मिळावा, अशी मागणी आहे. त्यावर पालकमंत्री उदय सामंत म्हणाले की, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प उभा करण्याचा प्रयत्न आहे. भूसंपादनाचा दर प्रति हेक्टरी सुमारे ७० लाख अथवा त्यापेक्षा अधिक देण्याचा प्रयत्न असणार आहे. २०१३ च्या भुसंपादन कायद्यानुसार दर देणे कंपनीला परवडणार नाही. मात्र शेतकऱ्यांना चांगला दर मिळावा, यासाठी संबंधित कंपनीच्या अधिकारी, एमआयडीसीच्या अधिकाऱ्यांसमवेत चर्चा करून देण्याचा प्रयत्न करू, असे आश्वासन सामंत यांनी दिले. स्थानिकांना रोजगार, मागणीनुसार विकसीत भुखंड दहा टक्के व अविकसित भूखंड १५ टक्के दिला जाणार आहे. ज्यांना हवे त्यांचे पुनर्वसन केले जाणार आहे, असा प्रस्ताव सामंत यांनी मांडला.

या प्रस्तावाला काही शेतकऱ्यांनी विरोध केला. २०१९ नंतर सुमारे एक कोटी रुपयांपेक्षा अधिक भाव मिळेल अशी चर्चा होती. आता मात्र ६५ ते ७० लाख रुपये हेक्टरी देण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे या प्रस्तावात तफावत असल्याचे शेतकऱ्यांनी पालकमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिल्याने पालकमंत्र्यांसह प्रशासनाची चांगलीच पंचायत झाली. याबाबत कायदेशीर बाबी तपासून निर्णय घेतला जाईल असे पालकमंत्री यांनी मोगम उत्तर देत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.

### काही शेतकऱ्यांना बैठकीचे आमंत्रणच मिळाले नाही

शहापूर येथील प्रस्तावित प्रकल्पाच्या भूसंपादनाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. मात्र या बैठकीचे आमंत्रण काही शेतकऱ्यांना मिळाले नाही, अशी तक्रार पालकमंत्र्यांकडे करण्यात आली. त्यामुळे या बैठकीत मोजकेच शेतकरी उपस्थित राहू शकले.

प्रकल्पाला शेतकऱ्यांचा विरोध नाही आहे. मात्र बाजारभावाप्रमाणे शेतकऱ्यांना जमिनीचा दर मिळावा ही मागणी आहे. पालकमंत्री यांनी प्रति हेक्टरी ६५ ते ७० लाख रुपये देण्याचा प्रस्ताव मांडला. मात्र हा दर फारच कमी आहे. शेतकऱ्यांनादेखील परवडले पाहिजे. मुल्यांकन करून जास्तीत जास्त दर द्यायला पाहिजे.

**सुधीर थळे - माजी सदस्य**
**पंचायत समिती, अलिबाग**

## शरद पवार हेच मराठा आरक्षणाचे विरोधक

समाजांना झुंजवत ठेवण्यात जास्त रस आहे. लोक झुंजत राहिले, तर आमच्याकडे नेतेपद राहील, ही पवारांच्या राजकारणाची पद्धत राहिली आहे, असे फडणवीस यांनी म्हटले.महाविकास आघाडीची सत्ता असताना सुप्रिया सुळे म्हणायच्या की, राज्यात मराठा आरक्षणाशिवाय दुसरे प्रश्न नाहीत का. भाजपचे सरकार असताना मराठा समाजाला आरक्षण मिळाले ते सर्वोच्च न्यायालयात टिकलंही, पण सरकार गेल्यानंतर मराठा आरक्षणावर स्थगिती आली. मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी भाजप सर्वतोपरी प्रयत्न करेल. पण कुठल्याही परिस्थितीत ओबीसी समाजावर अन्याय होऊन देणार नाही, हे भाजपचे वचन आहे, असेही ते म्हणाले. भाजपमधील ओबीसी आणि मराठा कार्यकर्त्यांना आपल्या समाजाची बाजू योग्य वाटणे साहजिक आहे. पण दोन्ही

समाजाच्या कार्यकर्त्यांनी आपला पक्ष आपल्या समाजाला न्याय देईल, यावर विश्वास ठेवावा. कोणत्याही परिस्थितीत सम ाजात विभाजनाचे लोण पसरुन देऊ नका, असे आवाहन त्यांनी केले.

## सुरेश लाड यांच्या हाती कमळ

त्यावेळी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महिला प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ, मंत्री रवींद्र चव्हाण,माजी मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह भाजपचे रायगड जिल्ह्यातील स्थानिक आमदार उपस्थित होते.

लाड यांच्यासोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा कार्याध्यक्ष तानाजी चव्हाण, रायगड जिल्हा परिषदेचे माजी सभापती, नरेश पाटील, कर्जतचे माजी नगराध्यक्ष शरद लाड, राजेश लाड, खालापूर तालुका महिला अध्यक्ष श्वेता मनवे, खालापूर तालुका अध्यक्ष संदीप पाटील, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष राजेश हजारे, तालुका कार्याध्यक्ष विजय हजारे, राष्ट्रवादी युवक कार्याध्यक्ष जगदीश ठाकरे, उद्योजक राम राणे, कर्जत युवक तालुका अध्यक्ष सागर शेळके, राष्ट्रवादी युवती मोर्चा कोकण संघटक प्रतीक्षा लाड, कर्जत अल्पसंख्याक शहराध्यक्ष बिलाल आढाल, कर्जत शहर माजी अध्यक्ष नंदकुमार लाड, माजी सरपंच वेणगाव देविदास बडेकर, होणाड ग्रामपंचायत उपसरपंच समीर देशमुख, माजी उपसरपंच सुनील सुखदरे, गोरठण ग्रामपंचायत माजी उपसरपंच राकेश जाधव, कर्जत शहरातील कृष्णा जाधव यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

## अरबी समुद्रात भारतीय नौदलाची मोठी कारवाई

विमानाने शुक्रवारी सायंकाळी माल्टाचा झेंडा असलेल्या एमव्ही रुएन या जहाजाला समुद्री चाच्यांच्या अपहरणापासून वाचवले. या जहाजाकडून मदत मागितली गेल्यानंतर या भागात सागरी गस्ती विमान (एसएआर) आणि एडनच्या आखातात तैनात एक युद्धनौका एमव्ही रुएन जहाजाला वाचवण्यासाठी पाठवण्यात आले. अपहरण करण्याचा प्रयत्न होत असल्याची माहिती अधिकाऱ्यांना गुरुवारी मिळाली आणि भारतीय नौदलाने शुक्रवारी घटनास्थळी मदत पाठवली.

भारतीय नौदलाने तातडीने त्या जहाजाचा शोध घेण्यासाठी आणि मदत करण्यासाठी या भागात गस्त देणारे आपले नौदल सागरी गस्ती विमान पाठवले. अशा लुटमारीच्या घटना रोखण्यासाठी युद्धनौका देखील पाठवण्यात आली. १५ डिसेंबरच्या सकाळी गस्ती विमान अपहरण झालेल्या जहाजावर फिरत होते आणि अपहरण झालेल्या मालवाहू जहाजावर सतत लक्ष ठेवून होते. हे जहाज आता सोमालियाच्या किनाऱ्याकडे जात आहे.

स्पेनमध्येच्या संयुक्त संचालन केंद्राने सांगितले की, गुरूवारी कथित समुद्री चाच्यांकडून अपहरण करण्यात आलेले जहाज एम व्ही रुएनकडून एक अलर्ट मिळाला होता. हे मलावाहक जहाज एम व्ही रुएन सोमालियाकडे जात होतं. यादरम्यान गुरुवारी त्याच्यावर हल्ला झाला होता. युकेच्या व्यापार संचालनाने सांगितलं की, चालक दलाने जहाजावरील नियंत्रण गमावलं होतं.

कुठल्याही जहाजावर ताबा मिळवण्याची ही घटना २०१७ नंतर सोमाली समुद्री चाच्यांकडून करण्यात आलेली सर्वात मोठी घटना आहे. अनेक देशांकडून समुद्री चाच्यांना रोखण्यासाठी प्रयत्न केल्यानंतर एडनच्या खाडीत आणि हिंदी महासागरात अशा प्रकारच्या घटनांना आळा बसला आहे.

## माथेरान घाटात अपघात, चार पर्यटक जखमी

अपघात झाल्याचे बोलले जाते.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दुर्लक्षामुळे हा अपघात झाला असून, या अगोदरदेखील अशाच प्रकारे येथून दहा ते बारा गाड्या खाली पडल्याचे टॅक्सी चालक मालक युनियनचे उपाध्यक्ष रवींद्र मिसाळ यांनी सांगितले.

## प्रत्येकाला ५०० स्क्वेअर फुटांचे घर द्या-ठाकरे

त्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते. त्यामुळे हे पाप देवेंद्र फडणवीसांचे आहे असा आरोपही त्यांनी केला.

कोरोनाचे संकट ज्यावेळी आलं होतं त्यावेळी धारावीच्या परिस्थितीवरून देशभर टेन्शन होतं. पण धारावी कोरोनाशी लढली, त्यावेळी आम्ही कुणालाही पात्र आणि अपात्र ठरवल नाही. पण आता पुनर्विकासाच्या निमित्ताने अनेकांना अपात्र ठरवणार आहेत.

या सरकारमध्ये निवडणूक घेण्याची धमक नाही, असा आरोप ठाकरे यांनी केला. १९६० साली संयुक्त महाराष्ट्राच्या माध्यमातून मुंबई महाराष्ट्राला मिळवून दिली. त्यावेळी १०५ हुतात्म्यांनी रक्त सांडलं. ही आम्ही कमावलेली मुंबई आहे, त्याला हात लावाल तर याद राखा असा इशारा ठाकरे यांनी दिला.

# तीन सराईत गुन्हेगार गजाआड

**। पनवेल । वार्ताहर ।**

गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या धडक कामगिरीमुळे तीन सराईत गुन्हेगारांना गजाआड करण्यात आले असून, त्यांच्याकडून आत्तापर्यंत पाच विविध पोलीस ठाण्यांतील गुन्ह्यांप्रकरणी तीन लाखांचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहे.

तक्रारदार जागृती जनार्दन चिखलेकर (५३) ह्या कामोठे बस स्टॉप, केएलई कॉलनी कळंबोली येथून घरी जाण्याकरिता एनएमएमटीची ५८ क्रमांकाची बेलापूर ते खोपोली या बसमध्ये चढत असताना यातील अज्ञात आरोपींनी गर्दीचा फायदा घेऊन त्यांच्या उजव्या हातात घातलेली अडीच तोळे वजनाची सोन्याची बांगडी चोरी केली होती. याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाणे गुन्ह्याची नोंद करण्यात आली होती. सदर गुन्ह्याच्या तपास गुन्हे शाखा कक्ष ०२ पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी यांच्या नेतृत्वाखाली सपोनि प्रविण फडतरे, पोलिस उपनिरीक्षक मानसिंग पाटील, दिलीप भंडे, सुनिल गिरी, आदींच्या पथकाने केला. गोपनिय बातमीदाराकडून माहिती प्राप्त करून आरोपी शाहिद आसमोहम्मद आलवी (३८), वसिम इस्तियाक अन्सारी ( ३०), तन्वीर इक्बाल चौधरी (३६) यांना अटक केली आहे. एकूण ५ गुन्हे उघडकीस आले असून, त्यांच्याकडून ३ लाख रूपये किमतीचे ५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत केले.

## वडील रिक्षाचालक, आई गजरे विकते

# मुलाने परदेशात मिळवली डॉक्टरेट

## गरिबीवर मात करत उरणच्या सागरचे यश

। उरण । वार्ताहर ।

शिकायची इच्छा असेल तर आर्थिक कमतरता किंवा गरिबी अडथळा होऊ शकत नाही, मदतीसाठी समाजही मागे नसतो हे उरणच्या डॉ. सागर अडतराव याच्या उदाहरणाने सिद्ध केले आहे. वडील रिक्षाचालक तर आई गजरे विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणारी, त्यामुळे अतिशय गरीब कुटुंबात जन्मलेल्या सागर अडतराव या उरणच्या बोरी येथे राहणाऱ्या बुद्धिमान मुलाने नेदरलँडमधून डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी ही पदवी मिळविली आहे.

सागर दहावी आणि बारावीमध्ये तालुक्यात प्रथम आला होता. मेकॅनिकल इंजिनिअर पूर्ण करताना मुंबई विद्यापीठात प्रथम येण्याचा बहुमान त्याने मिळविला होता. पुढे एमई चेन्नई येथे पूर्ण करून तो पीएचडी पूर्ण करण्यासाठी नेदरलँड्स या देशात गेला. आज त्याने ती पदवी यशस्वीरित्या पूर्ण करून परदेशातून पीएचडी पूर्ण करणारा तो उरण तालुक्यातील पहिला मुलगा ठरला आहे.

या खडतर प्रवासात माजी आमदार मनोहर भोईर यांनी वेळोवेळी आर्थिक मदतीचा हातभार दिला. उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार यांनी वेळोवेळी मार्गदर्शन आणि आर्थिक मदतदेखील केली. तसेच उरणमधील अनेकांनी सागरला मदतीचा हाभार दिला. सागरने याचे चीज करून डॉक्टरेट पदवी मिळविण्यात यशस्वी झाला. सागरच्या या यशाबद्दल त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. यामुळे सागरने उरणचे नावही रोशन केले आहे.

वडिलांनी रिक्षा चालवून, तर आईने गजरे विकून मिळणाऱ्या तुटपुंज्या कमाईवर सागरला शिकविले. जन्मताच हुशार असलेनस सागर आपल्या गरिबीवर मात करून सर्वांच्या सहकार्याने डॉक्टरेट पदवी मिळविण्यात यशस्वी झाला आहे. याचा आदर्श इतर मुलांनी नक्कीच घ्यावा.

## ठेकेदाराच्या मनमानीचा ओलमणवासियांना फटका

# नळपाणी योजना बारगळली

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील ओलमण या आदिवासीबहुल गावातील नळपाणी योजना ठेकेदाराच्या मनमानीमुळे रखडली आहे. जलजीवन मिशनमधील या योजनेच्या कामाचे कार्यादेश जून २०२१ मध्ये देण्यात आले होते आणि मुदत संपून गेली तरी योजनेचे जेमतेम काम पूर्ण झाले, त्या बदल्यात ३० टक्के बिल अदा करण्यात आले आहे. दरम्यान, लघुपाटबंधारे विभाग यांनी या कामाबद्दल जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभगाचे कार्यकारी अभियंता यांना हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे, तर ठेकेदाराला अनेकदा नोटिसा देऊनदेखील काम पुढे जात नसल्याने ओलमण ग्रामस्थांच्या डोक्यावरील हंडा हातात येण्याची चिन्हे नाहीत.**

### ■ मुदतवाढ देऊनही काम अद्याप अपूर्णावस्थेत

तालुक्यातील ओलमण गावात अनेक वर्षे पिण्याच्या पाण्याची समस्या आहे. ती समस्या दूर करण्यासाठी जलजीवन मिशनमधून नळपाणी योजना मंजूर करण्यात आली होती. या नळपाणी योजनेचे कामासाठी ६७ लाख ४२ हजारांचा निधी मंजूर होता. तेथील सावतपाडा भागातील लघुपाटबंधारे विभागाच्या विहिरीवर उद्भव आणि तेथून चढावावर असलेल्या ओलमण गावात पाणी नेऊन घरोघरी पाणी देण्याची योजना बनविण्यात आली होती. या योजनेचे कामाचे कार्यादेश जून २०२१ पर्यंत देण्यात आले होते. यावर्षी या योजनेचे काम पूर्ण करण्याची मुदतदेखील संपली आहे. मात्र, योजनेचे काम संथगतीने सुरू असल्याने रायगड जिल्हा परिषदेच्या लघुपाटबंधारे विभागाकडून डिसेंबर २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. मात्र, मुदतवाढ देऊन पाच महिन्यांचा कालावधी लोटला तरी ओलमण नळपाणी योजनेचे काम पुढे जाताना दिसत नाही. या नळपाणी योजनेतील जलवाहिन्यांशिवाय अन्य कोणतेही काम ठेकेदाराने केले नाही. त्यामुळे नळपाणी योजनेचे काम रखडले असून, ठेकेदाराला संबंधित विभागाकडून अनेक नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र, ठेकेदाराने त्या सर्व नोटिसांना केराची टोपली दाखवली असून, या ठेकेदाराने मनमानी करीत ओलमण नळपाणी योजनेचे काम पूर्णपणे थांबवून ठेवले आहे.

या नळपाणी योजनेसाठी आणण्यात आलेल्या जलवाहिन्या या टाकण्यासाठी रस्त्याच्या कडेने खोदकाम केले आहे. पावसाळा सुरू होण्याआधी खोदलेल्या खड्ड्यात जलवाहिन्यादेखील टाकण्यात आलेल्या नाहीत. तर अन्य कोणतेही कामे ठेकेदाराने केली नाहीत. त्यामुळे संबंधित ठेकेदारावर कारवाई करावी, अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ करीत आहेत. ग्रामस्थांच्या मागणीनंतर जिल्हा परिषदेचे कर्जत उपविभागीय उपअभियंता यांनी ओलमण येथे जाऊन पाहणी केली. मात्र, ठेकेदाराची मनमानी जिल्हा परिषद प्रशासन आणि जनतेसमोर पुन्हा आली असून, ठेकेदाराच्या मनमानीमुळे ओलमण नळपाणी योजना रखडल्याचे दिसून आले.

> **संबंधित कामाचे ठेकेदार आमच्या सूचना आणि नोटीस यांना कोणतेही उत्तर देत नाही आणि त्या नोटीसनुसार कार्यवाहीदेखील करीत नाहीत. त्यामुळे आम्ही आता रायगड जिल्हा परिषदेचे लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता संजय वेंगुर्लेकर यांना पत्र देणार असून, संबंधित ठेकेदाराला आपल्या माध्यमातून सूचना देण्यात याव्यात आणि ही योजना मार्गी लागावे यासाठी विनंती करणार आहोत.**
> **– अनिल मेटकरी, शाखा अभियंता**

# सोमवारी शेतकऱ्यांचा मोर्चा

## एमआयडीसीविरोधात उपविभागीय कार्यालयावर धडकणार

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील प्रस्तावित डोलवी औद्योगिक विकास प्रकल्पासाठी महाराष्ट्र राज्य औद्योगिक विकास महामंडळामार्फत भूसंपादन होणार आहे. या भूसंपादनाच्या विरोधात येथील शेतकरी १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता हजारोंच्या संख्येने शेतकरी उपविभागीय कार्यालयावर येथे मोर्चाने धडकणार आहेत.

तालुक्यातील डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी कारावे, गडब, डोलवी, वडखळ, बोरी ग्रामपंचायत परिसरातील बेणेघाट, कोलवे, वावे, डोलवी, खारकारावी, कारावे, खारमांचेळा, खारघाट, खारचिर्बी, खारजांभेळा, खारढोंबी, जुईबापुजी या गावांतील २१२० एकर जागा संपादन करण्याचे ठरवले आहे. त्या प्रकारच्या नोटिसादेखील प्रांत कार्यालयातून काढण्यात आलेल्या आहेत. ४१८ एकर जेएसडब्ल्यू आणि १६५ एकर सरकारी जमीन वगळता १५३७ महाराष्ट्र शासनाने नियोजित डोलवी औद्योगिक प्रकल्पाकरिता सुमारे २१०० एकर जमिनीसाठी अधिसूचना काढली आहे. जेएसडब्ल्यू कंपनी अरेरावी, दांडगाई करून स्थानिकांना चिरडण्याच्या हेतूने कटकारस्थान रचत असल्याने या प्रवृत्तीला पायबंद घालणे गरजेचे आहे. असे न केल्यास भविष्यात स्थानिकांना परप्रांतियांसारखे जगावे लागेल. स्वतःच्या अस्तित्वासाठी हा मोर्चा काढत असल्याचे म्हणणे बाधित शेतकऱ्यांचे आहे.

या मोर्चाद्वारे शेतकऱ्यांनी पाच मागण्या शासनाकडे केल्या आहेत. १. प्रस्तावित डोलवी एमआयडीसीकरिता काढण्यात आलेली ११ गावांसाठीची भूसंपादनाची अधिसूचना पूर्ण रद्द करावी. २. खाऱ्या पाण्याने भिजलेल्या शेतीची नुकसान भरपाई मिळावी. त्याचप्रमाणे खाडीच्या बाह्यकाठ्याची व शेतीच्या अंतर्गत बांधबंधिस्तीची दुरूस्ती करावी. ३. ग्रामपंचायत हद्दीतील सरकारी जागा व खाजण तेथील ग्रामस्थांच्या विकास कामाकरिता (गावठाण विस्तार, क्रीडांगण, समाजमंदिर इत्यादीसाठी राखीव ठेवणे. त्या जागा कंपनीस विक्री अगर भाड्यापट्याने देऊ नये. ४. जेएसडब्ल्यूच्या वाढीव औद्योगिकीकरणामुळे प्रदूषण व पर्यावरणाची मोठी समस्या निर्माण झाली आहे. भविष्यात गावे उठवावी लागणार आहेत. त्यामुळे शासनाने अशा प्रदूषणकारी जेएसडब्ल्यू कंपनीस वाढीव औद्योगिकीकरणास परवानगी देऊ नये. ५. हेटवणे धरणाचे पाणी सिंचनासाठी देऊन शेती दुपिकी करावी.

सोमवार दि. १८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता रामवाडी हुतात्मा विनायक पांडुरंग कोल्हटकर स्मारक रामवाडी येथून मूक मोर्चाला सुरूवात होऊन हा मोर्चा उपविभागीय कार्यालयात (प्रांत कार्यालय) हजारोंच्या संख्येने धडकणार आहे.

# पोलीस ठाणे हद्दीचा फलक हरवला झुडपात

**। नागोठणे । वार्ताहर ।**

डोलवी (ता. पेण) येथील जेएसडब्ल्यू स्टील लि. या कंपनीच्या सहकार्याने नागोठणे-रोहा मार्गावरील भिसे खिंडीत बसविण्यात आलेला पोलीस ठाणे हद्द सुरु झाल्याचा व हद्द समाप्तीचा व संबंधित पोलीस ठाण्याची दूरध्वनी, मोबाईल संपर्क क्रमांकाची माहिती दर्शविणारा फलक झुडपात हरविला आहे. त्यामुळे या फलकाभोवती वाढलेली झाडेझुडपे तोडून फलक दिसेल असा मोकळा करावा किंवा फलकाची जागा बदलून

तो इतर ठिकाणी बसविण्याची गरज निर्माण झाली आहे.

डोलवी (ता. पेण) येथील जेएसडब्ल्यू स्टील लि. कंपनीच्या सीएसआर विभागामार्फत जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्याच्या इमारतीला नामफलक, बॅरिकेट्स, हद्दीचे फलक तसेच इतर अनेक आवश्यक ते फलक व साधने पुरविण्यात आली आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नागोठणे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील व नागोठणे-रोहा मार्गावर असलेल्या भिसे खिंडीच्या मध्यावर नागोठणे पोलीस ठाण्याची हद्द सुरू व समाप्त झाल्याचा तसेच रोहा पोलीस ठाण्याची हद्द सुरु व समाप्त झाल्याचा फलक जेएसडब्ल्यू कंपनीकडून लावण्यात आला आहे. नागोठणे-रोहा मार्गावर भिसे खिंडीतील मध्यापासून एका बाजूला नागोठणे पोलीस ठाणे व दुसऱ्या बाजूला रोहा पोलीस ठाण्याची हद्द आहे. भिसे खिंडीतील याचमध्यावर उभारण्यात आलेल्या या फलकाच्या बाजूला झाडेझुडपे वाढल्याने हा फलक दिसत नसल्याने आपत्कालीन परिस्थितीत या फलकाचा वाहन चालकांना व प्रवाशांना उपयोग होईल का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे यावर जेएसडब्ल्यू प्रशासनाने तातडीने योग्य ती कार्यवाही करुन आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणी प्रवाशांतून होत आहे.

## पुरस्कार वितरण

**। उरण । वार्ताहर ।**

पारसकाव्य, कला, जनजागृती संस्था (रजि.) सानपाडा, नवी मुंबईतर्फे राज्यस्तरीय खुली काव्य लेखन स्पर्धा पारितोषिक वितरण व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन शुक्रवार, दि.२२ डिसेंबर रोजी दुपारी तीन वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन, सेक्टर-१० सानपाडा, नवी मुंबई, जुईनगर रेल्वे स्टेशन (प.) जवळ करण्यात आले आहे. पुरस्कार सोहळ्याचे हे १३ वे वर्ष असून, अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक पुंडलिक म्हात्रे भूषविणार आहेत.

# ॲड. मंगेश नेने यांना आंतरराष्ट्रीय पुरस्कार

**। पेण । प्रतिनिधी ।**

ॲड. नेने तथा पेण युथ आयकॉन, कोकण यूथ आयकॉन यांना आंतरराष्ट्रीय एक्सलन्स अवॉर्ड जाहीर करून त्यांच्या पुरस्काराच्या यादीत आणखी एका पुरस्काराची भर पडली आहे. पेण एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर आंतरराष्ट्रीय एक्सलन्स अवॉर्ड पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण सोहळ्यात पत्रकारिता तसेच इतर क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या कर्तृत्वान महिला व पुरूषांना सन्मानित करण्यात येणार आहे.

ॲड. मंगेश नेने यांनी शैक्षणिक क्षेत्रात तथा क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पेण एज्युकेशन सोसायटी या ११३ वर्षांच्या शैक्षणिक संस्थेची धुरा गेली सात वर्षे समर्थपणे सांभाळत आहेत, तर हौसी स्विमिंग असोसिएशनचे ते तालुका अध्यक्ष आहेत. तालुका कुस्ती विकास संघाचे ते गेली दहा वर्षे सदस्य आहेत. तसेच इतरही खेळासाठी ते भरीव काम करत आहेत. त्यांच्या या कामाची दखल घेत त्यांना आंतरराष्ट्रीय एक्सलन्स अवॉर्ड देण्यात येत आहे.

पुरस्कार सोहळ्याचा कार्यक्रम रविवार, दि. ७ जानेवारी २०२४ रोजी पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सकाळी दहा वाजता पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे पर्यटन मंत्री तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, खा. श्रीरंग बारणे, शेकाप ज्येष्ठ नेने जे.एम. म्हात्रे, संपादक विवेक मेहत्रे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

# वडगावमध्ये बोगस एनएच्या नावावर भूखंड विक्री जोरात

**। पेण । प्रतिनिधी ।**

आयुष्यात प्रत्येकाला हक्काचा निवारा हवा असतो. त्यासाठी जीवाचे रान करून पै-पै करीत गोळा केलेला पैसा भूखंड खरेदीसाठी खर्च करण्यात येतो. काही जण बँकेतून कर्ज घेतात. परंतु, भूमाफिया बोगस एनएच्या नावावर भूखंड विक्री करीत फसवणूक करीत आहेत. पेण शहरातील मलेघर ग्रामपंचायतीच्या हद्दीत असणाऱ्या वडगावमध्ये अनधिकृतरित्या खुलेआमपणे कृषीक जमिनीचे तुकडे पाडून त्याची विक्री करण्याचे प्रकार सर्रास सुरू आहेत. तरी, दलालांच्या कोणत्याही भूलथापांना बळी पडू नये, असे आवाहन माजी सरपंच शोमेर पेणकर आणि विद्यमान सरपंच अश्लेषा पेणकर यांनी केले आहे.

**दलालांच्या भूलथापांना बळी पडू नका : पेणकर**

वडगाव हे महसुली गाव असून, हे गाव पूर्णपणे नव्याने विकसित होत आहे. परंतु, दलाल लोकांनी स्वतःच्या हितासाठी अनेकांना फसवले असून, तुकडाबंदी असतानादेखील चुकीच्या पद्धतीने जागा विकसित करून विकायला सुरूवात केली आहे. त्यामुळे वडगावातील विकासकामे ठप्प झाली आहेत, अशी माहिती शोमेर पेणकर आणि अश्लेषा

पेणकर यांनी दिली.

ते म्हणाले की, दलाल लोक कृषीक जमिनीचे तुकडे पाडून खुलेआम विकत आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, ही जमीन विक्री करायची असेल तर एन.ए (नॉन ॲग्री कलचर लँड म्हणजेच अकृषीक प्रयोजनात) रुपांतरण करणे गरजेचे असते. असे करत असताना प्लॉट पाडून अभिन्यास (लेआऊट) करून घेणे नंतरच प्लॉट (भूखंड) विकायचे असतात. मात्र, वडगावमध्ये कृषीक जमिनीचे प्लॉट पाडून जमिनी विकल्या जात आहेत. त्यामुळे चुकीच्या पध्दतीने रस्त्यांचे लेआऊट काढले जातात. एन.ए जमिनीत साधारणतः नऊ मीटरचा रस्ता असतो. या रस्त्यामध्ये लाईट, सांडपाणी याची व्यवस्था करता येते, परंतु दलाल लोक स्वतःच्या फायद्यासाठी चार मीटरचा रस्ता दाखवतात. तसेच जमीन एन.ए. झाली नसल्याने राखीव भूखंड दाखवला जात नाही. दलाल स्वतःचा फायदा करून निघून जातात; परंतु भविष्यात नागरी समस्यांना येथील रहिवाशांनाच सामोरे जावे लागणार असते. पेणकर म्हणाले की, भविष्यात वडगाव हा सुनियोजित गाव विकसित होण्यासाठी काही कठोर पावले आम्ही उचलणार आहोत. त्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांना पत्रव्यवहार करून विनंती केली जाईल. तसेच वडगाव हद्दीतील खरेदीखत असताना घेतलेली जमीन कृषीक आहे की अकृषीक हे पाहून घ्यावे, अशी विनंती सबरजिस्टरला करणार आहोत. भविष्यात पूरसदृश्य परिस्थिती, वाहतूक कोंडी, सांडपाण्यामुळे आरोग्याची समस्या होऊ नये, यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देणार असल्याचे ते म्हणाले.

## उरणमध्ये श्वानांवर ॲसिडहल्ला

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील वेश्वी-दादर पाडा गावात अज्ञात समाजकंटकांनी २२ कुत्र्यांवर ॲसिड टाकून जखमी केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली आहे. या जखमी कुत्र्यांपैकी तीन कुत्र्यांचा मृत्यू झाला आहे. तर, १९ कुत्र्यांवर उपचार सुरू आहेत.

**हल्ल्यात २२ श्वान गंभीर जखमी**

श्वानप्रेमी सुनील मढवी यांना २१ आणि २२ नोव्हेंबरच्या दरम्यान परिसरातील बऱ्याच कुत्र्यांच्या अंगावर भाजल्याच्या जखमा दिसून आल्या. त्यानंतर त्यांनी याची माहिती हँड्स हेलला दिल्यानंतर १४ कुत्र्यांना पकडून कल्हे येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. जखमी कुत्र्यांपैकी तीन कुत्र्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी बुधवारी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलीस तपास करत आहेत.

## पत्रकारांसाठी आरोग्य तपासणी शिबीर

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

पत्रकार दैनंदिन घडणाऱ्या घडामोडी गोरगरीबांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात न्याय मिळवून देण्यासाठी रात्रंदिवस मेहनत घेतात. वेळेवर आहार, विहार न केल्यामुळे अनेकव्याधीनेग्रासलेजातात. यादरम्यान वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे जीव गमवावा लागले आहे. कुटुंब आर्थिक संकटाला समोरे जात आहे. ही गंभीर समस्या लक्षात घेत माधवबाग या आयुर्वेदीक रूग्णालयाच्या आरोग्यम हृदयसंपदा उपक्रमांतर्गत खालापूर प्रेस क्लबच्या माध्यमातून मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते.

रायगड जिल्ह्यातील पत्रकारांनी या तपासणी शिबिरात भाग घेतला. यावेळी माधवबाग हॉस्पिटलचे जनसंपर्क अधिकारी सुशांत पिसाळ, डॉ.तेजश्री यादव, अरुण यादव, राहुल बी, रवी, डॉ. स्नेहल डोंगरे, आर. ओ.सचिन कदम पंचकर्म विभाग निलेश

**माधवबाग आयुर्वेदीक रूग्णालयाचा पुढाकार**

,मेडिकल विभाग सुनील ,धनंजय यासह स्नेहल व तृप्ती व सहकारी स्वच्छता विभाग तानाजी तेजु यासह अन्य माधवबाग टीमने पत्रकारांच्या शिबिरासाठी मेहनत घेतली.

यावेळी प्रेस क्लबचे रायगड जिल्हाध्यक्ष भारत रांजणकर, सचिव शशिकांत मोरे, सल्लागार भाई ओव्हाळ, खालापूर प्रेस क्लब अध्यक्ष प्रशांत गोपाळे, प्रवीण जाधव, अनिल पाटील, एस टी पाटील, रवींद्र मोरे, समाधान दिसले, संतोषी म्हात्रे, सहकारी पत्रकार बाबू पोटे, अरुण नलावडे, जयवंत माडपे, संदीप ओव्हाळ, शेखर जांभळे, अर्जुन कदम, सारिका सावंत, विलास श्रीखंडे सह अन्य पत्रकारांनी माधवबाग आयुर्वेदिक रूग्णालयाच्या व्यवस्थापक रोझी भानुशाली यांचे आभार व्यक्त केले.

## रब्बी हंगामातील शेतीची कामे पूर्ण

# रब्बीसाठी शेतकरी पाण्याच्या प्रतीक्षेत

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

काळ प्रकल्पांतर्ग डोलवहाळ बंधाऱ्याचे पाणी डाव्या कालव्यातून माणगाव तालुक्यातील शेतीला दरवर्षी १५ डिसेंबरदरम्यान सोडले जाते. मात्र, अर्धा डिसेंबर महिना संपला तरी या कालव्यांच्या सफाईची कामे पाटबंधारे विभागाने अद्यापही हाती घेतली नाहीत. दरवर्षीप्रमाणे यंदाही अतिवृष्टीमुळे रायगड जिल्ह्यात या कालव्याला मोठ्या प्रमाणात माती, दगड, गाळ त्याचबरोबर शेवाळ व झाडे, झुडपे वाढली आहेत. त्यामुळे रब्बी हंगामातील पीक घेणारे शेतकरी चिंतेत आहेत. शेतकऱ्यांनी मशागतीची कामे हाती घेतली आहेत; परंतु, पाटबंधारे विभागाला मात्र कालवा सफाई व दुरुस्तीच्या कामाला मुहूर्त अद्याप मिळाला नसल्याने शेतकरी कमालीचा अस्वस्थ झाला आहे.

माणगाव तालुक्यातील शेतकरी चांगलाच रब्बी हंगामाच्या मशागतीच्या कामाला लागला असून, रब्बी हंगामातील पीक घेण्यासाठी आपल्या शेताची मशागतीची कामे करण्यात मग्न झाला. दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही पंधरा डिसेंबरला कालव्याला पाणी सोडले जाते. परंतु, ही डेडलाईन झाली तरी कालवा सफाईची कामे हाती घेतलेली नाही. ती कधी सुरु होणार, हा प्रश्नच शेतकऱ्यांपुढे उभा आहे. यांत्रिक विभागाकडून मशनरी उपलब्ध झाल्यानंतर कालव्याच्या सफाईचे काम जलद गतीने सुरु केले जाईल, अशी माहिती माणगाव पाटबंधारे उपविभागाचे अधिकारी श्रीकांत महामुनी यांनी दिली.

माणगाव तालुक्यातील अनेक शेतकरी भातपीक मोठ्या प्रमाणात घेतात व उर्वरित शेतकरी कडधान्यांची पिके घेतात. कडधान्य पेरलेल्या शेतात पाणी गेल्यानंतर नुकसान होते. त्यामुळे कडधान्य पिकवणारे शेतकरी पाणी सोडण्यास नकार देतात. तर भातपीक घेणारे शेतकरी पाण्याची मागणी करतात. त्यामुळे पाणी सोडण्याबाबत यंदाचे वर्षीही पेच पाटबंधारे विभागापुढे उभारणार आहे. सन २०१८ मध्ये चार हजार ९५३ हेक्टर सिंचनापैकी भातशेती, फळबागा व कलिंगडे, भाजीपाला यासाठी १२४८ हेक्टर सिंचन झाले होते. यंदाचे वर्षी माणगाव शाखेवर ७९.३२ हेक्टर जमिनीवर, तर मोर्बा शाखा ६१.२३ हेक्टर जमिनीवर सिंचन करण्यात आले होते.

### असे होते पाण्याचे वाटप

**रोहा तालुक्यातील कुंडलिका नदीवर काळ प्रकल्पांतर्गत डोलवहाळ येथे बंधारा बांधण्यात आला आहे. १९७४मध्ये प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. १९७६ पासून प्रत्यक्ष सिंचन सुरु झाले. त्यानुसार बंधाऱ्यातील पाण्याची विभागणी करण्यात आली. औद्योगिक वापरासाठी सत्तेचाळीस ४७ दशलक्ष घनमीटर, पिण्यासाठी ७.६५, सिंचनासाठी १५६.४२ दशलक्ष घनमीटर इतकी तरतूद करण्यात आली आहे. भिरा येथील टाटा जलविधुत केंद्रातून वीजनिर्मितीनंतर वर्षाकाठी उपलब्ध होणाऱ्या ६६४०६९४ दशलक्ष घनमीटर पाण्यापैकी एकशे तीन दशलक्ष घनमीटर पाण्याचा सिंचनासाठी वापर होतो.**

**कालव्याकडे शेतकऱ्यांचे लक्ष**

> **कालव्याची कामे शासनाने वेळीच हाती घेऊन माणगाव तालुक्यातील जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली आल्यास तालुका सुजलाम् सुफलाम् होईल. परिणामी, माणगावच्या आर्थिक उत्पन्नाचा स्तर उंचावेल.**
> **– राहुल दसवते, शेतकरी आडघर**

# शासन आपल्या दारी उपक्रमाचे आयोजन

**। रायगड । वार्ताहर ।**

खेड्यापाड्यातील जनतेपर्यंत शासनाच्या विविध योजना पोहोचाव्यात यासाठी शासनातर्फे सर्व पातळ्यांवर प्रयत्न केले जात आहेत. लाभार्थ्यांना पात्रतेनुसार शासकीय योजनांचे लाभ मिळून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, या उद्देशाने शासन आपल्या दारी हा महत्वाकांक्षी प्रकल्प शासनाने हाती घेतला आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या शासकीय कर्तव्याच्या माध्यमातून आणि सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून उत्कृष्ट योगदान द्यावे, असे आवाहन राज्याचे उद्योग मंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत यांनी केले.

यावेळी महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आ. भरत गोगावले, जिल्हाधिकारी डॉ.योगेश म्हसे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.भरत बास्टेवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, जिल्हाधिकारी कार्यालयातील तसेच इतर विविध शासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# औद्योगिक पेन्शनर्स वेल्फेअर असोसिएशनतर्फे रास्ता रोको

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा औद्योगिक पेन्शनर्स वेल्फेअर असोसिएशनच्या जिल्हा कार्यकारिणीची बैठक माणगाव येथे १३ डिसेंबरला झाली. यावेळी केंद्र सरकारच्या धोरणांबाबत व इतर प्रलंबित मागण्यांबाबत पाठपुरावा करून देखील निर्णय घेत नाही. पेन्शनर्सवर अन्याय करण्याची भूमिका सुरु आहे. त्यामुळे पेन्शनर्सने संताप व्यक्त केला. ऑल इंडिया को-ऑर्डिशन कमिटी ऑफ ए.पी.एफ पेन्शनर्स असोसिएशन नवी दिल्ली याच्या आदेशानुसार देशामध्ये रस्ता रोको आंदोलन होणार आहे. त्यानुसार रायगड औद्योगिक पेन्शनर्स वेल्फेअर असोसिएशनच्या वतीने २० डिसेंबर रोजी सकाळी ११.०० वाजता माणगाव एस.टी स्टॅण्ड समोर महामार्गावर संघटनेचे अध्यक्ष बाळकृष्ण अंबुर्ले याच्या नेतृवाखाली रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे. तरी सर्व संभासदानी आंदोलनात सहभागी होऊन संघटनेची ताकद दाखवावी असे आवाहन संघटनेने केले आहे.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक

## जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, शहर अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील सि.स.नं.९५१ अ, ९५१ ब व क ९५१ या बिनशेती मिळकतीवरील, सुभेदार को.ऑप.हौ.सोसायटी, अलिबाग या इमारतीमधील निवासी सदनिका क्र. ११, क्षेत्र ३६० चौ.फुट बिल्टअप (३३.४५ चौ.मी.) व निवासी सदनिका क्र.१२, क्षेत्र ५२० चौ.फुट बिल्टअप (४८.३५ चौ.मी.)(अलिबाग नगरपरिषदेकडे कडील निवासी सदनिका क्र. २०४, व २०५, मालमत्ता क्र. Z1MKT001719) (जुना मालमत्ता क्र. १४५६) क्षेत्र ४९.२३ चौ.मी.)या क्षेत्रफळाची निवासी सदनिका श्री. विनायक विष्णु वीरकर, राहणार अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील सदनिका, सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबुल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर सदनिकेचे विद्यमान मालक व माझे अशिलादरम्यान झाली आहेत. सदर सदनिका पूर्णत: निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित सदनिकेत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १७-१२-२०२३

सही/-
**(ॲड. महेश प्रभाकर वेगुर्लेकर)**
मोतीबाग, जिल्हा न्यायालयासमोर, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड,
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरुन व सांगितलेवरुन त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| मुनवली | ३२/१ | ०-८२-८० | १५.९९ |

या मिळकतीपैकी समीरा किर्ती राठोड व किर्ती दिलीप राठोड यांच्या मालकी व ताबेकब्जा वहिवाटीतील ०.२०.०० हे.आर+ पोट खराबा०-१५-१० हे.आर., एकूण क्षेत्र ०-३५-१० हे.आर.

वर वर्णन केलेली सदरहु मिळकत ही आज रोजी समीरा किर्ती राठोड व किर्ती दिलीप राठोड, रा. मुंबई यांच्या नावे ७/१२ दप्तरी मालकी हक्कात व ताबेकब्जात आहे. माझ्या आशिलांनी सदरहु मिळकतीबाबत मालकी हक्काबाबतचा शोध अहवाल व टायटल सर्टीफिकेट/दाखला माझे कडून मिळावा अशी मागणी केलेली आहे. सदरहु मिळकतीबाबतचा मालकी हक्काचा दाखला देण्यापूर्वी सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतची खात्री करण्याच्या हेतूने मी सदरची जाहीर नोटीस प्रसि करीत आहे. सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, कुळ हक्क, वारसा हक्क, वहिवाटीचे हक्क वा दुरान्वये खालील सही करणार यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून मालकी हक्क निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १६-१२-२०२३

(ॲड. परेश एम. घरत)
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड. ९८५०४८१२३४

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे ताडवागळे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आमचे अशिल यांनी मिळकतीचे विद्यमान मालक श्री.नरेश लक्ष्मण फडतरे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे व त्याबाबत दुय्यम निबंधक कार्यालय अलिबाग यांच्याकडे नोंदणीकृत खरेदीखत याकामी घेण्याचे आहे.

मिळकतीचे वर्णन :- तलाठी सजा पोयनाड हद्दीतील मौजे ताडवागळे, ता.अलिबाग येथील भुमापन क्रमांक व उपविभाग १४, क्षेत्र ०-०५-३० हे.आर, पो.ख.०-०३-८० हे.आर, एकूण क्षेत्र ०-०९-१० हे.आर, आकारणी ०.४५ रूपये पैसे ही मिळकत सदर जाहीर नोटीसचा विषय आहे.

तरी वर नमूद मिळकतीबाबत अन्य कोणत्याही इसमाचा, खरेदीखत नोंदणीकृत/अनोंदणीकृत, पतसंस्थेचा, साठेकरार, कुळवहिवाट, बक्षीसपत्र, मृत्यूपत्र, गहाण, बयाणापावती, तारण, भाडेपट्टा, येण्या जाण्याचा रस्ता या अथवा इतर कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी प्रथम दर्शनी लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्त्यावर सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात सादर कराव्यात. सदर मुदतीत अशा प्रकारच्या कोणत्याही हरकती न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण होईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची याद्वारे नोंद घ्यावी.

अलिबाग,
दि.१६/१२/२०२३

**ॲड.दर्शन यशवंत बैकर**
जिल्हा न्यायालय अलिबाग
मो नं. ९२७०९४७४८४

## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- रबर (नायलॉन) स्टॅम्प्स, वसंत क्लासेस, जैन मंदिरासमोर, बाजारपेठ, अलिबाग, (आधारकार्ड/कार्यालयाचे पत्र आवश्यक)
- ऑफिस कामाकरीता मुलगी पाहिजे. मो. ७४४७४८००००
- शेतजमिन विक्रीबाबत– मौजे गोठेघर, ता.अलिबाग जि.रायगड येथील शेती क्षेत्र ०.३३.१० हे.आर., २५ हापुस आंबे घर बोरींग या मिळकतीस योग्य किंमत मिळाल्यास विक्री करणे आहे. कृपया एजंटानी संपर्क साधु नये. संपर्क : भ्रमणध्वनी क्र. ७३८५९७२८१५/६३५१८३१३३७
- साईराज ट्रॅव्हल आयोजित– * आसाम, मेघालय, अरूणाचल प्रदेश– ३३०००/–, १४ एप्रिल. * वैष्णोदेवी, काश्मीर ५ मे १९०००/– IIIAC प्रवास हॉटेलव्यवस्था स्थळदर्शन MAP प्लॅन संपर्क : ७३८७१६४१९८/७०२००५९९१५.
- अकाऊंटट पाहिजे : कमीत कमी ५ वर्षे अकाऊंटचा अनुभव, पगार– २०,००० महिना ठिकाण– बामणसुरे, चोंढी, मो. ९८२३५८५३२१
- फ्लॅट भाड्याने मिळेल, RCF कॉलनीजवळ, ९४२३३७५१९८, ८४११०१६४४४
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, अलिबाग
- मेडिकलमध्ये पार्ट टाईम कामासाठी Pharmacist पाहिजे. मुलगा किंवा मुलगी सिद्धांत मेडिकल अलिबाग पुष्पलता शिंदे women s Hospital मो.नं. ९११२११७०७९
- अलिबाग रायवाडी कॉम्पलेक्स चेंढरे येथे ६२० स्क्वेअर फुट फ्लॅट विकणे आहे. संपर्क – ९८९२८०३०३९ ( एजंट नको)
- लग्नासाठी वर पाहिजे आहे. वधूचे वय : २२ ठिकाण अलिबाग मोबाईल नं. ७५०७९०९४३१ बायोडाटा या मोबाईल नंबरवर पाठवणे.
- चौथीत शिकणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या मुलीचा घरी अभ्यास घेण्यासाठी अलिबाग शहर येथे मुलगी पाहिजे. संपर्क : ९८५०३४८५०६
- सकाळी घरकामासाठी बाई हवी आहे. ८–११ पर्यंत (अलिबाग परिसरातील राहणाऱ्याला प्राधान्य) संपर्क– ९७६२२२२९८३
- इंग्लिश बोलण्यातील अडथळे, भिती, खात्रीने घालविणारा शॉर्ट कोर्स. नंबर सेव्ह करा गरज लागेल माफक फी– ९८२२८४२८१०
- जमिन विकणे आहे. मेन रोडटच तालुका–रोहा १४३ गुंठे ९० हजार गुंठा /५० गुंठे –३ लाख गुंठा. ७३७८४८०१५१.
- कोळंबी व्यवसाय/पोल्ट्री/कुकूटपालन/छोटे–मोठे उद्योग व्यवसाय/गृहनिर्मितीसाठी उपयुक्त अशी १६२ गुंठे जमिन भाड्याने / विकत देणे आहे. ७८७५५८७०८४
- वर्कशॉपमध्ये मशिन ऑपरेटर पाहिजेत शिक्षण १० वी, १२ वी पास नापास ८ तास ड्युटी, पगार ९००० प्रति महिना संपर्क : ९०४९६५५५२३

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## जाहीर सूचना

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, शहर अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड, येथील सि.स.नं ९५१ अ, ९५१ब व क९५१ या बिनशेती मिळकतीवरील, सुभेदार को.ऑप.हौ.सोसायटी, अलिबाग या इमारती मधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र.१३ क्षेत्र ३८४ चौ.फुट बिल्टअप (३५.६८ चौ.मी.) (अलिबाग नगरपरिषदेकडील निवासी सदनिका क्र. २०६ मधील मालमत्ता क्र. Z1MKT001719 (जुना मालमत्ता क्र. १४५६) क्षेत्र २१.७७ चौ.मी.) या क्षेत्रफळाची निवासी सदनिका सौ.सायली भास्कर जोशी, राहणार अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड यांच्या मालकीची असून, सदरील सदनिका, सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर सदनिकेचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान झाली आहेत. सदर सदनिका पूर्णत : निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर सदनिकेच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित सदनिकेत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर सदनिका खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १७/१२/२०२३

सही/-
**(ॲड.निवास ना.पाटील)**
श्री क्षेत्र, सहाण,
ता.अलिबाग जि.रायगड
खरेदीदारचे वकील

## खरेदीदारास सावधान नोटीस

१)सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यांत येते की, माझे अशिल श्री.नितेश लक्ष्मण केळकर, वय ३२ वर्षे, व्यवसाय शेती, रा.मु.पो.झिराड, ता.अलिबाग जि.रायगड अखत्यारपत्र धारक यांच्याकडे तयांचे वडिल लक्ष्मण बाळकृष्ण केळकर यांचे निधनापश्चात वारसा हक्काने आलेली शेती मिळकत खालीलप्रमाणे आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन (मौजे झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड)**

| अ. क्र. | ग.नं | हि.नं | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|
| १ | ४३६ जुना स.नं.१६७/१ व १६६/२ब (नवीन गट नं. १०३) | १ | १-४७-२० ०-१६-२० १-६३-४० | २४.२० |

वरील वर्णनाची मिळकत आमूचे अशिलांचे वडिलोपार्जित मालकीची, ताबे, कब्जा, वहिवाटीची अविभक्त मिळकत आहे. आमचे अशिलांची वर्णन मिळकतीतील त्यांचा प्रत्येकी असणारा ५८ गुंठे प्रमाणे हिस्सा तसेच कै.राधाबाई बाळकृष्ण केळकर यांचा देखील असणारा प्रत्येकी ५८ गुंठे हिस्सा निर्तूटक करून मिळण्यासाठी (एकूण ११६ गुंठे) वाटपाचा दावा मे.सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो. यांचे कोर्टात दाखल केलेला आहे. त्याचा रे.मु.नं.८७/२२ असा आहे. वरील दाव्यामध्ये आमचे अशिल नितेश लक्ष्मण केळकर व इतर २ हे वादी आहेत व प्रतिवादीपणामध्ये १) मारूती बाळकृष्ण केळकर (मयत) तर्फे वारस, १/१) पपी मारूती केळकर उर्फ भारती भास्कर अय्यर, १/२) प्रगती मारूती केळकर उर्फ प्रगती तुषार गावडे, १/३)संजीवनी मारूती केळकर उर्फ संजीवनी संदेश पेटारे, १/४) पिंकी मारूती केळकर उर्फ प्रतिक्षा प्रज्वल फुटके, १/५) गायत्री मारूती केळकर उर्फ वैशाली विलास निरगुले, १/६) कलावती मारूती केळकर, २)पांडूरंग बाळकृष्ण केळकर (मयत) तर्फे वारस २/१) दिनेश पांडूरंग केळकर, २/२) प्रशांत पांडूरंग केळकर, २/३) प्रविण पांडूरंग केळकर, ३) सौ.अनिता अनंत केळकर उर्फ मंदा पांडूरंग करमेळे, ४)श्री.भार्गव अनिल पटेल, ५)संगीता समीर पटेल उर्फ संगीता अनिल पटेल, ६)जितेंद्र हिरू पंजाबी, ७)पुजा विनय पंजाबी, ८)विनय हिरू पंजाबी इत्यादी प्रतिवादी आहेत.

२)माझे अशिलांचा वरील शेती मिळकतीमध्ये अविभक्त कायदेशीर हिस्सा आहे. असे असताना देखील माझे अशिलांचे चुलत भाऊ अथवा प्रतिवादी १)दिनेश पांडूरंग केळकर, २)प्रशांत पांडूरंग केळकर, ३)प्रविण पांडूरंग केळकर, ४)सौ.अनिता अनंत केळकर उर्फ मंदा पांडूरंग करमेळे, मौजे राहणार झिराड हे आमचे अशिलांचे अपरोक्ष परस्परीत्या त्रयस्थ इसमांशी साठेकरार करून व तद्नंतर खरेदीखत करून विक्री करण्याच्या तयारीत आहेत. वरील मिळकतीमध्ये आमचे अशिलांचा अविभक्त कायदेशीर हिस्सा आहे व या मिळकतीमधील आमचे अशिलांचा कायदेशीर हिश्श्याचे सरस निरस मानाने वाटप आजतागायत झालेले नाही. तसेच वरील मिळकतीबाबत मे. सिव्हील जज्ज सिनिअर डिव्हीजन सो. अलिबाग यांचे कोर्टात रे.मु.नं.८७/२०२२ सरस निरस वाटप निर्तूटक करून हिस्सा मिळण्याकरीता दावा प्रलंबित आहे.

३)आमचे अशिलांचे वरील मिळकतीमध्ये कायदेशीर हक्क व हितसंबंध असताना ही मिळकत आमचे अशिलांचे अपरोक्ष इतर कोणीही खरेदी केल्यास ते प्रामाणिक खरेदीदार राहणार नाहीत. तसेच आमचे अशिलांचे अपरोक्ष अन्य कोणीही वरील मिळकती संदर्भात खरेदीखत केल्यास विक्रीखत केल्यास अथवा अन्य मार्गाने हस्तांतरण केल्यास तो व्यवहार आमचे अशिलांबर बंधनकारक राहणार नाही याची कृपया नोंद घ्यावी. तसेच वरील मिळकती संदर्भात असलेल्या वादविवादांची तसेच प्रलंबित रे.मु. नं. ८७/२२ ची माहिती जनतेस व्हावी व विकत घेणाऱ्याची दिशाभुल तसेच फसमत होऊ नये याकरीता आमचे अशिल नितेश लक्ष्मण केळकर, श्री.योगेश लक्ष्मण केळकर, प्रतिमा लक्ष्मण केळकर हे ही नोटीस प्रसिद्ध करत आहेत. येणेप्रमाणे नोटीस आहे. कळावे.

अलिबाग
दिनांक : १६.१२.२०२३

सही/-
**ॲड.अजय उपाध्ये**
श्रीनिल सोसायटी, तळमजला,
श्री गणपतीचे देवळाजवळ, ब्राम्हणआळी,
अलिबाग रायगड. ९८५०५७०९७७

प्रोसेस फी जमा रू. पु.ता.२/०१/२०२४

**अर्जदारातर्फे वकील**
**ॲड.सचिन जोशी**

## जाहीर नोटीस

नि.६/ड

**अलिबाग येथील मा.जिल्हा न्यायाधीश सो. यांचे न्यायालयांत.**

दिवाणी अपील क्र.२२/२०२३

१)शाहीन सय्यद )
वय ६३ वर्षे, धंदा गृहिणी, )
रा.पॅराडाईझ स्कूल जवळ, ओम कॉलनी )
इन्कायापुरा कॅम्प, अमरावती ४४४ ६०२ )
२) तन्वीर शीराझी )
वय ६० वर्षे, धंदा गृहिणी, )
रा.१सी, ॲस्पेन हाऊस, इडन वुडस् )
श्रीमती ग्लेडस, ॲलवरील मार्ग, पोखरण रोड ) अपेलंट
ठाणे-४०० ६१० )
३)शारीक करारूद्दीन वझीफदार )
वय ६४ वर्षे, धंदा प्रिंटर )
रा.३ बरट्रम रोड, हेंडन लंडन, )
युनायटेड किंगडम )
४)सय्यद हुसेन कमरूद्दीन वझीफदार )
वय ६४ वर्षे, धंदा शेती, )
रा.३१/पी, रसुलबाग, नर्मदा रोड, जुनी )
दिवी, अंकलेश्वर, बरूचा, गुजरात-१ )

विरूद्ध

कोणीही नाही ) रेस्पॉंडट

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की,

१)अपेलंट नं. १ ते ४ हे सख्खी भावंडे आहेत. अपेलटं क्र.१ ते ४ यांची आई अकीला कमरूद्दीन वझीफदार यांचे दिनांक २२.०९.२०२० रोजी मुरूड येथे निधन झाले आहे. त्यांचे नांवे राजपुरी, मुरूड, पारगांव, मांडला, भोईघर, भालगांव, येथे असणाऱ्या स्थावर मिळकतीबाबत वारस असल्याचा दाखला मिळण्याकरीता अपेलटं यांनी अर्ज दाखल केलेला आहे.

२) अपेलंट ज्या स्थावर मिळकतीबाबत वारस दाखला मागत आहेत. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे:-

**मिळकतींचे वर्णन**

| अ.क्र | गांवाचे नांव | गट क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | राजपुरी | ०३ | - | ०-१८-४ | ५.५० |
| २ | राजपुरी | ०१ | १०१ | ०-०१-८ | - |
| ३ | राजपुरी | ०१ | १०९ | ०-१०-३ | १.८८ |
| ४ | राजपुरी | ०१ | १०८ | ०-०२-५ | - |
| ५ | मुरूड | ११५ | - | १-०६-२० | ४९.८१ |
| ६ | पारगांव | ३६ | - | १२१-७७-० | ५४.६२ |
| ७ | मांडला | ३० | - | ०-१०-१ | २.३३ |
| ८ | मांडला | ३७ | - | १-९७-३ | ४०.६२ |
| ९ | मांडला | ३५ | - | १-११-६ | २८.६२ |
| १० | मांडला | ३३ | - | १-०४-२ | २०.६२ |
| ११ | मांडला | १८८ | २/अे | ०-६८-० | १०.८७ |
| १२ | मांडला | १८८ | ३ | १०६-६०-०० | ४८.३३ |
| १३ | मांडला | ४३ | - | ०-८७-८ | २३.५३ |
| १४ | मांडला | १५१ | - | ०-१४-२ | ०.२६ |
| १५ | मांडला | २९ | - | १-१०-० | २.२१ |
| १६ | मांडला | ५५ | - | ३-१४-२ | ४६.५४ |
| १७ | भोईघर | ५५ | - | ०-१४-४ | ०.४१ |
| १८ | भोईघर | ४२ | - | ०-०४-२ | ०.०६ |
| १९ | भालगांव | ५८ | - | ०-८९-० | ९.५६ |
| २० | भालगांव | ६० | अे/१ | ११-५४-२ | २३.२८ |
| २१ | भालगांव | ६१ | - | २-३२-० | १.४० |
| २२ | भालगांव | ३० | १ | १-२०-०० | ३.३५ |

आणि मौजे राजपुरी, ता.मुरूड, जि.रायगड येथील घर नं.५४ व ५५

३) अकीला कमरूद्दीन वझीफदार यांचा दिनांक २२.०९.२०२० रोजी मृत्यु झाला आहे. मयत अकीला कमरूद्दीन वझीफदार यांना अपेलंट यांचे व्यतिरिक्त अन्य कुणीही कायदेशीर वारस नाहीत म्हणून अपेलंटने ते मयत व्यक्तीचे कायदेशीर वारस आहेत असे ठरविण्याकरीता व तसा दाखला मिळणेकरीता अपेलंट यांनी अपील दाखल केले आहे.

४) या वारस दाखल्याचे कामी कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी दिनांक ०२.०१.२०२३ रोजी सकाळी ११.०० वाजता मा.जिल्हा न्यायाधीश सो., अलिबाग यांचे न्यायालयांत स्वतः अगर प्राधिकृत वकिलांमार्फत हजर रहावे. अन्यथा, या प्रकरणामध्ये कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजून अपेलंट यांना वारस दाखल दिला जाईल याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज रोजी देण्यात आली.

अलिबाग
दिनांक : १४.१२.२०२३

सही/-
**न्यायालयीन लिपीक**
**जिल्हा न्यायालय**
**अलिबाग रायगड**

सही/-
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय**
**अलिबाग रायगड.**

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद.
गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी–सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

## जाहीर नोटीस

माझे अशिल यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| सोगाव | ३१६ | २९.३०.०० | २९३.०० |

वर वर्णन केलेली सदरहु बिनशेती मिळकत ही आज रोजी किर्तीकुमार दिलीपकुमार राठोड व समीरा किर्तीकुमार राठोड, रा.मुंबई यांच्या नावे ७/१२ दप्तरी मालकी हक्कात व ताबेकब्जात आहे. माझ्या आशिलांनी सदरहु मिळकतीबाबत मालकी हक्काबाबतचा शोध अहवाल व टायटल सर्टीफिकेट/दाखला माझे कडून मिळावा अशी मागणी केलेली आहे. सदरहु मिळकतीबाबतचा मालकी हक्काचा दाखला देण्यापुर्वी सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतची खात्री करण्याच्या हेतूने मी सदरची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहे. सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार,कब्जा, कुळ हक्क, वारसा हक्क, वहिवाटीचे हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही,हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून मालकी हक्क निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल. मागाहून कोणाचीही, कसलही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक :- १६-१२-२०२३

**(ॲड. परेश एम. घरत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर, एस.टी.स्टँडजवळ, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड. ९८५०४८१२३४

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमचे अशिल श्री.राजेश यशवंत कदम वगैरे, २ रा.कोयनावेळे, ता.पनवेल, जि.रायगड यांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तिचे मालक श्री.हरिश्चंद्र सखाराम मुने रा.जांभिवली ता.खालापुर, जि.रायगड यांचेकडून विकत घेण्याचे ठरविले आहे त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :

**मौजे बार्णे, ता.कर्जत, जि.रायगड जमिन मिळकतीचे वर्णन**

| स.नं./हि.नं | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| १३/१/अ | ०-३०-१० | ३-६२ |

सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचा दावा विद्यमान मालक यांनी आमच्या अशिलांना केलेला आहे.

तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही, कसलाही हक्क, हितसंबंध, बोजा अथवा गहाण, दान, लिज, पोटगी, हवाल, साठेकरार, विक्री, करार, खरेदी मेन्टेनन्स, मेहेर, वारसाहक्क, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, इजमेंट हक्क, बॅक लोन, वगैरेबाबत कसलाही हक्क व हितसंबंध अथवा हरकत वा तक्रार असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकतीसंबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली तक्रार अगर हरकत खाली सही करणार यांच्याकडे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत आणून द्यावी. सदर मुदतीत तक्रार वा हरकत न आल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल पुर्ण करतील व मागाहून येणारी हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. मागाहून येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही हे सर्वांस कळावे.

ठिकाण : कर्जत
दिनांक : १६/१२/२०२३

सही/-
**ॲड.गीतांजली जी. फुलावरे,**
कार्यालय पत्ता : 'मधुतारा' बिल्डींग,
कचेरी रोड, कर्जत ता.कर्जत, जि.रायगड
मो.८८८८०४५३७६/८६००३५२९८२

मे. इंदलकर साहेब कोर्ट
ॲड. तृप्ती ग. पाटील

## जाहीर नोटीस

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे कोर्टात...**

नि.७/ड
ने.ता.०८-१-२४

दि.चौ.अर्ज क्र. १६६३/२०२३
रमा विनोद अगरवाल (मयत)
१. करण विनोद अगरवाल, वय ४२ वर्षे
२. योगी विनोद अगरवाल, वय ४७ वर्षे
अर्जदार क्र. १ व २
रा.डी.-१, कस्तुरी को.ऑ.हौ. अर्जदार
सोसायटी-१, नॅशनल पॅराडाईज समोर,
तक्का गाव, ता. पनवेल, जि. रायगड,
महाराष्ट्र ४१० २०६

अर्ज मुंबई रेग्युलेशन कायदा १८२७ च्या (VIII)प्रमाणे, वारस दाखला मिळणेकरिता रक्कम रु. ५,००,०००/-

१. वरील अर्जदार यांनी सदरचा चौकशी अर्ज वारसदाखला मिळणेकरिता मे. कोर्टात दाखल केला आहे.

२. अर्जदार यांची आई मयत रमा विनोद अगरवाल ह्या दि.२२-०२-२०२३ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच अर्जदार यांचे वडील व मयत रमा विनोद अगरवाल यांचे पती विनोद कन्हैयालाल अगरवाल हे दि. ६-०७-२०२१ रोजी मयत झालेले आहेत. सदर मयताच्या मृत्यूच्या दाखल्याच्या प्रती अर्जासोबत दाखल करीत आहोत. अर्जदार क्र. १ व २ हे मयत व्यक्तीची मुले आहेत. अर्जदार क्र.२ हे मागील खूप वर्षापूर्वीपासून मानसिक रुग्ण (दिव्यांग) आहेत. त्यांची पूर्ण काळजी/पालनपोषण व दैनंदिन वैद्यकी

# शैक्षणिक सहलीसाठी पनवेल आगार सज्ज

**। पनवेल । वार्ताहर ।**

शैक्षणिक सहल उपक्रमाला विद्यार्थ्यांच्या जडणघडणीत विशेष महत्त्व आहे. शालेय जीवनात शैक्षणिक सहलीतील सहभाग हा प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय क्षण असतो. उपक्रमशील शाळांमध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीचा लाभ देण्यामध्ये स्पर्धा असते. त्यातून सहलीचे बुकिंग करण्यात येते. पनवेल आगारात सहलीसाठी बसचे बुकिंग जोरात सुरू आहे. यात शैक्षणिक सहलीसाठी पन्नास टक्के सवलत असल्याने लालपरीला पसंती दिली जात आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसमधूनच विद्यार्थ्यांच्या सहली काढणे शिक्षण विभागाने बंधनकारक केले आहे. सवलतीच्या दरात सहलीकरिता विद्यार्थ्यांसाठी बस पुरविण्याचे काम एसटी महामंडळ करते. नोव्हेंबर ते फेब्रुवारीदरम्यान शाळांकडून बसचे बुकिंग केले जाते. पनवेल आगारातही तालुक्यातील शाळांसह पनवेल शहर व वसाहतीमधून सहलीकरीता बसचे बुकिंग सुरू झाले आहे. साधी व शिवनेरी प्रकारातील गाड्या पनवेल आगारात उपलब्ध असून दैनंदिन वेळापत्रकाचा मेळ बसवून सहलीसाठी नियोजन करण्यात येत असल्याची माहिती आगार प्रमुख सुजित डोळसे यांनी दिली. यंदा बसची संख्या कमी झाल्याने दररोज चार बस सहलीसाठी दिल्या जात आहेत. यंदाच्या हंगामात १४ बसचे आरक्षण झाले आहे. फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सहलीसाठी बस फुल होण्याची शक्यता आहे.

> शैक्षणिक सहलीबरोबर लग्नासाठी प्रसंगी कराराच्या गाड्याही द्याव्या लागतात. पनवेल आगाराकडे गाड्यांची संख्या कमी आहे. उपलब्ध गाड्यांवरच नियोजन करावे लागते. जास्तीत जास्त शाळांनी आगाऊ सहलीचे बुकिंग करून नियोजनासाठी सहकार्य करावे.
> – सुजित डोळस, आगार व्यवस्थापक, पनवेल

## डिजिटल पॉईंटचे उदघाटन

**। रसायन । वार्ताहर ।**

पोलिसांच्या मुलांनीही व्यवसाय करावा म्हणून रिस येथे शुभम शिंदे यांनी रिस येथे साई शुभम डिजिटल पॉईंट सुरु केले आहे. या डिजिटल पॉईंटचे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत कदम, पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी, सरपंच उमा मुंढे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी भुषण पारंगे, माजी सरपंच संदिप मुंढे, माजी सरपंच अशोक मुंढे, माजी उपसरपंच दत्तात्रेय जांभळे, दिपक कांबळी, निलेश बाबरे, संतोष पाटील, भरत जाधव, कैलास म्हात्रे, अनिल पिंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची मागणी

**। तळा । वार्ताहर ।**

तळा शहराच्या प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारावे अशी मागणी भाजप युवा मोर्चा व मनसे कडून करण्यात आली आहे.तळा तालुक्याला ऐतिहासिक वारसा लाभला असून तळा शहरात असलेल्या ऐतिहासिक तळगड किल्ल्यामुळे अनेक पर्यटक गडाला भेट देत असतात.परंतु शिवरायांच्या पदस्पर्शानेपावनझालेल्यातळाशहरात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक नसल्याने पर्यटक तसेच गडप्रेमींकडून नाराजी व्यक्त करण्यात येते.त्यामुळे शहरात येणारे पर्यटक,गडप्रेमी व तालुक्यातील नागरिकांना अभिमान वाटेल असे छत्रपती शिवाजी महाराज यांचे भव्य स्मारक तळा शहराच्या प्रवेश द्वारावर उभारावे अशी मागणी रितेश मुंढे, सुयोग बारटक्के, प्रदीप फुलारे यांनी नगरपंचायतीकडे करण्यात आली आहे.

## उरणमध्ये भटक्या कुत्र्यांची दहशत

**। उरण, । वार्ताहर ।**

शहरातील अनेक रस्त्यांवर दहा, बाराच्या संख्येने घोळका करून भटके श्वान नागरिक आणि लहान मुलांवर हल्ले करू लागले आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा भटक्या श्वानांची दहशत वाढू लागली आहे. अशीच स्थिती अनेक गावांतही

असून तालुक्यातील भटक्या श्वानांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अशा भटक्या श्वानांची संख्या वाढल्याने निर्बीजीकरणाची मागणी नागरिकांकडून करण्यात आली आहे. उरण परिसरात शहरी व ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात भटक्या श्वानांची संख्या वाढली आहे. त्यामुळे रात्री अपरात्री आणि एकट्याने ये-जा करणाऱ्या नागरिकांवर हल्ला करून त्यांना जखमी केले जात आहे.

## हिरव्या वाटाणाच्या दरात घसरण

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

घाऊक, तसेच किरकोळ बाजारात ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये वाटाण्याचा भाव किलोला १८० ते २०० रुपयांवर गेला होता. आवक कमी झाल्याने भाव गगनाला भिडले होते. मात्रा, आता वाटाण्याचा हंगाम सुरू झाला आहे. त्यामुळे बाजारात आवक वाढली असून किरकोळ बाजारात वाटाणा ३५ ते ४० रुपये किलोला विकला जात आहे.

साधारण नोव्हेंबरपर्यंत हिरवा वाटाण्याची आवक खूप तुरळक प्रमाणात होत असे. वाटाण्याच्या

मंदीच्या हंगामात आवक कमी असल्याने त्याचे भाव गगनाला भिडतात. त्यामुळेच ऑक्टोबर, नोव्हेंबरमध्ये वाटाण्याने १८० ते २०० चा आकडा पार केला होता; परंतु बाजारात हिरव्या वाटण्याचा हंगाम सुरू झाला असून आवक वाढली आहे. डिसेंबरमध्ये वाटण्याचा खरा हंगाम सुरू होतो. सध्या बाजार समितीत मध्य प्रदेशातून हिरवा वाटाण्याची आवक सुरू झाली आहे. एपीएम सीत मंगळवारी ४ ट्रक ४१ टेम्पो दाखल झाले असून ४,०७४ क्विंटल आवक झाली आहे. आठवड्याच्या सुरुवातीलाच बाजारात वाटाण्याची मोठ्या प्रमाणात झाली आहे. त्यामुळे साहजिकच, घाऊक बाजारातहीवाटाणास्वस्तातउपलब्ध झाल्याने पुढील कालावधीत त्याचा परिणाम किरकोळ बाजारात दिसू लागला आहे.

## विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे धडे

**। पनवेल । वार्ताहर ।**

वाहतूक नियमांची बालपणापासून माहिती व्हावी यासाठी खारघर वाहतूक शाखेतर्फे शालेय विद्यार्थ्यांना वाहतूक नियम ांविषयी धडे देण्यात आले. या वेळी हसत-खेळत चिमुकल्यांना पोलिसांनी वाहतुकीच्या नियम ांबाबत माहिती दिली.

खारघर सेक्टर १५ मधील लेस एनफंट्स इंटरनॅशनल प्रीस्कूलच्या प्राचार्य डॉ. मलेका हबीब यांनी खारघर वाहतूक शाखेला पत्र पाठवून शालेय विद्यार्थांना वाहतूक नियमाचे धडे देण्याची मागणी केली होती. या पत्राची दखल घेऊन खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संतोष काणे यांनी बुधवारी घरकुल वसाहतीलगत असलेल्या सिग्नल यंत्रणेजवळ मुलांना एकत्र आणून वाहतुकीचे नियम, वाहतुकीच्या खुणा, हेल्मेट का वापरावे, दारू पिऊन गाडी का चालवू नये, रुग्णवाहिकेला पुढे जाण्यासाठी प्राधान्य कसे द्यावे, सिग्नलचा उपयोग, झेब्रा क्रॉसिंगचे फायदे अशा अनेक बाबी समजावून सांगितल्या. मुलांनीही या उपक्रम ाला तेवढाच प्रतिसाद दिला.

> शालेय विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची पोलिसांनी सविस्तर उत्तरे दिली. विशेष म्हणजे सिग्नलचे तीन रंग का, कोणत्या रंगाचा काय अर्थ आहे, गाडी चालवायला काय लागते, दुचाकीवर किती जण बसू शकतात, याबाबत मुलांनी प्रश्न विचारले. त्याची त्यांना माहिती देण्यात आली. असे उपक्रम इतर शाळांनीही घ्यावेत.
> संतोष काणे, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, खारघर वाहतूक शाखा

## विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलचे भूमिपूजन

**। वावोशी । वार्ताहर ।**

वावोशी येथील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेअंतर्गत चालवण्यात येणाऱ्या विवेकानंद इंग्लिश मिडीयम स्कूलच्या एका नवीन इमारतीचा भूमिपूजन सोहळा १४ डिसेंबर रोजी करण्यात आला.

विद्यार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या बसण्याची गैरसोय होऊ नये म्हणून शालेय प्रशासनाने विद्यार्थ्यांसाठी एक नवीन इमारत बांधण्याची मोहीम हाती घेतली आणि या अनुषंगाने इमारतीचा भूमिपूजन सोहळा १४ डिसेंबर रोजी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये करण्यात आले. या कार्यक्रमाला स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विभाग प्रमुख श्री. हाके, श्री. बेडगे, एस एच. पाटील, गोदरेजचे सिएसआर व्यवस्थापक चव्हाण, किशोर पाटील, रमेश पाटील, विद्याधर जाधव, मुख्याध्यापक गावित, भालचंद्र पाटील, जगदीश पाटील, अनिल मरागजे, शबीर पटेल, एल. बी पाटील, उमेश पाटील, हनुमंत मोरे, सतीश शेवाळे, छत्रपती विद्यालय व ज्युनिअर कॉलेज शिक्षक वृंद छत्तीशी विभागातील सामाजिक, राजकीय तसेच शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवर या कार्यक्रमास मोठ्या संख्येन उपस्थित होते.

## काव्य लेखन स्पर्धाचे आयोजन

**। चिरनेर। वार्ताहर ।**

पारस काव्य, कला, जनजागृती संस्था सानपाडा, नवी मुंबईतर्फ राज्यस्तरीय खुली काव्य लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रम २२ डिसेंबर रोजी दुपारी ३.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर समता भवन, सेक्टर-१० सानपाडा, नवी मुंबई, जुईनगर येथे संपन्न होणार आहे.

पुरस्कार सोहळ्याचे हे १३ वे वर्ष असून अध्यक्षस्थान ज्येष्ठ साहित्यिक पुंडलिक म्हात्रे भूषविणार आहेत. कार्यक्रम वेळेतच सुरू होईल. तरी सहभागी सर्व स्पर्धक व विविध क्षेत्रातील पुरस्कार विजेत्यांनी मोठ्या संख्येने या पुरस्कार वितरण समारंभाला हजर रहावे असे आवाहन मंगेश चांदिवडे व शोभा चांदिवडे यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. १७ डिसेंबर ते २३ डिसेंबर २०२३

ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग
मोबा.९४०४७९१७९८

### आर्थिक लाभाची शक्यता

**मेष :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता व्यावसायिक आघाडीवर आपली सुरुवात चांगली होऊन कामाच्या फलश्रुतीच्या रूपात आर्थिक लाभ होऊ शकेल. आठवड्याच्या मध्यास आपण लेखी किंवा मौखिक बाबतीत सतर्क न राहिल्यास वरिष्ठांचा आपल्या बद्दल गैरसमज होण्याची शक्यता सुद्धा आहे. हा आठवडा कारकिर्दीच्या बाबतीत अनुकूल असल्याचे दिसत आहे. आठवड्याच्या मध्यास नवीन कामाची सुरवात न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. ह्या व्यतिरिक्त आठवड्याच्या मध्यास खर्च करण्याची तयारी सुद्धा ठेवावी. आठवड्याच्या उत्तरार्धात भविष्याचा कल तसेच तार्किक नमुना समजून घेण्याच्या आपल्या क्षमतेमुळे कामाच्या ठिकाणी अतिशय अवघड जवाबदारी सुद्धा आपण समर्थपणे पेलू शकाल. उच्च शिक्षण घेत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आठवड्याचे सुरुवातीचे व अखेरचे दिवस अनुकूल आहेत. मधल्या दिवसात सामान्य अभ्यास सोडून पराविज्ञान शिकण्याकडे आपला अधिक कल होईल. **महिलावर्ग:** आपण विशेषतः स्त्री सहकाऱ्यांशी विनाकारण वाद घालणे किंवा चर्चा करणे टाळावे. आपल्या सामाजिक व कौटुंबिक वातावरणाचा आपल्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पडेल. **शुभ दिनांक : २१,२३.**

### धनलाभ होण्याची शक्यता

**सिंह :** विद्यार्थ्यांना अभ्यासात अधिक लक्ष केंद्रित करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आठवड्याच्या पहिल्या दिवशी कफ, खोकला, छातीत दुखणे इत्यादींचा त्रास होऊ शकतो.ह्या आठवड्यात नोकरीत किंवा किरकोळ कामात आपली कामातील प्राप्ती चालूच राहील, परंतु ती पूर्ण करण्यास अधिक परिश्रम करावे लागण्याची किंवा कामाचे तास वाढण्याची शक्यता आहे. व्यापारात काही त्रास संभवत नसला तरी स्पर्धात्मक वातावरणात आपला निभाव लागण्यासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील. कार्यालयीन प्रतिस्पर्ध्यांपासून सावध राहावे. कुटुंबात शुभ प्रसंग घडण्याची किंवा अशा प्रसंगात सहभागी होण्याची शक्यता आहे. सध्या कौटुंबिक व व्यावसायिक अशा दोन्ही आघाडींचा समतोल साधू शकाल. विद्यार्थ्यांना हा आठवडा अनुकूल आहे. **महिलावर्ग :** सुरवातीच्या दिवसात प्रवासाची शक्यता आहे. दांपत्य जीवनातील गोडवा टिकून राहील. अचानक धनलाभ होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. संततीची त्यांच्या कार्यक्षेत्रात प्रगती होईल. चांगली बातमी मिळेल, पूर्वी केलेली जुनी बचत आता उपयोगी पडू शकेल. **शुभ दिनांक : १९,२२**

### प्रतिस्पर्ध्यांवर मात कराल

**धनु :** आठवड्याच्या पूर्वार्धात आपल्या मनातील योजना साकार होतील. सामाजिक कार्यात सहभागी व्हाल किंवा त्यासाठी प्रवास कराल. घरात मंगल किंवा धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी आठवडा अनुकूल आहे. विदेशाशी संबंधित कामास गती येण्याची किंवा त्यासाठी प्रवास करावा लागण्याची शक्यता आहे. एखाद्या लांब पल्ल्याच्या प्रवासाचा विचार करत असल्यास त्यास सकारात्मक गती येईल. व्यापाऱ्यांची वसुली होऊ शकेल. नोकरी - व्यवसायात लाभदायी परिणाम मिळेल. नोकरी करणाऱ्यांना कार्यालयात सहकाऱ्यांचे व वरिष्ठांचे सहकार्य मिळू शकेल. व्यापाऱ्यांना प्रतिस्पर्ध्यांवर मात करता येईल. नवीन कार्याचा प्रारंभ करण्यासाठी हा आठवडा अनुकूल आहे. मात्र, आठवड्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी आपले कामात लक्ष न लागल्याने प्रतिकूलता जाणवेल. ह्या दोन्ही दिवशी आरोग्य विषयक त्रास सुद्धा होऊ शकतो. **महिलावर्ग :** पहिल्या दिवशी संबंधात आपण उत्तम प्रकारे वाटचाल करू शकाल. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी प्रियव्यक्तीशी वाद होऊ शकतो. त्या नंतरच्या दिवसात वैवाहिक जीवनात किंवा प्रणयी जीवनात जवळीक वाढेल. **शुभ दिनांक : २०,२१**

### विचारपूर्वक निर्णय घ्या

**वृषभ :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता विवाहेच्छुकांचे विवाह ठरू शकतील. समाजातील उच्च वर्गातील लोकांचा सहवास लाभू शकेल. आपल्या संबंधांना आपण चांगल्या पद्धतीने ओळखू शकाल. आठवड्याच्या मध्यास सांधेदुखी, ज्ञानतंतू, रक्तदाब व पोटाशी संबंधित समस्या असणाऱ्यांचे दुखणे वाढून त्यांची कार्यक्षमता कमी होण्याची शक्यता आहे. आठवड्याच्या सुरुवातीस व्यावसायिक आघाडीवर आपली वृत्ती आशावादी असल्याने आपल्या समस्या व सभोवतालच्या गैरसोयींप्रती आपण कमी चिंतीत असाल. आपले अंतर्मन आपणास व्यूहात्मक पाऊल उचलण्यास योग्य मार्गदर्शन करेल. नोकरी करणाऱ्यांना वरिष्ठांच्या कृपेने मार्गदर्शन मिळू शकेल. तसेच बौद्धिक बाबतीत आपण प्रगती करू शकाल. उत्तरार्धात आपणास विचारपूर्वक निर्णय घ्यावे लागतील. आपली गुंतवणूक फलदायी व चांगला परतावा देणारी ठरेल. विद्यार्थ्यांना आठवड्याची सुरुवात चांगली होऊन सुद्धा अभ्यासात चढ - उतार येत असल्याचे जाणवेल. उच्च शिक्षणात विघ्ने येऊ शकतात. **महिलावर्ग :** कुटुंबीय व प्रियव्यक्तीशी संबंध सुधारतील. विवाहितांना आठवड्याच्या मध्यास एकमेकांचा उत्तम सहवास लाभेल, मात्र संबंधात आपले वर्चस्व गाजविण्याची वृत्ती सोडावी लागेल. **शुभ दिनांक : २१,२२**

### नवीन लोकांशी मैत्री जुळेल

**कन्या :** आठवड्याच्या सुरुवातीस आपल्या वाक्चातुर्याने कोणत्याही व्यक्तीस प्रभावित करू शकाल. आपल्या शब्दातून सर्जनात्मकतेचा ठसा उमटेल. इतरांना आपले म्हणणे सहजपणे सांगू शकाल. प्रेम व्यक्त करण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी सुद्धा हा आठवडा अनुकूल आहे. जेथे वाणीचे प्रभुत्व असेल अशी व्यावसायिक कार्ये सुद्धा आपण सहजपणे पूर्ण करू शकाल. आठवड्याच्या मध्यास आपल्या सभोवताली मित्रांचा गराडा असेल. त्यांच्या कडून काही भेटवस्तू मिळतील व आपण सुद्धा त्यांच्यासाठी पैसा खर्च कराल. पूर्वी केलेल्या गुंतवणुकीत आपण सध्या काही बदल करण्याची शक्यता आहे. आत्ता आपण जर कारकिर्दीवर लक्ष ठेवून कष्ट केलेत तर चांगल्या फळाची आशा बाळगू शकता. शेअर्स - सट्टा किंवा दलालीच्या कार्यात हिशोबीपणा ठेवून धाडस केल्यास लाभ होऊ शकेल. **महिलावर्ग :** भविष्यात उपयोगी पडतील अशा नवीन लोकांशी मैत्री जुळेल. अविवाहितांना योग्य जोडीदार मिळण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात कुटुंबियांच्या सहवासात वेळ घालवू शकाल. तसेच त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा जागृत होईल. **शुभ दिनांक : २०,२१**

### आत्मविश्वास वृद्धिंगत होईल

**मकर :** आठवड्याच्या पहिल्या दिवशी कारकीर्दीस आपण केंद्रस्थानी ठेवाल व आपले बहुतांशी कामे व्यावसायिक कार्यातच केंद्रित राहतील. व्यवसायात आपल्या वाक्चातुर्याने इतरांची मने जिंकू शकाल. नियोजित कामात यश प्राप्ती झाल्याने आत्मविश्वास वृद्धिंगत होईल. व्यवसायाशी संबंधित कोणताही निर्णय आत्मविश्वासाने घेऊ शकाल. व्यापारात लाभ होईल. प्राप्तीचे नवीन मार्ग सापडतील. आठवड्याच्या मध्यास मानसिक व्याकुळता जाणवेल. अशा स्थितीत कोणतेही नवीन काम न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. ह्या आठवड्यात धार्मिक किंवा मंगल कार्यात सहभागी व्हावे लागेल किंवा तीर्थयात्रा घडेल. अखेरच्या दोन दिवसात आपल्यात पुन्हा उत्साह संचारेल. आठवड्याच्या मध्यास विद्यार्थ्यांच्या अभ्यासात अडथळे येऊ शकतात. आठवड्याच्या मध्यास बेचैनी जाणवेल. **महिलावर्ग :** सुरुवातीस स्नेही व स्त्री मित्रांकडून लाभ होईल. एखाद्या रम्य ठिकाणी सहलीस जाऊ शकाल. मित्रांचे सहकार्य सुद्धा मिळेल. प्रियजनांशी रोमांचित करणारी भेट होण्याचा प्रसंग उदभवेल व ह्या भेटीमुळे आपण आनंदून जाल. **शुभ दिनांक : १८,१९**

### आरोग्याची काळजी घ्या

**मिथुन :** या राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आठवड्याच्या सुरवातीस आपल्या जीवनात सकारात्मकता व आशावादाचा संचार असेल. गोचरीच्या गुरूचा प्रभाव आपल्या वैवाहिक जीवनावर किंवा प्रियव्यक्तीशी असलेल्या संबंधांवर सकारात्मकच होईल. भागीदारी कार्ये किंवा संयुक्त करार, नोकरीत सहकाऱ्यांशी असलेल्या संबंधात सुद्धा ह्यामुळे फायदा होईल. सुरवातीस आपणास कामे करण्याची चांगली संधी मिळू शकेल, परंतु अखेरच्या दोन दिवसात खर्च करण्याची सुद्धा तयारी ठेवावी लागेल. आता विद्यार्थ्यांचे अभ्यासावर लक्ष केंद्रित होऊ शकेल. तसेच आवडत्या विषयांचा खोलात शिरून अभ्यास करण्यास प्राधान्य असेल. सध्या आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यासाठी आपण काहीतरी नवीन शिकू शकाल. प्रणयी जीवन, भेटीगाठी, रात्री भोजन इत्यादींसाठी आठवड्याचा अखेरचा दिवस जास्त अनुकूल आहे. आठवड्याच्या उत्तरार्धात आरामदायी जीवनशैलीचा आनंद उपभोगू शकाल. नोकरी करणाऱ्यांना वरिष्ठांच्या कृपेने मार्गदर्शन मिळू शकेल. तसेच बौद्धिक बाबतीत आपण प्रगती करू शकाल. **महिलावर्ग :** आठवड्याच्या मध्यास हाडांचे विकार किंवा रोगप्रतिकारक शक्तीच्या अभावाचा त्रास सुद्धा होऊ शकतो. त्यामुळे आपणास आधी पासूनच काळजी घ्यावी लागेल. विशेषतः उदासीनता, व्याकुळता ह्यांचा त्रास संभवतो. **शुभ दिनांक : १८,२०**

### पगारवाढ होण्याची शक्यता

**तुळ :** आठवड्याच्या सुरवातीस नोकरीत बक्षीस, पदोन्नती किंवा पगारवाढ होण्याची शक्यता सुद्धा आहे. मागील काही दिवसांपासून आपणास व्यवसायात कायदेशीर अडचणी किंवा शासकीय समस्यांमुळे अडथळे जाणवत असतील किंवा नोकरीत वरिष्ठांशी तणाव किंवा त्यांचे सहकार्य मिळत नसल्याचे जाणवत असेल. आता ही परिस्थिती संपुष्टात येऊन सर्व बाबतीत आपले फासे सरळ पडतील. मृदुवाणी दीर्घकालीन संबंधांचे बीजारोपण करेल. रोमँटिक मनःस्थितीमुळे वैवाहिक जोडीदार किंवा प्रियव्यक्तीस खुश करण्यासाठी विविध मार्गांचा अवलंब कराल. विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला तरी इतर प्रवृत्तीत अधिक रुची दाखवू नये. आरोग्याच्या बाबतीत या आठवड्यात काळजी करण्यासारखे काही नाही. **महिलावर्ग :** पैतृक संपत्तीशी संबंधित कार्यात सकारात्मकता येऊन जुने वाद असल्यास आपल्या बाजूने निकाल लागू शकेल. व्यावसायिक आघाडीवर आपण अनेक लोकांच्या संपर्कात याल. ह्या आठवड्यात बहुतांशी संबंधांचे सौख्य उपभोगू शकाल, ज्यात सुरवात चांगली झाल्याने आपण आनंदित व्हाल. **शुभ दिनांक : १७,१८**

### खर्च होण्याची शक्यता

**कुंभ :** आठवड्याच्या सुरवातीस कुटुंबातील एखाद्या व्यक्तीच्या प्रकृती विषयक काळजीमुळे सुद्धा आपल्या प्रकृतीस त्रास होऊ शकतो. सुरुवातीस विद्यार्थ्यांचे अभ्यासात मन कमीच लागेल.नंतर विद्यार्थ्यांना एखाद्याशी महत्वाच्या चर्चेत सहभागी होण्याची संधी मिळेल. त्यामुळे आपली ज्ञानवृद्धी होईल.व्यावसायिक कारणांसाठी काही खर्च होण्याची शक्यता आहे. मात्र, कालांतराने त्यातून लाभ होण्याची अपेक्षा आपण बाळगू शकता. व्यापारात विकासाची संधी आल्यास जास्त विचार न करता संधीचा लाभ घ्या. नोकरीत लाभ होईल. स्थान परिवर्तन किंवा जवाबदारीत बदल होण्याची शक्यता आहे. उत्तरार्धात एखाद्या धार्मिक किंवा मंगल कार्यात आपण सहभागी होण्याची शक्यता आहे. आपणास धनलाभ होण्याची सुद्धा शक्यता आहे. **महिलावर्ग :** आपल्या कठोर वाणी व वागणुकीमुळे प्रगतीस खीळ बसण्याच्या शक्यतेमुळे आपणास वाणी व वागणूक नियंत्रित ठेवावी लागेल. स्नेहीजनांशी हट्टीपणा सोडून समाधानी वृत्ती जर आपण बाळगलीत तर संभाव्य समस्या निर्माण होण्या पूर्वीच त्या संपुष्टात येतील. भिन्नलिंगी व्यक्तींशी जवळीक वाढेल. त्यात सुद्धा उत्तरार्धात संबंधांना आपण नवीन उंचीवर नेऊ शकाल. **शुभ दिनांक : १७,२१**

### व्यापारात नफा होण्याची शक्यता

**कर्क :** आठवड्याच्या सुरवातीस आपण जर भावनांवर आवर घातला नाहीत तर त्या व्यक्तिगत जीवनावर त्याचा परिणाम होऊ शकतो सावध राहा. आठवड्याच्या उत्तरार्धात आपल्या मनातील वैचारिक गोंधळामुळे आपले कशातही मन रमणार नाही. अशा परिस्थितीत आपण एकांतात राहण्यास प्राधान्य द्याल व त्यामुळे व्यक्तिगत संबंध किंवा व्यवसायाकडे आपण लक्ष देऊ शकणार नाही. जीवन व संबंधांवर त्याचा गंभीर परिणाम होईल. प्रेम करण्याची व मिळविण्याची इच्छा उत्कट व तीव्र होईल. पैतृक व्यवसायात असणाऱ्यांसाठी आठवड्याची सुरवात चांगलीच आहे. नोकरी करणाऱ्यांची कामगिरी उत्तरार्धात चांगली होऊ शकेल. नोकरी करणाऱ्यांना वरिष्ठांच्या कृपेने मार्गदर्शन मिळू शकेल. तसेच बौद्धिक बाबतीत आपण प्रगती करू शकाल. कोणत्याही प्रकारच्या जुगारी प्रवृतींपासून दूर राहणे हितावह होईल. आर्थिक बाबतीत विशेष त्रास होत असल्याचे दिसत नसले तरी व्यापारात अपेक्षेहून कमी नफा होण्याची शक्यता आहे. **महिलावर्ग :** आपल्या मनातील भावना वैवाहिक जोडीदारा समक्ष स्पष्टपणे व्यक्त करू शकाल. असे असले तरी सध्या आपणास संबंधात कोठे ना कोठे अनिश्चितता असल्याचे जाणवेल. कामात आपली सर्जनात्मकता वाढेल व कामगिरी सुद्धा चांगली होईल. **शुभ दिनांक : १७,२०**

### सर्वांशी नम्रतेने वागावे

**वृश्चिक :** आठवड्याच्या सुरुवातीस आपणास काही प्रमाणात सतर्क व सावध राहून वाटचाल करावी लागेल. सर्व प्रथम पूर्वीच्या थकव्यामुळे आपणास आळस जाणवेल व त्यामुळे कामात मन रमणार नाही तसेच विचारात घुटमळत राहिल्याने निर्णय घेण्यास असमर्थ व्हाल. त्याच बरोबर संबंधात रुची राहणार नाही. आरोग्यास सुद्धा नाजूकपणा येईल. आरोग्य मध्यम राहील. उत्तरार्धात सर्दी, कफ, ताप ह्यांचा त्रास संभवतो. आड मार्गाने पैसे कमविणे आपणास अडचणीत टाकेल. आंधळेपणाने कोणतेही साहस करू नये. प्रथम दोन दिवसात पोटाचे विकार संभवतात. नवीन कार्याची सुरुवात व प्रवास न करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. आपली प्रतिमा मलीन होईल अशा कोणत्याही कार्यापासून दूर राहावे. आठवड्याच्या मध्यास नोकरीत फायदा झाला तरी वरिष्ठांकडून खूप मोठी आशा बाळगू नये, तसेच त्यांच्याशी नम्रतेने वागावे. कार्यालयात आपल्या विरुद्ध कट - कारस्थान करणाऱ्यांवर मात करू शकाल. **महिलावर्ग :** वैवाहिक जोडीदार किंवा स्वतःसाठी नवीन कपडे, दागिने किंवा वाहन खरेदी करू शकाल. उत्तरार्धात प्राप्तीत वाढ करण्यावर लक्ष केंद्रित कराल. वसुली किंवा संपत्तीचे सौदे झाल्याने आपल्या हाती पैसा येईल. **शुभ दिनांक : २२,२३**

### महत्वाचे निर्णय घेणे टाळा

**मीन :** आठवड्याच्या सुरवातीच्या दिवशी आपण व्यावसायिक बाबतीत संपूर्णपणे लक्ष केंद्रित करू शकणार नसल्याने महत्वाचे निर्णय घेणे टाळावे. पहिल्या दिवशी आपण स्वतःच्या स्थितीचे आकलन व आत्मचिंतन करू शकाल. सध्या शासकीय किंवा न्यायालयाशी संबंधित कामात सावधपणे पाऊल टाकावे. आपण धार्मिक मार्गावर वाटचाल करून एखाद्या तीर्थयात्रेस जाण्याचे आयोजन कराल. प्रथम दिवस वगळता प्रियव्यक्ती किंवा स्नेहीजनांच्या सहवासात आनंदात वेळ घालवू शकाल.. भागीदारी व्यवसायात लाभ होईल. अखेरच्या दिवशी संबंधांना नवीन उंचीवर घेऊन जाण्यात आपण यशस्वी व्हाल. विद्यार्थ्यांसाठी आठवडा अनुकूल आहे. दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अध्ययन चांगले होऊ शकेल. ह्या आठवड्यात प्राप्तीच्या साधनात वाढ झाल्याने आपला कल वैभवी जीवनशैलीकडे होण्याची शक्यता आहे. **महिलावर्ग :** आपणास आर्थिक लाभ व सामाजिक प्रतिष्ठेसह कौटुंबिक जीवनात सुख समाधान असल्याचे जाणवेल. मनोरंजन, प्रवास, मित्रांची भेट, रुचकर भोजन, सुंदर वस्त्र परिधान, भिन्नलिंगी व्यक्तींची जवळीक आपणास आनंदित करेल. **शुभ दिनांक : १८,२०**

# मोहोर

# सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा मिळाला, पण...

**सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कलम ३७० रद्द झाल्यानंतर काश्मीरमध्ये निवडणुका होतील. मात्र, तशा त्या झाल्या आणि सरकारच्या निर्णयाविरुद्ध लोकांनी मतदान केले, वेगळे पक्ष निवडून आले तर तिथे पुन्हा राजकीय अस्थिरता सुरु होण्याचा धोका आहे. असे झाले तर ही मोठी चूक ठरु शकते. आज आपण नेहरुंनी कशा चुका केल्या यावर बोलतो. पण आणखी सत्तर वर्षांनी पुढची पिढी कदाचित आपल्या चुकांवर बोलेल.**

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानंतर काश्मीरमधील ३७० वे कलम रद्द करण्यासंबंधीचा प्रदीर्घ काळ चर्चेतला विषय निकाली निघाला. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी नरेंद्र मोदी यांनी ३७० व्या कलमामुळे काश्मीरची प्रगती झाली नाही, तेथील स्थानिकांवर अन्याय झाला वा तिथे विकास होऊ शकला नाही असे एक ना अनेक मुद्दे उपस्थित केले होते. याच अनुषंगाने भाजपाच्या बऱ्याच घोषणा वा आश्वासनांमध्येही ३७० आणि ३५ अ कलम काढून टाकण्याचा विषय अग्रणी ठेवण्यात आला होता. मोदी दुसऱ्यांदा निवडून आले तेव्हा सेंट्रल हॉलमध्ये संसद सदस्यांसमोर भाषण करताना भारताच्या राज्यघटनेला नमस्कार करुन यापुढे हाच भारताचा धर्मग्रंथ असल्याचे विधानही त्यांनी केले होते, जे बरेच गाजलेही होते. त्यामुळेच पुढच्या काळात कोणत्या गोष्टी राज्यघटनेप्रमाणे घडल्या आणि कोणत्या घडल्या नाहीत, याचे विश्लेषण करणेही गरजेचे ठरते. इतिहासात डोकावून बघता घटना समितीतील संविधानाचा मसुदा तयार करणाऱ्या तज्ज्ञांनी ३०६ अ या क्रमांकाच्या कलमाचे प्रारुप निश्चित केले आणि त्यावर १३ आणि १७ ऑक्टोबर १९४९ रोजी सविस्तर चर्चा झाली होती असे समजते. त्यानुसारच इतर राज्यांच्या तरतुदी काश्मीरमध्ये लागू करता येणार नाहीत, तिथे केंद्र सरकारला मर्यादित अधिकार राहतील असेही निश्चित करण्यात आले होते. या अधिकारांमध्ये केवळ संरक्षण, परराष्ट्र संबंध आणि दळणवळण एवढ्याच तीन गोष्टी होत्या. थोडक्यात, काश्मीरमध्ये हे कलम लावण्याचा निर्णय पं. नेहरु या एका व्यक्तीचा नसून त्याला सर्वांची संमती होती, हे आपण लक्षात घेणे गरजेचे आहे. राष्ट्रपती हे कलम रद्द करु शकतील परंतु त्यासाठी काश्मीरच्या घटना समितीची शिफारस आवश्यक असेल, अशा स्वरुपाची तरतूदही त्यात होती.

आता राज्यघटनेत हे कलम घालण्यामागील कारणांचीही माहिती घ्यायला हवी. त्या सुमारास गोपाळस्वामी अय्यंगार यांनी केलेल्या भाषणात काश्मीरमध्ये सुरू असणाऱ्या लढाईचा उल्लेख केला आणि काही भागावर शत्रूचा ताबा असल्याची बाबही मांडली. खेरीज या भूभागाविषयी संयुक्त राष्ट्रसंघातही चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे कदाचित काश्मीरमध्ये सार्वमत घ्यावे लागेल आणि काश्मीरची घटना समिती बाकीच्या सर्व बाबी ठरवेल, असे एकत्रितरित्या ठरवण्यात आले. पुढे १७ ऑक्टोबर १९४९ रोजी हे ३७० कलम स्वीकृत करण्यात आले. त्यावेळी काश्मीर हे भारताचे पंधरावे राज्य होते. आपल्या राज्यघटनेतील पहिल्या क्रमांकाच्या कलमात 'इंडिया' अर्थात 'भारत' हा राज्यांचा समूह असेल, असे म्हटले आहे. याचे दोन अर्थ होतात. एक म्हणजे अनेक राज्ये एकत्र येऊन भारताचे संघराज्य झाले नसून एका राज्यातून घटकराज्यांकडे सत्ता सोपवण्यात आली आहे, हा यातील पहिला भाग आणि या संघराज्यातून कोणालाही बाहेर पडता येणार नाही हा दुसरा भाग. याला 'राईट टू सिसिड' म्हणतात. त्यामुळे आता काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे याबाबत कोणतीही शंका नाही. म्हणजेच काश्मीरबाबतचे सर्व निर्णय आपणच ठरवायचे असून त्यात युनायटेड नेशन्स, अमेरिका, पाकिस्तान यांचा काहीही संबंध नाही. थोडक्यात, जम्मू आणि काश्मीर एक पूर्ण भाग असल्याचे राज्यघटनेतील 'कलम एक'मधून कळते.

**प्रा. उल्हास बापट**

आणखी एक बाब म्हणजे आधी या भागासंबंधी केंद्र सरकारला तीनच अधिकार दिले होते. पण संसदेला १९५४ पासून काश्मीर सरकार आणि केंद्र सरकारच्या सहमतीतून राष्ट्रपतींच्या हुकूमाद्वारे केंद्र सूचीतील सर्वच विषयांवर कायदे करण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याचबरोबर भारताच्या संघराज्यात आल्यावर तेथील वंशपरंपरागत राजा ही संकल्पना अस्त पावली आणि शेख महंमद अब्दुल्ला हे पहिले पंतप्रधान झाले तर युवराज करण सिंग हे पहिले 'सरदार ए रियासत' झाले. पण नंतर हे नामकरणही बदलून तिथे मुख्यमंत्री व राज्यपाल असे नवे नाव दिले गेले. थोडक्यात, या बदलांबरोबर राष्ट्रपतींच्या पुढच्या अनेक सुधारित हुकूमांनुसार ३७० कलम फारच सौम्य झाले होते. काही अंतर्गत कायदे वगळले तर तेथील स्थिती इतर राज्यांप्रमाणेच होती. उदाहरणार्थ, राष्ट्रपतींकडून राज्यपालांची नेमणूक होणे, राज्यपालांनी मुख्यमंत्री नेमणे आणि इतर मंत्र्यांची नेमणूक मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार होणे, मंत्रिमंडळ विधानसभेस जबाबदार असणे, उच्च न्यायालयातील न्यायाधिश राष्ट्रपतींनी नेमणे असे सर्व काश्मीरमध्ये पहायला मिळत होते. या सगळ्याबरोबरच अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे १९८६ मध्ये राजीव गांधी पंतप्रधान असताना काश्मीरला २४९ वे कलम लागू झाले. याचा अर्थ, राज्यसभेने दोन तृतियांश मतांनी एखादा ठराव संमत केला तर काश्मीर राज्याच्या कक्षेतील कोणत्याही विषयावर केंद्र सरकारला कायदा करता येईल असा होता. त्यामुळे राज्यांचे नाव बदलणे, क्षेत्र बदलणे यातही हस्तक्षेप करणे शक्य झाले.

कलम ३५६ नुसार राष्ट्रपती राजवटदेखील लागू करता येते. अशा रितीने दरम्यानच्या काळात काश्मीरमधील ३७० वे कलम ९० टक्के सौम्य करण्यात आले होते. उरलेले दहा टक्के तेवढे राहिले होते. ३७० कलम रद्द झाल्यानंतर हा शेवटचा हातोडाही पडला आणि एक विषय पूर्ण झाला. हा निकाल दिला गेला तेव्हा काश्मीरमध्ये आठव्यांदा राष्ट्रपती राजवट लावली होती. ३७० आणि ३५ अ हे कलम रद्द करण्यामागील महत्त्वाचे कारण म्हणजे यामुळे केवळ काश्मीरचे रहिवासी असणाऱ्यांनाच नोकऱ्या, वास्तव्य, संपत्तीविषयक काही खास अधिकार मिळत असल्याचा उल्लेख वारंवार केला जातो. इतरांवर हा अन्याय आहे, अशा स्वरुपाचे वक्तव्यही बरेचदा ऐकायला मिळत होते. मात्र या तरतुदी तात्पुरत्या स्वरुपाच्या असून हीच स्थिती नागालँड, मणिपूर, मिझोराम आदी भागातही कमी-अधिक प्रमाणात खास परिस्थितीनुसार आताही बघायला मिळते. तिथेही अशा काही तरतुदी अजून लागू आहेत. त्यामुळेच काश्मीर हा एकमेव अपवाद नव्हता, हे आपण समजून घ्यायला हवे. कायमच्या रहिवाशांनाच नोकऱ्या देण्याच्या विषयासंबंधीही हीच परिस्थिती पहायला मिळते. जगनमोहन रेड्डी यांनी आंध्र प्रदेशमध्ये अशाच स्वरुपाचा कायदा केला होता. कमलनाथ यांनीदेखील मध्य प्रदेशमध्ये अशाच स्वरुपाचे कायदे करणार असल्याचे सांगितले होते. महाराष्ट्रात सुभाष देसाई उद्योगमंत्री असण्याच्या काळात ८० टक्के जागा स्थानिक लोकांसाठी ठेवण्याचे सूचित केले होते. म्हणजेच केवळ काश्मीरमध्येच नव्हे तर प्रत्येक राज्यात असे काही ना काही घडत असते. त्यात विशेष काही नाही.

असे असले तरी आता न्यायालयाने काश्मीरमधून ३७० कलम काढल्यानंतर काश्मीरसंदर्भात काही बदल नक्कीच बघायला मिळेल. पहिले म्हणजे, या निकालामुळे काश्मीरला संपूर्ण राज्यघटना लागू झाली. पण एक-दोन बारीक गोष्टी अशा की, राज्याचे दोन केंद्रशासित प्रदेश केले आहेत. राज्यघटनेतील तिसऱ्या कलमानुसार संसदेला राज्याच्या सीमा बदलण्याचा, नाव बदलण्याचा, दोन राज्ये एकत्र करुन नवीन राज्य बनवण्याचा, एखाद्या राज्याचा भाग काढून वेगळे राज्य बनवण्याचा अधिकार आहे. परंतु, राज्याचा केंद्रशासित प्रदेश करण्याविषयी राज्यघटनेत लिहिलेले नाही. आणखी एक बाब म्हणजे अशा तऱ्हेने घटक राज्याच्या सीमा बदलायच्या असतील वा नाव बदलायचे असेल तर राष्ट्रपतींनी त्या राज्याच्या विधानसभेचे मत विचारात घेणे गरजेचे आहे. काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट असल्याने विधानसभा नव्हतीच. ३५६ कलमांतर्गत राष्ट्रपती राजवट लावली जाते तेव्हा विधानसभेचे अधिकार संसदेकडे येतात. तेव्हा संसदेला विचारले म्हणजे विधानसभेला विचारलेच असा केंद्र सरकारचा यासंबंधीचा पवित्रा होता. पण याचा दुसरा अर्थ असा की, या सगळ्यात काश्मीरच्या जनतेला विश्वासात घेतलेच गेले नाही. अनेक घटनातज्ज्ञांच्या मते, कोणताही संबंध संमतीवर अवलंबून असतो. म्हणजेच संमती असेल तर ते लग्न होते आणि संमती नसेल तर तो बलात्कार होतो. असे असल्यामुळेच काश्मीरच्या जनतेला न विचारात त्याला युनियन टेरिटरी करणे कितपत योग्य आहे, याचे उत्तर सर्वोच्च न्यायालयाने ताज्या निकालामध्ये दिलेले नाही.

दुसरी बाब म्हणजे, जम्मू-काश्मीरला लवकरात लवकर पुन्हा राज्याचा दर्जा देण्याबाबतही सूचित करण्यात आले आहे. खेरीज तिथे निवडणुका घेण्याबाबतही योग्य ते आदेश देण्यात आले आहेत, कारण लोकशाही व्यवस्थेत निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व असते. मात्र, तिथे आधी निवडणुका घ्यायला हव्या होत्या आणि निवडून आलेल्या विधानसभेला त्यांचे मत विचारुन हे निर्णय घ्यायला हवे होते. असे न झाल्यामुळे उद्या निवडणुका झाल्या आणि सरकारच्या लोकांनी निर्णयाविरुद्ध मतदान केले, वेगळे पक्ष निवडून आले तर तिथे पुन्हा राजकीय अस्थिरता सुरू होण्याचा धोका आहे. असे झाले तर ही मोठी चूक ठरु शकते. आज आपण सत्तर वर्षांपूर्वी नेहरुंनी कशा चुका केल्या यावर बोलतो. पण आणखी सत्तर वर्षांनी पुढची पिढी कदाचित आपण कशा चुका केल्या यावर बोलेल. म्हणूनच आता तात्पुरत्या राजकीय फायद्याचा विचार मागे ठेवून राज्यघटनेनुसार पुढे जायला पाहिजे. त्यातच सर्वांचे भले आहे.

■■

# कटिबद्ध असणे म्हणजे...

**परिणीता पोटे**

व्यक्तिमत्त्व म्हणजे दिसणे, बोलणे, विचार व्यक्त करणे, आत्मविश्वास, नजरेतील ठामपणा या गोष्टी असतात. जे दिसते ते क्षणकाल टिकते, मात्र जे असते ते सखोल परिणाम करते. एखाद्या कामाबद्दल, स्वतःच्या शब्दाबद्दल आणि इतरांच्या वेळेबद्दल जाणीव आणि बांधिलकी असणे हा व्यक्तिमत्त्वातला मोठा पैलू आहे. दिलेले वचन विसरणे, स्वतःच स्वतःच्या कामाबद्दल निष्ठा न बाळगणे यामुळे आपल्या शब्दाचे महत्त्व आपणच कमी करत असतो. एखाद्या विचाराने भारावून जाऊन, कामाला सुरुवात करणे, आरंभशूर असणे आणि कालांतराने त्या कामातले स्वारस्य जाऊन तिकडे दुर्लक्ष करणे ही स्वाभाविकपणे दिसणारी घटना. मात्र स्वतः स्वतःच्या कामाशी, निर्णयाशी, वेळेशी आणि शब्दाशी बांधील राहून ते काम, तो विचार तडीस नेणे म्हणजे कटिबद्ध असणे. परिणीता पोटे यांनी त्यांच्या कामातून 'कमिटमेंट' ही जाणीव कशी पक्व होत गेली याबद्दल लिहिलेले अनुभव वाचू या.

**कटिबद्ध कोणाशी? कशासाठी?**

कमिटेड! कोणाशी? स्वतःशी. कशासाठी स्वतःसाठी. कमिटमेंट म्हणजे फक्त इच्छा नव्हे. कमिटमेंट म्हणजे एखादी गोष्ट करणे फारसे सोयीचे नसतानाही ती करत राहणे. आयुष्यात भेटलेल्या लोकांची आठवण सतत येत असते. एक श्रुती ताई होती. ती म्हणायची, एखादे काम सुंदर, नीटनेटके, योग्य पद्धतीने करण्यासाठी ते काम स्वतः केले आहे एवढे एकच कारण पुरेसे आहे. स्वतःच्या हातून योग्य पद्धतीने काम घडण्यासाठी बाहेरचे कोठलेही मोटिवेशन असू नये. स्वतः जे काम करीन ते चांगलेच असेल हे एकच कारण काम चांगले घडण्यासाठी पुरेसे आहे. मग ते काम म्हणजे एखादे भांडे घासणे असू दे, लेखनातील अक्षर असू दे, तयार केलेला रिपोर्ट असू दे काहीही-कोठलेही काम! ते काम ह्याच 'कमिटमेंट'ने चांगले करावे.

मी अकरावीत असताना गुजरातला भूकंप झाला. मला एका टीमबरोबर तेथे मदत करण्यास जाण्याची संधी मिळाली. गुजरातमधील भचाऊ गावाला पोचतानाचे दृश्य धक्कादायक होते. घरे, बिल्डिंग, उंच-उंच इमारती सर्व पत्त्यांच्या बंगल्यासारख्या कोसळल्या होत्या. त्या दिवसांमध्ये स्वतःला जीवनात काय करायचे आहे याबद्दल माझ्या मनात आराखडे तयार होत होते. भचाऊ गावाचे ते दृश्य पाहून मनात आले, की आयुष्यभर कष्ट करून एखाद्याने घर बांधले आणि निसर्गाने ते वास्तूशांतीच्याच दिवशी कवेत घेतले. लोकांनी जवळची माणसे मरताना बघितली. जोडीदाराचा मृत्यू लग्नाच्या दिवशीच घडून आला आणि गंमत म्हणजे, अख्खी इमारत जमिनीखाली गेली असतानाही लोक आत जिवंत राहिले! आणि जीव वाचवण्यासाठी घराबाहेर पडणारी व्यक्ती तिच्याच घराच्या कमानीखाली येऊन मरण पावली! घरात थांबलेले सुरक्षित राहिले. अशा सर्व घटनांवरून मनाने ठरवले, की यात काही फार अर्थ नाही! म्हणजे, निसर्गाचे किंवा कोठल्या तरी शक्तीचे हा पसारा चालवण्यावर नियंत्रण आहे. मग ज्या गोष्टी स्वतःकडून हिरावल्या जाऊ शकतात त्या मिळवण्याचा प्रयत्न करण्यावर किती भर द्यावा?

त्यातच तेथे असलेल्या एका मिलिटरी ऑफिसरांची ओळख झाली. त्यांनी संपूर्ण गावाच्या जेवणाच्या व्यवस्थेची जबाबदारी घेतली होती. प्रत्येकाला स्वच्छ चवदार असे एक वेळचे जेवण मिळत होते. जेव्हा मदत केंद्र उभे करण्यासाठी बैठक झाली तेव्हा त्या ऑफिसरने सांगितले होते, की जे काम कोणी घेणार नाही ते मी घेईन. ते काम होते स्वयंपाक करण्याचे. त्यांना स्वयंपाकाची सवय त्या आधी अजिबात नव्हती. पण, त्यांनी सकाळी उठून ट्रॅक्टर घेऊन लाकडे तोडायला जाणे, स्वयंपाक, त्यानंतरची स्वच्छता हे सारे शिकून घेतले. ते संपूर्ण गावासाठी काही महिने सातत्याने आणि खूप आनंदाने जेवणाची सोय करायचे. मी त्याचदरम्यान समाजकार्य शिक्षण घेण्याचा निर्णय घेतला. मी समाजकार्य शिक्षण 'मातृ सेवा संघा'त घेतले. प्रत्येक शिक्षक शिकवायचे तेव्हा त्यांची त्या विषयाबद्दलची तळमळ, विषयाबद्दलची स्पष्टता, विषय विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्याची धडपड आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, ते जे शिकवत होते तसे जगण्याचा निश्चय, हे बघण्याचे भाग्य मला लाभले. त्यांनी त्यांना 'प्रोटोकॉल'नुसार जेवढे शिकवणे गरजेचे होते त्याच्या पुढे जाऊन शिकवले. त्याचा रेकॉर्ड कोठेही नाही, पण असंख्य विद्यार्थ्यांच्या मनात आहे. महाविद्यालयातील सर्व शिक्षक नेहमी म्हणत, की तुझा पिंडच समाज कार्यकर्त्याचा आहे.

एक शिक्षिका मी लायब्ररीत जास्त वेळ अभ्यास करावा म्हणून वर्षभर स्वतःच्या डब्यासोबत माझ्यासाठी डबा आणायच्या. तो डबादेखील पोषक आहाराच्या आदर्श डब्याचे प्रात्यक्षिक असे. त्यांना ते करून काय मिळाले? त्यांचे ते करायचे ठरले होते. ते त्यांनी का केले-कसे केले हे त्यांनी कोठेच सांगितले नाही, म्हणून वाया गेले का? त्या म्हणायच्या, की कोणी जे काम करतो त्याचे परिणाम त्या काळी त्याला दिसत नाहीत. पण, दहा-बारा वर्षांपूर्वीचे विद्यार्थी जेव्हा फोन करून त्यांच्या प्रगतीबद्दल सांगतात तेव्हा आमचे काम आम्हाला कळून येते. आम्हाला आठवड्यातील काही दिवस 'फील्ड वर्क' आणि काही दिवस 'क्लासेस' असे असायचे. 'क्लासेस'च्या दिवशी शिक्षकांचे व्याख्यान ऐकत असताना माझे मन ते शिकवत असलेल्या गोष्टी 'फील्ड वर्क'मध्ये घडलेल्या गोष्टींशी जुळवून बघायचे. ते शिकवत असलेल्या कोठल्या गोष्टी 'फिल्ड वर्क'मध्ये कशा वापरू शकतो? मागील 'फील्ड वर्क'मध्ये जे केले होते त्याची पद्धत योग्य होती का? कोठल्या लोकांशी बोलताना काही वेगळे बोलता आले असते, याबद्दल मन विचार करायचे. त्यामुळे मी वर्गात प्रश्न विचारत नसे. मी माझ्या विचारांत हरवलेली असायची. पण मी काय करते याची अचूक जाण माझ्या शिक्षकांना होती. त्यांनीच ते माझ्या नजरेस आणून दिले होते.

आम्ही 'फील्ड वर्क'मध्ये 'जर्नल' लिहायचो. त्यात 'फील्ड वर्क'मध्ये केलेल्या प्रत्येक गोष्टीची, प्रत्येक वाक्याची नोंद असायची. शिक्षक ती तपासायचे. एकदा मी लिहिले होते, की 'कम्युनिटी'त गेल्यानंतर एका मुलाने मला काही फुले आणून दिली. मी फुले आणून दिली ह्या आनंदात होते, की त्यांनी मला कार्यकर्ता म्हणून स्वीकारले ह्या? पण मला आठवते, माझ्या शिक्षकांनी लिहिले होते, की फुले का आणून दिली याचा विचार कर. तेव्हापासून समोरची व्यक्ती जशी वागते तशी ती का वागते, क्लाएंट एखादी गोष्ट बोलतो ती तशी का बोलतो? त्याच्या बोलण्यामागचा अर्थ काय? त्याच्या कृतींमागे अर्थ काय? असे विचार करण्याची सवय लागली. शिक्षकांशी चर्चा करताना माझ्या एका आवडत्या शिक्षकांनी मला सांगितले, की कधी कधी किंवा नेहमीच स्वत:समोर व्यक्ती उपस्थित असेल असे नाही, पण पुस्तकांच्या रूपाने स्वत:कडे ज्ञान असते आणि ते जे ज्ञान असते ते स्वत:च्या मदतीला नेहमी धावून येते. थिअरी व प्रॅक्टिकल वेगवेगळे असे कधीच शिकवले गेले नाही. थिअरी ही अनुभवातून निर्माण झालेली असते. त्यामुळे तिचा व्यवहारात उपयोग होतो आणि समाजकार्य शिक्षणाच्या थिअरीचा तर होतोच होतो. 'चॅरिटी' या शब्दापासून सुरू झालेले समाजकार्य एक विद्याशाखा म्हणून प्रगत झालेले आहे. पण, त्या ज्ञानशाखेचा अभ्यास करण्याची तयारी नसल्याने त्याकडे संकुचित वृत्तीने बघितले जाते. एखाद्याची मदत तात्पुरती पूर्ण करणे एवढेच समाजकार्य असे बघतो. पण समाजकार्य हे समाजाला शाश्वत टिकणारे आणि सध्याच्या युगात क्लिष्ट झालेल्या समस्यांचे उत्तर देणारे असे असू शकते.

मला समाजकार्य शिक्षणाने एक गोष्ट शिकवली. ती म्हणजे स्वतः कोणी कोणाचे कल्याण करू शकत नाही, तो अहंकार कोणी बाळगू नये. प्रत्येकाची समस्या ती व्यक्ती स्वतः चांगल्या रीतीने ओळखत असते. म्हणून तिचे अचूक उत्तरही त्या व्यक्तीला माहीत असते, जर सुचवलेले मार्ग किंवा मदतीची पद्धत मदत घेणाऱ्याला आवडली नाही तर त्याचा अर्थ त्या व्यक्तीला पूर्णपणे समजून घेण्यात उणेपणा राहिला. त्या व्यक्तीला अजून समजून घेण्याची गरज आहे. त्यासाठी समाजकार्य करणाऱ्या तज्ज्ञांनी आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या ज्ञानक्षेत्रांचा भरपूर अभ्यास करणे गरजेचे आहे. मी पुस्तकांमध्ये आवडलेली वाक्ये अंडरलाईन करून ठेवत तशा खूप पुस्तकांचा संग्रह घरी केलेला आहे. अजूनही काम करताना अडचणी आल्या, निराशा वाटली, सुचेनासे झाले की मी शिक्षकांना फोन करण्याच्या आधी पुस्तक चाळते. समाजकार्य ह्या शाखेकडे या पद्धतीने बघण्यास हवे. फक्त इच्छा झाली म्हणून समाजकार्य करण्यापेक्षा स्वत:च्या अनुभवातून मिळणाऱ्या ज्ञानाचा जास्तीत जास्त परिणामकारक उपयोग इतरांना कसा होईल यासाठी ते कार्य ज्ञानाआधारित असणे गरजेचे आहे. समाजकार्य म्हणजे फक्त 'फील्ड वर्क' असाही गैरसमज आहे, समाजकार्य म्हणजे कार्यकर्ता व्यक्ती कोठे जाऊन काय करतो यापेक्षा तिच्यासमोर असलेल्या व्यक्तीशी ती काय बोलते, कसे बोलते, तिचे दु:ख-तिचे विचार समजून घेताना तिला नवीन विचार-दृष्टिकोन देऊन स्वयंपूर्ण कसे करावे याबद्दलचे ते ज्ञान आहे. उन्हातानात फिरून रस्त्यावरही ते करता येते आणि केबिनमध्ये बसूनही करता येते. समाजकार्य हे एकच ज्ञान समाजाच्या सर्व गरजा पूर्ण करू शकते, असा दावा समाजकार्य कधीच करत नाही, पण समाजकार्यकर्ता योगदान देऊ शकतो हे मात्र नक्की. मी दहावीनंतर समाजकार्य शाखेत प्रवेश घेतला. मी सध्या पीएच डी करत आहे. तो प्रवास करत असताना त्या ज्ञानासंदर्भात माझे एक अधिष्ठान तयार झाले आहे, असे मला वाटते. समाजकार्य पद्धत ही समस्याग्रस्त व्यक्तीशी कमिटमेंट आहे. ती कमिटमेंट कधीच बदलू शकत नाही. ती 'कमिटमेंट' काय आहे हे समजावून सांगण्याच्या पलीकडील आहे.

लोक विचारतात, काम करत असताना लोकांचे दु:खद प्रसंग सतत ऐकण्यामुळे समाज कार्यकर्त्यास निराशा येत नाही का? तर नाही! कारण त्याला त्याच्या मर्यादा माहीत असतात. समाजकार्यकर्ता इतरांना मदत करत असतो, तो स्वतःलाच मदत करत असतो. त्यामुळे ते काम कोणासाठी करण्याचे, कोणाला दिसावे म्हणून करण्याचे-कोणी कौतुक करावे म्हणून करण्याचा प्रश्नच येत नाही. अर्थात कौतुक झाले की आनंद होतो, पण नाही झाले-कोणी शंका घेतल्या तरी हरकत नाही. समाज कार्यकर्त्याने स्वतःसाठी घेतलेले ते व्रत असते. हे कृतिरूप ज्ञान पोचवणाऱ्या सर्वांना एवढेच सांगणे आहे, की आम्ही चालवू हा पुढे वारसा.

■■ **(सौजन्य : थिंक महाराष्ट्र)**

# रस्त्यावरील अपघातात द्या माणुसकीचा हात - भाग १

डॉ चंद्रशेखर साठये

अस्थिरोग तज्ज्ञ, सुश्रुत हॉस्पिटल, अलिबाग, (२००३ पासून) वरीष्ठ अस्थिरोग तज्ज्ञ अपोलो हॉस्पिटल, बेलापूर नवी मुंबई, (२०१९ पासून), अतिरिक्त प्राध्यापक अस्थिरोग विभाग महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय, नवी मुंबई (२०२२ पासून), माजी अध्यक्ष आयएम ए, अलिबाग (२००६ ते २००८), शिक्षण, काम व छंद म्हणून जगभर प्रवास अलास्का ते न्यूझीलंड आणि शांघाय ते रिओ-दी-जनैरो आणि अंटार्टिका असे आजवर सातही खंड आणि जवळजवळ ३१ देशांची सफर, वृत्तपत्रांतून व नियतकालिकांतून विविध विषयांवर लेखन.

जगभरात मिनिटाला साधारण ९० जणांचा अपघातात मृत्यू होतो. वर्षभरात जगात सुमारे ५८ लक्ष लोकांचा अपघातांमुळे मृत्यू होतो, आणि यांपैकी सुमारे १२ लाख लोक हे रस्त्यांवरील अपघातांमध्ये मृत्युमुखी पडतात. याखेरीज सुमारे २ ते ५ करोड व्यक्ती या विविध अपघातांमुळे जगात वर्षभरात तात्पुरत्या जायबंदी होतात वा कायमच्या अपंग होतात. अपघात हे वयाच्या ४५ वर्षांपेक्षा कमी वयोगटातील सर्वात महत्त्वाचे मृत्यूचे कारण आहे. १५ ते ४४ वर्षे वयोगटाचा विचार केला असता यातील एकंदर मृत्यूच्या कारणांपैकी ७० टक्के लोकांच्या मृत्यूचे कारण हे अपघात हे असते. आणि अपघातांचे व अपघाती मृत्यूंचे प्रमाण हे जागतिक आरोग्य संघटनेच्या अभ्यासानुसार काढलेल्या निष्कर्षांप्रमाणे २०२४ सालापर्यंत जवळजवळ ८० टक्क्यांनी वाढणार आहे.

अपघातग्रस्त व्यक्तीला अपघात झाल्यापासून अपघाताच्या जागेवरून उचलून रुग्णालयात नेऊन विविध उपचार करून बरे होऊन पूर्वपदावर येण्याकरिता खालील चार ठिकाणी घेतलेली काळजी, उपचार म हत्त्वाचे ठरतात.

१. अपघातस्थळी घेतलेली काळजी, भरती करण्यापूर्वीचे केलेले उपचार.

२. रुग्णालयातील उपचार.

३. एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात संदर्भित करत असताना घेतलेली काळजी, केलेले उपचार.

४. पूर्ण उपचार.

तर, या वरील चारही ठिकाणी होणारे उपचार एकसंघपणे झाले तर अपघातग्रस्त व्यक्ती पूर्वपदावर येण्याची शक्यता वाढते. प्रगत देशांत या सर्व प्रकारच्या उपचार यंत्रणांना एकत्र बांधून ठेवणारी प्रणाली अस्तित्वात आहे. भारतात मात्र या सर्व यंत्रणा विस्कळीतपणे कार्य करतात. त्यामुळे भारतात अपघातग्रस्त व्यक्ती पूर्वपदावर येण्यास बराच त्रास होतो.

विशेषतः भारतात रुग्णास अपघातस्थळी मिळणारी मदत व अपघातस्थळापासून ते रुग्णालयात पोहोचेपर्यंतच्या काळात होणारे उपचार हे फारच निकृष्ट दर्जाचे आहेत. अपघातस्थळी अनेकदा बघ्याची नुसतीच गर्दी जमते. अलीकडे काही जण सेल्फी, फोटो, व्हिडीओ काढण्यात मग्न असतात, तर काहीजण त्यांच्या मते जो अपघातात दोषी आहे त्याला धरुन मारण्यात धन्यता मानतात. काही जणांच्या मनात पोलीस कोर्ट-कचेऱ्यांची भीती असते, म्हणून ते अपघातग्रस्तास मदत करण्यास पुढे येत नाहीत. तर काहीजण रक्ताची किंवा जखमांची भीती वाटल्यामुळे ते मदतीस पुढे येत नाहीत. या सर्व गोष्टींमुळे बिचारी अपघातात इजा झालेली व्यक्ती योग्य मदतीअभावी मृत्यू किंवा त्याची अवस्था/जखमा सुधारणेपलीकडे जातात व त्यास कायमचे अपंगत्व येऊ शकते.

अपघातग्रस्त व्यक्तीला मिळेल त्या साधनाने रिक्षा, ट्रक, ट्रॅक्टरमध्ये उचलून जवळच्या रुग्णालयात नेले जाते. अलीकडे १०८ रुग्णवाहिका सेवा त्यामानाने बरीच सुधारली आहे. त्यामुळे रुग्णवाहिकेतून रुग्णाला इस्पितळात नेण्याचे प्रमाण वाढले आहे. पण, कित्येकदा या रुग्णवाहिकेतील चालक, स्टाफला अपघातग्रस्त रुग्णाला हाताळण्याचे पुरेसे प्रशिक्षण दिलेले नसते. त्यामुळे रुग्णाला उचलताना, वाहून नेताना त्यांच्या जखमांची तीव्रता वाढू शकते व रुग्णाची अवस्था चिंताजनक होऊ शकते. तसेच या रुग्णवहिकांनी अशा रुग्णांना कोठे न्यावयाचे यासाठी फारशी मार्गदर्शक तत्त्वे नाहीत, त्यामुळे बऱ्याचदा असे अपघातग्रस्त रुग्ण अशा ठिकाणी रुग्णालयात नेले जातात की तेथे त्यांचा इलाज करण्याच्या सुविधाच उपलब्ध नसतात. त्यामुळे तेथून पुन्हा अशा रुग्णांना दुसरीकडे हलवावे लागते. या सर्व प्रक्रियेत रुग्णांच्या जखमा गंभीर स्वरुप धारण करण्याची शक्यता आणखीन वाढते.

या सर्व बाबींमुळे भारतात रस्त्यावरील अपघातात अपघातग्रस्त रुग्ण मृत्युमुखी पडण्याचे वा त्यास कायम चे अपंगत्व येणचे प्रमाण खूपच जास्त आहे. यावर उपाय म्हणजे , अपघातग्रस्त रुग्णांच्या उपचाराकरिता प्रणालीची निर्मिती. यात-

१) अपघात झाल्याबरोबर आजूबाजूच्या व्यक्तींनी अपघातग्रस्त व्यक्तीला मदत करणे, ठराविक राष्ट्रीय दूरध्वनी क्रमांकावर फोन करून अपघाताची माहिती देणे.

२) त्या क्रमांकामधून मेसेज अशा ठिकाणी पोलीस, फायरबिग्रेड, ॲम्ब्युलन्सला पाठवले जाणे. त्यामुळे अपघातग्रस्त जागेजवळचे पोलीस, ॲम्ब्ल्युलन्स, अग्निशमन दलाचे वाहन स्टाफ यांना शोधणे व पाठवणे सोपे झाले आहे.

३) सदर ना अपघातग्रस्त व्यक्तींना सुरक्षितपणे बाहेर काढून, त्यांच्यावर आवश्यकते प्रथमोपचार करून योग्य रुग्णालयात वाहून नेण्याकरिता ॲम्ब्ल्युलन्स स्टाफला सदर रुग्णाच्या जखमा काय प्रकारच्या आहेत याची पडताळणी करण्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच आजूबाजूच्या परिसरात अशा रुग्णाला त्वरित व योग्य उपचार करण्यासाठी कोणते रुग्णालय उपलब्ध आहे याची माहिती ॲम्ब्युलन्स स्टाफला असणे आवश्यक आहे. ॲम्ब्युलन्स स्टाफने अशा रुग्णालयाला त्वरित पूर्वसूचना देऊन त्यास त्या रुग्णालयात वाहून नेणेही अपेक्षित आहे. जेणेकरुन सदर रुग्णालयातील त्या त्या जखमांकरिता तज्ज्ञ डॉक्टर उपचाराकरिता त्वरित उपलब्ध व्हावेत.

अशा प्रकारची रुग्णालयात भरती करण्यापूर्वीची मदत, काळजी घेतल्यास अपघातग्रस्त रुग्णाला पूर्वपदावर येण्यासाठीचा कालावधी खूप कमी होऊ शकतो व मृत्यूचे प्रमाणही कमी होते.

तर ही रूग्णालयात भरती करण्यापूर्वी अपघातग्रस्त रुग्णाला दिली जाणारी मदत किंवा काळजी असे म्हणतात. याबद्दल अजून भारतात फारच सुधारणांची गरज आहे. ही मदत विविध व्यक्ती, संस्था देतात यामध्ये अपघातस्थळी जमलेल्या गर्दीतील व्यक्ती, शासकीय प्रणालीतील व्यक्ती जसे पोलीस, अग्निशमन दल, रुग्णवाहिका स्टाफ, इतर 'वाहक' उदा. टॅक्सी, रिक्षा, ट्रॅक्टर, ट्रक ड्रायव्हर्स हे येतात. तसेच यात अशा वैद्यकीय संस्थामधील डॉक्टर्स व इतर स्टाफही येतात. जे की अशा अपघाततग्रस्त व्यक्तीचे पूर्ण उपचार करण्यास असमर्थ असतात. पण ते अशा रुग्णाचे प्रथमोपचार करू शकतात व त्यास योग्य त्या रुग्णालयात संदर्भित करू शकतात. तर या सर्व रुग्णालयांना अपघातातील रुग्णास मदत करणाऱ्या व्यक्तींचे प्रशिक्षण देऊन त्यांना याकरिता तयार करणे हे भारतातील अपघाती मृत्यू, अपंगत्वाचे प्रमाण कमी करण्याकरिता आवश्यक आहे. ■■

**काँग्रेसचा पराभव झाल्यानंतरही काँग्रेस पुन्हा पुन्हा सत्तेवर येऊ शकला आहे. अर्थात, पूर्वीच्या काळात जनसंघ असो वा नंतर भाजप असो किंवा अन्य पक्ष, ते एवढे प्रभावी नव्हते. आज भाजपचे रूपांतर महाशक्तीत झाले आहे. मात्र, तरीदेखील इंदिरा गांधी अथवा सोनिया गांधी असोत, त्यांनी सर्व प्रतिकूलतांवर मात करत, झुंजार वृत्ती दाखवत पक्षाला सत्तेवर आणून दाखवले आहे. नुकत्याच झालेल्या पाच राज्यांमधील निवडणुकांत तेलंगणा वगळता काँग्रेसचा बोऱ्या वाजला असला, तरीदेखील शहरातील आणि ग्रामीण भागातील तरुण वर्ग, शेतकरी, कामगार, व्यापारी, उद्योजक तसेच महिला यांना आकर्षित करून घेता येईल, असा कार्यक्रम काँग्रेसने तयार केला पाहिजे.**

# काँग्रेस सत्तेत येऊ शकते, पण...

हेमंत देसाई

स्वतंत्र भारताच्या तिसऱ्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ३६१ जागा मिळाल्या होत्या. तेव्हा पंडित जवाहरलाल नेहरू देशाचे पंतप्रधान होते. १९६४ साली नेहरूंचे निधन झाले आणि काँग्रेसचा मोठा आधार गेला. १९६६ मध्ये लालबहादूर शास्त्रींच्या अकस्मात मृत्यूनंतर काँग्रेस पक्षामध्ये पंतप्रधानपदासाठी स्पर्धा सुरू झाली आणि मोरारजी देसाई यांनी रिंगणात उडी घेतली. मात्र पंतप्रधानपदासाठी इंदिरा गांधींचे नाव सुचवण्याची सूचना काँग्रेस पक्षाध्यक्ष कामराज नाडर यांनी १३ राज्यांतील मुख्यमंत्र्यांना केली आणि त्या पंतप्रधान झाल्या. यातून नाही म्हटले, तरी काँग्रेस पक्षामध्ये असंतोष निर्माण झाला आणि जेष्ठांना दाबले जात असल्याची भावना तयार झाली, हे नाकारण्याची कारण नाही. याच काळात दुष्काळ पडून देशात काँग्रेसविरोधी जनभावना निर्माण झाली आणि १९६७ च्या निवडणुकीमध्ये या गोष्टीचे पडसाद उमटले.

या लोकसभा निवडणुकीत उजव्या विचाराच्या स्वतंत्र पक्षाने आधीपेक्षा २२ जागा जास्त मिळवून, एकूण ४४ जागी विजय मिळवला. तर जनसंघाला १९६२ साली जेवढ्या जागा मिळाल्या होत्या, त्यापेक्षा २१ अधिक, म्हणजे ३५ जागा मिळाल्या. प्रजासमाजवादी पक्ष व संयुक्त समाजवादी पक्ष या दोन्ही समाजवादी पक्षांना मिळून आधीपेक्षा १८ जास्त, म्हणजे एकूण ३६ जागा मिळाल्या. तर भारतीय कम्युनिस्ट पक्ष आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष या दोन डाव्या पक्षांना एकंदर ४२ म्हणजे, आधीपेक्षा १३ जागा जास्त मिळाल्या. या निवडणुकीत काँग्रेसची एकूण मते १९६२ च्या तुलनेत चार टक्क्यांनी कमी होऊन, ती ४० टक्क्यांवर आली. १९६७ साली झालेल्या विधानसभा निवडणुकांत सात राज्यांमध्ये काँग्रेसेतर पक्षांची सरकारे स्थापन झाली. एकंदरीत १९६७ च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांत काँग्रेसची पीछेहाट झाली. राम मनोहर लोहिया प्रणीत काँग्रेसविरोधी आघाडीला यश मिळाले. मात्र विरोधी पक्षांची आपापसांत भांडणे होऊन, त्यातील बहुतेक सरकारे कोसळली. शिवाय लोहिया यांच्या मृत्यूमुळे गटबंधनाचे राजकारण मागे पडले. नोव्हेंबर १९६९ मध्ये काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर सुमारे दीड वर्षांनी, चौथी लोकसभा विसर्जित करून, मुदतपूर्व निवडणुका घेण्याचा धाडसी निर्णय इंदिरा गांधी यांनी घेतला. त्यामुळे त्याचा फायदा होऊन इंदिरा काँग्रेसला ४३ टक्के मते आणि ३५२ जागा मिळाल्या. तर संघटना काँग्रेसला केवळ २६ जागांवर समाधान मानावे लागले. भारतीय जनसंघास अवघ्या २२, स्वतंत्र पक्षाला आठ आणि संयुक्त समाजवादी पक्षास तीन जागा मिळाल्या. भाकपला २३ तर माकपला २५ जागांवर विजय संपादन करता आला. आपली काँग्रेस हीच खरी काँग्रेस आहे, हे इंदिरा गांधी यांनी सिद्ध करून दाखवले. गरीबी हटाव आणि समाजवादी धोरणांमुळे काँग्रेसपासून दूर गेलेले अनेक सामाजिक घटक पुन्हा पक्षाकडे वळू लागले. गोरगरिबांमध्ये इंदिराअम्मांबद्दल प्रेम निर्माण झाले.

इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी आणून एकाधिकारशाही लादल्यामुळे १९७७ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये इंदिरा काँग्रेसला केवळ ३४ टक्के मते आणि १५४ जागा मिळाल्या. याउलट जनता पक्षाला २६७ जागा प्राप्त झाल्या. जनता पक्ष हा नव्यानेच स्थापन झालेला होता. तरीही इंदिराविरोधी नाराजी असल्याचा हा परिणाम होता. त्यावेळी जगजीवन राम आणि हेमवतीनंदन बहुगुणा यांच्या लोकशाही काँग्रेसला २८ जागा मिळाल्या होत्या. मात्र जनता पक्षातील गटबाजी आणि नळावरच्या भांडणांप्रमाणे रोजच्या रोज होणाऱ्या हाणामाऱ्या यामुळे ते सरकार १९७९ मध्येच कोसळले. चरणसिंग सरकार काही दिवसच टिकले होते. तिकडे विरोधात बसावे लागल्यानंतर देखील इंदिरा गांधी यांनी सतत गोरगरिबांचे प्रश्न उठवणे चालूच ठेवले होते. जनता सरकारच्या कारकिर्दीत बडे जमीनदार, बागायतदार आणि सरंजामदारांचे राजकीय वर्चस्व निर्माण झाले. लोकदल हा मध्यम व बड्या जातींचा पक्ष होता. अशावेळी देशात दहा हजाराहून अधिक जातीय संघर्षाच्या घटना घडल्या.

२७ मे १९७७ रोजी पाटणा जिल्ह्यातील बेलची खेड्यात नऊ दलितांना वेचून वेचून ठार मारण्यात आले. १९७२ साली बिहारमध्ये लागू करण्यात आलेल्या कमाल शेतजमीन धारणा कायद्यामुळे गावोगावी जमीनदार आणि दलित यांच्या तणाव निर्माण झाला होता. बेलचीचे हे हत्याकांड झाल्यानंतर केंद्र सरकारचे मंत्री तिथे जाण्याच्या अगोदर इंदिरा गांधी या घटनास्थळी पोहोचल्या. कधी जीपमधून, कधी ट्रॅक्टरमधून, तर कधी हत्तीवरून प्रवास करत, त्यांनी अत्याचारित दलित कुटुंबांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले. एवढेच नव्हे, तर त्या काळात प्रचंड महागाई झाली होती, तेव्हा कांद्याची माळ घालूनच इंदिरा गांधी तसेच वसंत साठे आणि सी. एम. स्टीफन हे त्यांचे सहकारी संसदेत आणि ठिकठिकाणी जात असत.

इंदिरा गांधींना झालेली अटक आणि त्यांचया विरुद्ध सूडबुद्धीने जनता सरकारने केलेल्या कारवायांमुळे १९८० साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत इंदिराजी पुन्हा लोकप्रिय ठरल्या. इंदिरा काँग्रेसला ३५३ जागा प्राप्त झाल्या. काँग्रेसमध्ये दुसऱ्यांदा फूट पडल्यानंतर इंदिराजींच्या मागे काही मोजकेच तरुण आणि मुख्यतः काही अपवाद वगळता अननुभवी नेते होते. तरीदेखील त्या खचल्या नाहीत, हे विशेष. १९८९ साली बोफोर्सच्या गैरव्यवहाराच्या मुद्द्यावर संपूर्ण देशात आरोपांची फैर उठवण्यात आली. त्यानंतर नोव्हेंबर १९८९ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला १९७ जागा मिळाल्या तर जनता दलाला १४३. बहुमत नसल्यामुळे राजीव गांधी यांनी सरकार स्थापन न करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा व्ही. पी. सिंग यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आघाडीचे सरकार स्थापन झाले. व्हीपींनी मंडलवादाचा पुरस्कार केल्यामुळे, लालूप्रसाद यादव, मुलायमसिंग यादव, रामविलास पासवान यांच्यासारखे नेते पुढे आले. मंडलवादी राजकारणाचा गाभा समजण्यात काँग्रेस कमी पडल्यामुळे, तसेच अल्पसंख्य समाजही दूर जाऊ लागल्यामुळे, काँग्रेस पक्ष हिंदी भाषिक प्रदेशांमधून जवळपास उखडला गेला होता. आजची परिस्थितीही काहीशी अशीच आहे. असो

मात्र तरीदेखील मे-जून १९९१ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांत काँग्रेसला सर्वाधिक, म्हणजे २४४ जागा प्राप्त झाल्या आणि भाजपला १२०, तर जनता दलाला ५९ जागा मिळाल्या. जनता पक्ष वा जनता दल यांना स्थिर सरकार देता येत नाही, हे लक्षात आल्यामुळे आणि राजीव गांधी यांच्या हत्येमुळे काँग्रेसच्या बाजूने सहानुभूतीची लाट निर्माण झाली. तामिळनाडूतील पेरेम्बुदूर येथे ही हत्या झाली. यामुळे दक्षिण भारतात काँग्रेसला मोठे यश प्राप्त झाले. या कालावधीत काँग्रेसने नरसिंह राव आणि मनमोहन सिंग यांच्या नेतृत्वाखाली आर्थिक उदारीकरणाचे पर्व सुरू करून, देशात परिवर्तनाचे वारे आणले. परंतु नंतर झालेल्या निवडणुकांत काँग्रेसची सत्ता गेली. त्यानंतर दोन अल्पायुषी सरकारे आली. पुढे यथावकाश वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्थिरता दिली. परंतु, तरीदेखील काँग्रेस पक्ष संपला नाही.

१९९८ साली १२ व्या लोकसभा निवडणुकांत भाजपला १८२, तर काँग्रेसला १४१ जागा मिळाल्या होत्या. वाजपेयी यांची प्रतिमा अत्यंत चांगली होती. त्यांनीही अनेक चांगल्या चांगले उपक्रम राबवले. परंतु अतिआत्मविश्वास नडल्यामुळे २००४ साली पुन्हा एकदा काँग्रेसच्या नेतृत्वाखाली यूपीएचे सरकार आले. त्यावेळीही काँग्रेसला १४५, तर भाजपला १३८ जागा मिळालेल्या होत्या. म्हणजे दोघांमध्ये फारसा फरक नव्हता. १९९८ साली राजकारणात प्रवेश केल्यानंतर सोनियाजींनी अथक प्रयत्न करून काँग्रेसला बऱ्यापैकी यश मिळवून दिले आणि त्यानंतर वेगवेगळ्या पक्षांना एकत्र करून यूपीएची स्थापना केली. सोनिया गांधी आणि मनमोहन सिंग यांनी देशाला दहा वर्षे सरकार दिले. हे सर्व सांगण्याचे कारण असे की काँग्रेसचा पराभव झाल्यानंतरही काँग्रेस पुन्हा पुन्हा सत्तेवर येऊ शकला आहे. अर्थात पूर्वीच्या काळात जनसंघ असो वा नंतर भाजप असो किंवा अन्य पक्ष, ते एवढे प्रभावी नव्हते. आज भाजपचे रूपांतर महाशक्तीत झाले आहे. मात्र तरीदेखील इंदिरा गांधी अथवा सोनिया गांधी असोत, त्यांनी सर्व प्रतिकूलतांवर मात करत, झुंजार वृत्ती दाखवत पक्षाला सत्तेवर आणून दाखवले आहे. नुकत्याच झालेल्या पाच राज्यांमधील निवडणुकांत तेलंगणा वगळता काँग्रेसचा बोऱ्या वाजला असला, तरीदेखील शहरातील आणि ग्रामीण भागातील तरुण वर्ग, शेतकरी, कामगार, व्यापारी, उद्योजक तसेच महिला यांना आकर्षित करून घेता येईल, असा कार्यक्रम काँग्रेसने तयार केला पाहिजे. देशातील सर्व जाती धर्मांतील पिचलेल्या वर्गाच्या दुःखांना काँग्रेसने वाचा फोडली पाहिजे. आज देशातील डाव्या शक्ती कमकुवत झाल्या आहेत. अशावेळी डावे पक्ष जे काम अत्यंत तडफेने करत होते व आहेत. तशी तडफ काँग्रेसने दाखवली पाहिजे. मात्र नव्या युगाची, एआय काळातील भाषा वापरत, नवीन शैली स्वीकारत, आगळे व सकारात्मक मुद्दे मांडत, काँग्रेसने सातत्याने काम करत राहिले पाहिजे. घिसीपिटी भाषा टाकून दिली पाहिजे. आज देशाला कधी नव्हे एवढी एखाद्या तडफदार विरोधी पक्षाची गरज आहे. काँग्रेसने अशी जिद्द दाखवावी. 'येस, वी कॅन!' असे म्हणत चिवटपणे झुंजल्यास, काँग्रेस पुन्हा सत्तेवर येऊ शकतो. ■■

# शासक आणि नोकरशहा



**सनदी सेवा ही अबलख घोड्यासारखी असते. घोड्यावर पक्की मांड ठेवता येणाऱ्यालाच घोडा उधळू न देता आपल्या ताब्यात ठेवता येतो. तसंच, प्रशासनातील खाचाखोचा अचूक माहिती असणाऱ्यालाच सनदी सेवेतील अधिकाऱ्यांवर वचक ठेवता येतो ', असे नामवंत सनदी अधिकारी दिवंगत स.गो. बर्वे म्हणत असत.**

प्रकाश चांदे

ब्रिटिश आमदानीत सर्व राज्यकारभार इंग्लिशमध्ये चालत असे. ते साहजिकच होते. पण, त्यामुळे सर्वसामान्य रयतेची खूप गैरसोय होत असे. त्या काळात तर साक्षरता नावालाच होती. बहुसंख्य स्त्री-पुरुष हे निरक्षर असत. त्यांना त्यांच्याच मातृभाषेत लिहिता-वाचता येत नसे; तर इंग्लिश भाषा कशी येत असणार?

तत्कालीन मध्य प्रांताचे रविशंकर शुक्ल हे स्वातंत्र्य मिळाल्यावर पहिले मुख्यमंत्री झाले. त्यांना शासनाचा कारभार स्थानिक भाषांतून चालवायची इच्छा होती. म्हणून त्यांनी भाषा तज्ज्ञ डॉ. रघुवीर यांच्या अध्यक्षतेखाली पारिभाषिक शब्दांसाठी समिती नेमली. नंतर मराठीत एक नामवंत लेखक झालेले आणि साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेले डॉ. वि.भि. कोलते हे त्या समितीत एक सदस्य होते. त्यांनीच ही आठवण त्यांच्या 'अजून चालतोची ही वाट' या ७९२ पृष्ठीय आत्मचरित्रात दिली आहे.

डॉ. रघुवीर आणि अन्य सदस्यांनी खूप मेहनत घेऊन हा पारिभाषिक शब्दकोश बनवला. समितीचा अहवाल आल्यावर शुक्लांनी सर्व सचिवांची एक सभा घेतली; आणि त्यांना या अहवालाची एक प्रत देऊन आता या पुढे शासनाकडे मराठीत आलेल्या पत्राला मराठीत आणि हिंदीत आलेल्या पत्राला हिंदीत उत्तर जायला मला हवे आहे. कारण, त्यावेळेस मध्य प्रांतात बरेच मराठी भाषिक लोक होते. मुख्य म्हणजे. राजधानी नागपूर शुद्ध मराठी होती.

तर या गोष्टीसाठी आपल्याला किती अवधी हवा आहे ते सांगा, असे विचारले. त्यावेळचे सचिव हे ब्रिटिशांनी सुरु केलेल्या 'भारतीय मुलकी सेवा' (Indian Civil Service – I.C.S.) मधून उत्तीर्ण झालेले अत्यंत बुद्धिमान अधिकारी असत. त्या सर्व सचिवांनी ही गोष्ट ताबडतोब सुरू करता येईल, असे सांगितले. पण, रविशंकरजी म्हणाले की, असे घाईगर्दीत नको. मी तुम्हाला तीन महिन्यांची मुदत देतो, त्यानंतर मात्र या दोन्ही भाषांत कारभार सुरू होईल.

ही गोष्ट कबूल केली रविशंकरजींनी, ही तारीख टिपून ठेवली. तीन महिने झाले. आणि दुसऱ्या दिवसापासून मराठी/हिंदी भाषांतल्या कागदांवर जर सचिवाने इंग्लिशमध्ये टिपणी केलेली असली, तर ते त्यावर मला इंग्लिश येत नाही, कृपया मराठीत टिपणी लिहावी अथवा अशा अर्थाचे हिंदी वाक्य लिहू लागले. ब्रिटिश अमदानीत आपली हयात घालवलेल्या 'ब्राऊन साहेबां'च्या ही गोष्ट पचनी पडेना!

पण मूलतः अत्यंत बुद्धिमान असणाऱ्या त्या सर्व मुलकी सनदी अधिकाऱ्यांनी वारे आता कोणत्या दिशेने वाहू लागले आहेत हे त्वरित जाणले; आणि थोड्याच दिवसांत मध्य प्रांताचा कारभार मराठी/हिंदीतून सुरू झाला.

नंतर सुमारे पन्नास वर्षांनी, १९९८ साली महाराष्ट्रात शिवसेना-भाजप युतीचे शासन असताना मराठीतून कारभार करण्याचे प्रयत्न तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी केले; पण भा प्र से (I.A.S.) तल्या अधिकाऱ्यांनी ते हाणून पाडले; म्हणून मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी खंत व्यक्त केली होती.

गंमत बघा; स्वातंत्र्य मिळून ५० वर्षे झालेली. मराठी भाषेविषयी जाज्वल्य अभिमान बाळगणाऱ्या आणि महाराष्ट्रात सर्वत्र मराठीचा ठसा हवा असणाऱ्या शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे यांच्या पक्षाचे शासन असताना महाराष्ट्र राज्याचे शासन मराठीत चालवता येत नव्हते! याचे एक कारण असे असते की, शासकाची प्रशासनावर भक्कम पकड हवी. शासकांचा प्रशासानावर वचक हवा. वास्तविक, प्रत्येक खात्याचा सचिव हा नुसताच उच्च शिक्षित नसतो; तर लोकसेवा संघाची अत्यंत कठीण परीक्षा उत्तीर्ण होऊन तो प्रशासनात, सनदी सेवेत दाखल झालेला असतो. त्यामुळे मंत्री हे सचिवाइतके बुद्धिमान अथवा उच्च शिक्षित नसण्याची शक्यता असतेच. पण सर्वसामान्य लोकांसाठी कल्याणकारी प्रशासन चालवण्याची तळमळ असलेले राज्यकर्ते असले की, ते सनदी अधिकाऱ्यांना ताब्यात ठेवू शकतात; आणि लोकहितासाठी कायद्यातून, नियमातून पळवाट शोधून लोककल्याणाचं इप्सित साधू शकतात. याची अनेक उदाहरणे आहेत.

स्वातंत्र्य मिळालं तेव्हा सौराष्ट्र, गुजरात, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि कर्नाटकातील चार जिल्हे, असं मुंबई राज्य होतं. स्वतंत्र भारतात भाषावार प्रांत रचना करण्यात येईल, असं काँग्रेसनं जाहीरनाम्यात आश्वासन दिलं होतं. त्यामुळे गुजराती भाषिकांचं वेगळं राज्य होणार आणि त्यात मुंबई नसणार हे चाणाक्ष सरदार पटेल यांच्या लक्षात आलंच होत. मुंबई आर्थिक केंद्राबरोबर एक आंतरराष्ट्रीय बंदर म्हणूनही प्रसिद्ध होतं. गुजराती लोक व्यापारी. त्यांना तर चांगल्या बंदराची गरज पडणार. म्हणून नवीन बंदराची उभारणी करण्यासाठी हालचाली सुरु झाल्यावर सरदार पटेल यांनी त्या समितीला गुजरातेत कांडला येथे नवं बंदर असावं यासाठी अनुकूल अहवाल बनवण्यासाठी सूचना तर दिल्याच; पण काहीसा दबावही आणला. त्याप्रमाणे कांडला बंदर अस्तित्वात आलं.

१२-१३ वर्षांनी महाराष्ट्र आणि गुजरात अशी दोन भाषिक राज्ये अस्तित्वात आली; आणि मुंबई महाराष्ट्रात राहिली. सरदार पटेल यांच्या दूरदृष्टीमुळे निर्माण झालेल्या कांडला बंदराचा गुजरात राज्याला फायदा होऊ लागला.

पूर्वी भारतात रेल्वे मध्ये ब्रॉड गेज, मीटर गेज आणि न्यारो गेज असे रूळांमधील अंतरावरून तीन प्रकार होते. त्याचे खूप तोटे होते. म्हणून सुसूत्रता आणण्यासाठी ब्रॉड गेज या एकाच प्रकारचे रूळ असावेत, असं स्वातंत्र्य मिळाल्यावर ठरलं. त्यामुळे मीटर गेज आणि न्यारो गेज रुळांची रेल्वे ब्रॉडगेजमध्ये परावर्तित करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला.

त्यावेळेस पुणे-बंगळुरू ही रेल्वेची मीटर गेज लाईन होती; आणि ती सांगली गावातून जात नव्हती. सांगली हे जिल्ह्याचं ठिकाण होतं; आणि हळद, द्राक्षे, उस यांच्यासारख्या पिकांचं भरघोस उत्पादन घेणारा सांगली हा जिल्हा होता. साहजिकच, मालाची ने-आण करण्यासाठी सांगली गावातून रेल्वे जाऊन सांगली हे स्थानक होणं आवश्यक होतं. त्यावेळेस वसंतदादा पाटील हे लोकहिताची कळकळ असणारे सांगली जिल्ह्याचे प्रमुख पुढारी होते. ते जरी अल्पशिक्षित असले तरी त्यांना विकासाची दूरदृष्टी होती. त्यामुळे पुणे-बंगळुरू रेल्वे मार्गाचं मीटर गेजमधून ब्रॉडगेजमध्ये रुपांतर करताना तो मार्ग सांगली गावातून गेला पाहिजे; आणि सांगली हे स्थानक झालं पाहिजे, यासाठी वसंतदादा हे जागरूक राहिले. त्यांना संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन आणि त्यांच्या हातातील सर्व शस्त्रे वापरून पुणे-बंगळुरू मार्ग सांगली गावातून नेऊन सांगली स्थानकाची निर्मिती केली. हा मार्ग १९७०मध्ये झाला. याचा फायदा सांगलीकरांना कसा होत आहे, हे गेली ५३ वर्षे सांगलीकर अनुभवताहेत!

जाता जाता : 'सनदी सेवा ही अबलख घोड्यासारखी असते. घोड्यावर पक्की मांड ठेवता येणाऱ्यालाच घोडा उधळू न देता आपल्या ताब्यात ठेवता येतो. तसंच, प्रशासनातील खाचाखोचा अचूक माहिती असणाऱ्यालाच सनदी सेवेतील अधिकाऱ्यांवर वचक ठेवता येतो', असे नामवंत सनदी अधिकारी दिवंगत स. गो. बर्वे म्हणत असत.

त्यावेळेस डोंबिवली येथून प्रसिद्ध होणाऱ्या माझ्या वि.रा. फडके या स्नेह्यांच्या 'माध्यम' या त्रैमासिकात रविशंकर शुक्लांची गोष्ट मी लिहिली होती; आणि तो अंक मनोहर जोशींना भेट पाठवला होता. त्यावर त्यांची पोचही आली नाही!

■■ (न्यूज टुडेच्या सौजन्याने)

## क्षणचित्र

### चहर, शमी मालिकेतून बाहेर

**नवी दिल्ली :** भारतीय संघ रविवारपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका खेळणार आहे. मात्र मालिका सुरू होण्याच्या एक दिवस आधी भारताला धक्का बसला आहे. संघाचे स्टार वेगवान गोलंदाज दीपक चहर आणि दुसरा मोहम्मद शमी हे दोघेही बाहेर गेले आहेत. दीपक चहरने एकदिवसीय मालिकेतून आपले नाव मागे घेतले आहे. तर शमी हा कसोटी संघाचा भाग होता, मात्र तो मालिकेतून बाहेर आहे, याबाबतीची माहिती बीसीसीआयने दिली.

### सल्लागारपदी जयसूर्या

**नवी दिल्ली :** श्रीलंकन क्रिकेट राजकीय हस्तक्षेपामुळे पूर्णतः रसातळाला गेले आहे. त्यामुळे क्रिकेट सुधारण्यासाठी श्रीलंका क्रिकेट बोर्डाने माजी दिग्गज कर्णधार सनथ जयसूर्याला पूर्णवेळ क्रिकेट सल्लागार म्हणून नियुक्त केले आहे. जयसूर्याने बोर्डाशी एक वर्षाचा करार केला आहे. जयसूर्या आपल्या कार्यकाळात श्रीलंकन संघाच्या राष्ट्रीय कार्यक्रमांवर लक्ष ठेवणार आहे. याशिवाय खेळाडूंच्या कामगिरीत सुधारणा करण्यासाठी प्रशिक्षण स्टाफवरही लक्ष ठेवणार आहे.

### इंग्लंडचा दुसरा पराभव

**नवी दिल्ली :** ब्रँडन किंगच्या ८२ धावांच्या नाबाद खेळीच्या बळावर वेस्ट इंडीजने ग्रेनाडा येथे खेळल्या गेलेल्या घरच्या टी-२० मालिकेतील दुसऱ्या सामन्यात इंग्लंडचा १० धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडीजने ७ गडी गमावून १७६ धावा केल्या. १७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना इंग्लंडचा संघ ७ गडी गमावून १६६ धावाच करू शकला. वेस्ट इंडीजने ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेत २-० अशी आघाडी घेतली आहे.

### मुंबईचे फॉलोअर्स घटले

**मुंबई :** आयपीएलमध्ये सलग दहा वर्षे मुंबई टीमचं कर्णधारपद सांभाळणाऱ्या रोहित शर्माला काढून त्याजागी हार्दिक पंड्याची नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे मुंबई इंडियन्सच्या अनेक चाहत्यांनी मुंबई इंडियन्सचं इन्स्टाग्रामवरील खाते अनफॉलो केले आहे. परिणामी मुंबई इंडियन्सच्या इन्स्टाग्रामवरील फॉलोअर्स कमी झाले आहेत. मीडिया रिपोर्टनुसार, मुंबई इंडियन्सचे इन्स्टाग्रामवरील १.५ लाख फॉलोअर्स कमी झाले आहेत. याचा फायदा चेन्नई सुपर किंग्सला झाला आहे.

### बीसीसीआयची नवी खेळी

**मुंबई :** आयपीएल २०२४ च्या हंगामाचा लिलाव १९ डिसेंबरला होणार आहे. या लिलापूर्वी नव्या चर्चेला उधाण आले आहे. जगभरातील १०-१० षटकांच्या क्रिकेट सामन्यांना मिळालेला उदंड प्रतिसाद पाहता, या फॉरमॅटचे सामने भारतातही सुरू होण्याच्या तयारीत आहेत. बीसीसीआय क्रिकेटच्या या सर्वात लहान आणि नवीन स्वरूपाची लीग सुरू करण्याचा विचार करत आहे. त्यासाठीची ब्लू प्रिंट पूर्णपणे तयार झाली आहे. त्यामुळे पुढील वर्षी सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये ही लीग खेळवली जाऊ शकते.

## पहिल्या कसोटीत ३५७ धावांनी विजय

# भारताने साहेबांना गुंडाळले

■ तीन दिवसात इंग्लंडचा खेळ खल्लास

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

दीप्ती शर्माच्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर भारताने एकमेव महिला क्रिकेट कसोटी सामन्यात इंग्लंडवर मोठा विजय नोंदवला. यजमान भारतीय संघाने दिलेल्या डोंगरासारख्या लक्ष्यासमोर साहेबांनी सपशेल शरणागती पत्करली. भारताच्या फिरकीसमोर इंग्लंडच्या फलंदाजांची अक्षरशः भंबेरी उडाली. त्यांचा दुसरा डाव १३१ धावांतच गारद झाला.

दीप्ती शर्माच्या फिरकीच्या जाळ्यात इंग्लंड सहज अडकले गेली आणि मुंबईतील डीवाय पाटील स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या कसोटी सामन्यात भारतीय संघाने तिसऱ्या दिवशीच ३४७ धावांनी विजय मिळवला. यासोबत हा सामना जिंकून टीम इंडियाने इतिहास रचला. इतिहासात त्यांनी पहिल्यांदाच इंग्लंडला भारतात कसोटीत पराभूत केले.

याआधी दोन्ही संघांमध्ये ३ सामन्यांच्या टी-२० मालिकेत भारताचा १-२ असा पराभव झाला होता. कसोटी सामना जिंकून टीम इंडियाने त्या पराभवाचा हिशेब बरोबरीत ठेवला. महिला क्रिकेटमधील धावांच्या बाबतीत कोणत्याही संघाचा हा सर्वात मोठा विजय आहे.

भारताने पहिल्या डावात ४२८ धावा केल्या होत्या. नवोदित शुभा साथिसने ६९ धावांची खेळी खेळली, तर दीप्ती शर्माने ६७ धावांचे योगदान दिले. यष्टिरक्षक यास्तिका भाटिया ६६ धावा करून तंबूमध्ये परतली, तर कर्णधार हरमनप्रीत कौरने ४९ धावांचे योगदान दिले. जेमिमाह रॉड्रिज ९९ चेंडूत ६७ धावा करून बाद झाली.

प्रत्युत्तरात इंग्लंडने पहिल्या डावात १३६ धावा केल्या. पाहुण्या संघाकडून नॅट शीवरने सर्वाधिक ५९ धावा केल्या. भारताकडून दीप्ती शर्माने पहिल्या डावात ५ बळी घेतले. टीम इंडियाने आपला दुसरा डाव ६ गडी बाद १८६ धावांवर घोषित केला. पहिल्या डावात भारताकडे २९२ धावांची आघाडी होती. त्यामुळे इंग्लंडला विजयासाठी ४७९ धावांचे लक्ष्य मिळाले. त्यांचा संपूर्ण संघ दुसऱ्या डावात १३१ धावांत गारद झाला. भारताकडून दीप्ती शर्माने चार आणि पूजा वस्त्राकरने तीन बळी घेतले. राजेश्वरी गायकवाडने दोन तर रेणुका सिंह ठाकूरने एक गडी बाद केला.

### हरमनप्रीत कौरची दमदार फलंदाजी

भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने दुसऱ्या डावात दमदार फलंदाजी केली. तिने ६७ चेंडूंमध्ये ५ चौकारांसह नाबाद ४४ धावांची खेळी साकारली. जेमिमा रॉड्रिज (२७ धावा) व दीप्ती शर्मा (२० धावा) यांनी छोट्या पण महत्त्वपूर्ण खेळी केल्या. इंग्लंडकडून चार्ली डीन हिने ६८ धावा देत चार फलंदाज बाद केले.

### विश्वविक्रमी कामगिरी

हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखाली महिला संघाने या विजयासह मोठा विश्वविक्रम केला. महिला क्रिकेटमधील धावांच्या बाबतीत कोणत्याही संघाचा हा सर्वात मोठा विजय आहे. यापूर्वी १९९८ मध्ये श्रीलंकेने पाकिस्तानविरुद्ध ३०९ धावांनी विजय मिळवला होता. तो महिला क्रिकेटमधील आजपर्यंतचा सर्वात मोठा विजय होता. या यादीत न्यूझीलंडची आता दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरण झाली आहे.

### फिरकीसमोर डाव कोसळला

भारतीय फिरकीपटूंसमोर इंग्लंडच्या फलंदाजांचा निभाव लागला नाही. दीप्ती शर्माने ५.३ षटकांमध्ये अवघ्या ७ धावांच्या मोबदल्यात इंग्लंडच्या पाच फलंदाजांना जाळ्यात अडकवले. तिने डॅनी वॅट (१९ धावा), एमी जोन्स (१२ धावा), सोफी एक्लेस्टोन (०), केट क्रॉस (१ धाव) व लॉरेन फिलर (५ धावा) यांना बाद केले. ऑफस्पिनर स्नेह राणा हिने २५ धावा देत दोन फलंदाज बाद केले. इंग्लंडचा संघ ३ बाद १०८ या धावसंख्येवरून १३६ धावांवरच गारद झाला. २८ धावांमध्ये त्यांचे सात फलंदाज बाद झाले.

## नांदगाव विद्यालयात क्रीडा महोत्सव उत्साहात

**। पाली/गोमाशी । वार्ताहर ।**

भोराई शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक कै. नामदेव येसू खैरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त संत नामदेव माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय नांदगाव सुधागड येथे क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामाध्यमातून विद्यार्थ्यांची बौद्धिक व शारीरिक क्षमता विकसित होण्यासाठी निश्चित मदत होईल, असा विश्वास महाविद्यालयाकडून व्यक्त करण्यात आला. दरम्यान, या स्पर्धा दि. १४,१५,१६ डिसेंबरदरम्यान पार पडल्या.

या स्पर्धेत गोळाफेक, थाळीफेक, धावणे, लांब उडी, उंच उडी, कबड्डी, खो-खो या वैयक्तिक व सांघिक खेळातून विद्यार्थ्यांनी खेळाचा आनंद लुटला. या स्पर्धेतील विजयी संघ तसेच खेळाडूंना २७ डिसेंबर रोजी शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष सुरेश खैरे यांच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## भारताचे आशिया चषकातील आव्हान संपुष्टात

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

दुबईत खेळल्या जात असलेल्या अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहोचण्याच्या भारतीयांच्या आशा मावळल्या आहेत. बांगलादेशने उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतीय संघाचा पराभव केला. भारतीय संघाला ४ गडी राखून पराभव स्वीकारावा लागला. बांगलादेशच्या गोलंदाजीपुढे भारतीय फलंदाजांनी हार पत्करली. प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघ अवघ्या १८८ धावांत गारद झाला. यानंतर बंगाली फलंदाजांसमोर भारतीय गोलंदाज बेरंग दिसले.

बांगलादेशचा कर्णधार महफुजुर रहमानने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बंगाली गोलंदाजांनी आपल्या कर्णधाराचा निर्णय योग्य असल्याचे दाखवून सुरुवातीपासूनच भारतीय फलंदाजांच्या ठराविक अंतराने गडी बाद केले. सलामीची जोडी १० धावांतच तंबूमध्ये परतली. कर्णधार उदय शून्यावर बाद झाला.

भारतीय संघासाठी केवळ मुशीर खान (५०) आणि मुरुगन अभिषेक (६२) यांनाच मोठी खेळी करता आली. याशिवाय एकाही फलंदाजाला १९ धावांच्या पुढे जाता आले नाही. त्यामुळे भारतीय संघ ४२.४ षटकांत १८८ धावांवरच मर्यादित राहिला. दरम्यान, १८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना बांगलादेशचे ३४ धावांवर आघाडीचे तीनही फलंदाज तंबूमध्ये परतले होते. येथून अरिफुल इस्लामने ९० चेंडूंत ९४ धावा आणि अहरार अमीनने १०१ चेंडूंत ४४ धावा करत बांगलादेशचा विजय निश्चित केला. दोघांमध्ये १३८ धावांची भागीदारी झाली. संघाच्या १७२ धावांवर आरिफुल बाद झाला. पण, त्यांना सामना जिंकण्यापासून रोखता आला नाही.

### उपांत्य फेरीत बांगलादेशकडून पराभव

## द्रविड गुरुजींना विश्रांती

### सीतांशु कोटक देणार खेळाडूंना धडे

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय क्रिकेट संघ दक्षिण आफ्रिका दौऱ्यावर आहे. नुकतीच टी-२० मालिका बरोबरीत संपली आहे. दरम्यान, रविवारपासून सुरू होणाऱ्या एकदिवसीय मालिकेतून दूर राहण्याचा निर्णय घेतला राहुल द्रविडने घेतला असून, बीसीसीआयने तो मान्य केला आहे. दरम्यान, द्रविडच्या अनुपस्थित सीतांशु कोटक यांच्याकडे संघाच्या मुख्य प्रशिक्षकपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

तीन टी-२० सामन्यांच्या मालिकेचा पहिला सामना पावसामुळे रद्द झाला होता. दुसरा दक्षिण आफ्रिकेने तर तिसरा भारतीय संघाने जिंकला होता. त्यामुळे मालिका १-१ अशी बरोबरीत संपली. आता रविवारीपासून एकदिवसीय मालिका सुरू होणार आहे. राहुल द्रविडला कसोटी मालिकेवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करायचे आहे, त्यामुळे त्याने भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका एकदिवसीय मालिकेपासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. बीसीसीआयनेही द्रविडची विनंती मान्य केली आहे. दरम्यान, बीसीसीआयच्या या निर्णयाचा सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.

राहुल द्रविडच्या अनुपस्थितीत सीतांशु कोटक हे भारतीय संघाचे मुख्य प्रशिक्षक असतील. भारतीय संघाचा माजी यष्टीरक्षक अजय रात्रा नव्या प्रशिक्षकांच्या स्टाफमध्ये सामील झाला आहे. तो क्षेत्ररक्षण प्रशिक्षकाची भूमिका पार पाडणार आहे, तर राजीव दत्त गोलंदाजी प्रशिक्षकाची भूमिका निभावतील.

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना १७ डिसेंबर रोजी जोहान्सबर्गच्या न्यू वांडरर्स स्टेडियमवर भारतीय वेळेनुसार दुपारी १.३० वाजता खेळला जाईल. एकदिवसीय मालिकेत भारतीय संघाची कमान केएल राहुलकडे असेल. एकदिवसीय मालिकेनंतर, भारतीय संघ यजमानांशी २ सामन्यांच्या कसोटी मालिकेत भिडणार आहे. पहिला कसोटी सामना २६ डिसेंबरपासून न्यू लँड्समध्ये तर शेवटचा कसोटी सामना ३ जानेवारीपासून केपटाऊनमध्ये होणार आहे.

## हार्दिकच्या नेतृत्वात रोहित खेळणार

■ मुंबई इंडियन्सकडून अखेर खांदेपालट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबई इंडियन्सच्या कर्णधारपदी हार्दिक पांड्या याची निवड करण्यात आली आहे. २०२४ मध्ये तो संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारेल. मुंबई इंडियन्सच्या व्यवस्थापनाकडून सोशल मीडियावर याबाबतची घोषणा शुक्रवारी करण्यात आली.

रोहित शर्माच्या नेतृत्वात मुंबई इंडियन्सने सर्वाधिक पाच वेळा आयपीएलच्या जेतेपदावर मोहोर उमटवली. मात्र, हार्दिक पंड्याकडे नेतृत्व सोपवण्याचे कारण मुंबई इंडियन्सकडून सांगण्यात आले की, आम्हाला भविष्यातील संघ घडवायचा आहे. त्यामुळे नेतृत्वबदल करण्यात आलेला आहे. दरम्यान, रोहित शर्माला आता हार्दिक पंड्याच्या नेतृत्वात खेळावे लागणार आहे. २०२४ मोसम त्याचा अखेरचा असण्याची शक्यता आहे.

रोहित शर्माला मुंबई इंडियन्स संघाच्या नेतृत्वपदावरून काढून टाकण्यात आले आहे. त्यामुळे टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट तो खेळणार का, असा प्रश्न याप्रसंगी निर्माण झाला आहे. दोन दिवसांपूर्वीच रोहित शर्माने पुनरागमनाचे संकेतही दिले. एकदिवसीय विश्वकरंडक लांबणीवर आहे. त्यामुळे सध्या तरी त्याने टी-२० विश्वकरंडकाबाबत मत व्यक्त केले, असे म्हणायला हरकत नाही. प्रत्यक्षात त्याने टी-२० क्रिकेटमध्ये खेळणार की नाही, याबाबत काहीच सांगितलेले नाही. रोहितच्या नेतृत्वात मुंबईने २०१३, २०१५, २०१७, २०१९, २०२० साली विजेतेपद पटकावले आहे.

## धोनीच्या याचिकेमुळे आयपीएस अधिकाऱ्याला तुरुंगवास

**। चेन्नई । वृत्तसंस्था ।**

मद्रास उच्च न्यायालयानं भारतीय पोलीस सेवेतील निवृत्त अधिकारी जी. संपत कुमार यांना शुक्रवारी १५ दिवसांची कोठडी सुनावली आहे. भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीकडून एक याचिका दाखल करण्यात आली होती. न्यायालयाच्या अवमानाप्रकरणी ही याचिका दाखल केली गेली होती. त्यावर सुनावणी करताना न्यायालयानं कुमार यांना १५ दिवसांच्या तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली.

शिक्षेविरोधात अपील करण्यासाठी न्यायालयानं कुमार यांना ३० दिवसांचा अवधी दिला आहे. सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालय यांचा अवमान करणारी विधानं केल्यामुळे धोनीनं आयपीएस अधिकाऱ्याविरोधात याचिका दाखल केली होती. सट्टेबाजांमध्ये आपलं नाव घेतल्याप्रकरणी धोनीनं २०१४ मध्ये अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला होता. त्यानं १०० कोटी रुपयांची भरपाई मागितली होती.

संपत कुमार यांना न्यायालयाविरोधात केलेल्या विधानांमुळे त्यांना शिक्षा करण्यात यावी, अशी मागणी धोनीनं याचिकेच्या मार्फत केली होती. संपत यांनी जाणूनबुजून न्यायालयाचा अपमान करण्याचा आणि त्यांचे अधिकार कमी करण्याचा प्रयत्न केल्याचं खंडपीठानं म्हटलं. न्यायमूर्ती एस.एस. सुंदर आणि न्यायमूर्ती सुंदर मोहन यांच्या खंडपीठानं संपत कुमार यांना शिक्षेच्या निर्णयाला आव्हान देण्यासाठी ३० दिवसांचा अवधी दिला आहे.

## शांतिनिकेतन पब्लिक स्कूलचे यश

**। पनवेल । वार्ताहर ।**

गुरुकूल स्कूल ऑलिम्पिक २०२३-२४ स्पर्धा नुकतीच संपन्न झाली. या स्पर्धेत शांतिनिकेतन पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी करून यश प्राप्त केले आहे.

शांतिनिकेतन शाळेतील मुलांनी पूनम पवार आणि मुख्याध्यापिका डॉ. सीमाव पैकर यांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली नुकत्याच पार पडलेल्या गुरुकूल स्कूल ऑलिम्पिक २०२३-२४ च्या स्पर्धेत विविध बक्षिसे मिळवली आहेत. १४ वर्षांखालील क्रिकेट स्पर्धेत त्यांनी दुसऱ्या क्रमांकाचे, तर फुटबॉल संघाने पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावले आहे. इयत्ता आठवी तु.अ. मधील आदिल नायरला सामनावीर घोषित करण्यात आले आहे. १४ वर्षांखालील १०० मी. आणि २०० मी. धावण्याच्या स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. पनवेल महानगरपालिका आयोजित स्पर्धेमध्ये चॅम्पियन ट्रॉफि पटकावली आहे. शांतिनिकेतन पब्लिक स्कूल, पनवेल येथील विद्यार्थ्यांनी रायगड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक पदके पटकावली आहेत. त्याबद्दल या विद्यार्थ्यांचे कौतुक केले जात आहे.

### विशाल लाड सर्वोत्तम खेळाडू

## शिवमुद्रा प्रतिष्ठानला विजेतेपद

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवमुद्रा प्रतिष्ठानने यंग भारत सेवा मंडळाने आयोजित केलेल्या कुमार गट जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे जेतेपद पटकावले. शिवमुद्राचा विशाल लाड स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला. त्याला रोख रू. तीन हजार आणि सायकल देऊन गौरविण्यात आले. प्रभादेवी येथील राजाभाऊ साळवी मनोरंजन मैदानातील राष्ट्रीय कबड्डी खेळाडू स्व. गोपीनाथ जाधव क्रीडांगणावर झालेल्या अंतिम सामन्यात शिवमुद्राने सिद्धीप्रभाचा प्रतिकार ४०-२३ असा सहज मोडून काढत रोख रू. सात हजार आणि स्व. सतीशचंद्र फणसेकर चषक आपल्या नावे केला. उपविजेत्या सिद्धीप्रभाला रोख रू. पाच हजार व स्व. वंदना रघुनाथ नाईक चषकावर समाधान मानावे लागले.

या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात शिवमुद्राने एस.एस.जी. फाऊंडेशनचा (४५-४०) असा तर सिद्धीप्रभाने विजय क्लबचा (३४-३१) असा पराभव करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. उपांत्य पराभूत दोन्ही संघांना प्रत्येकी रोख रू. तीन हजार आणि कुमारी महेश्वरी उमेश गावडे चषक प्रदान करण्यात आला. श्रीराम मंडळ विश्वस्तचा दिवेश गवळी स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचा, तर सिद्धीप्रभाचा सिद्धेश भोसले स्पर्धेतील उत्कृष्ट पकडिचा खेळाडू ठरला. दोन्ही खेळाडूंना प्रत्येकी रोख रू. एक हजार व मिक्सर देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेच्या बक्षीस वितरणप्रसंगी नेत्रविशारद तात्याराव लहाने, अर्जुन पुरस्कार खेळाडू माया मेहेर, कस्टल डेव्हलपमेंटचे राजेश बागवे, तारक राऊळ, सीताराम साळुंके (दोन्ही शिव छत्रपती पुरस्कार खेळाडू), राष्ट्रीय कबड्डी खेळाडू विनायक लाड व चंद्रकांत भारती, सारंग, संघाचे कार्याध्यक्ष अजित राणे आदी मान्यवर उपस्थित होते.

**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)